Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२०११** **दिनांक २६.०३.२०११**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक २६.०३.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-१२६९२-२०११, दिनांक १८ मार्च,२०११ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २६.०३.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०६. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०७ मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डये
१०. मा.डॉ.प्यारेलाल तिवारी

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.सौ.अलका बाळू शेजवळ यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.समि खतिब व मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस खालीलप्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडण्यात आले-

**०१.** मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष, यांना ८२ व्या वाढदिवसानिमित्त सभेने त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या व मा.अध्यक्ष महोदय यांचे हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

**०२.** मा.विश्वस्त श्री.रमाकांत गणेश कर्णिक यांची अथेन्स ग्रीस येथे वर्ल्ड फेडरेशन ॲण्ड ट्रेड युनियनची जागतीक परिषद भरत असून, राज्य कर्मचाऱ्यांच्या अखिल भारतीय महासंघाच्या तीन प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी म्हणून निवड झाली असल्याने सभेने त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या व मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष, यांचे हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **श्री. नितीन देसाई यांचे संकल्पनेतून बाबांच्या जीवनावरील आधारित "साईसृष्टी" उभारणीबाबत सादरीकरण.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान करीता राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी मौजे रुई, तालुका राहाता गट नंबर २३ येथील विनामोबदला बक्षिसपत्राने दिलेल्या ७ हेक्टर ३२ आर (१८.३० एकर पोटखराब्यासह) जमिनीपैकी अंदाजे १० एकर जमिनीत शैक्षणिक व आध्यात्मिक संकुलाचे बांधकाम आराखडयांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

या सभेत त्याच अनुषंगाने, मौजे रुई येथील बक्षिस पत्राने मिळालेल्या उर्वरित जमिनीत साईसृष्टी प्रकल्प उभारण्यात यावा. त्यासाठी प्रसिध्द कलानेपथ्यकार श्री. नितिन देसाई यांची नेमणूक करण्यात यावी. याकामी श्री. नितिन देसाई यांचेशी संपर्क साधून साई सृष्टी उभारणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्याची कार्यवाही करणेत यावी असे दिनांक ०५/१२/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१००४ अन्वये ठरले आहे.

त्यानुसार आजचे सभेपुढे साईसृष्टी प्रकल्पाचे सादरीकरण करणेकामी श्री. नितिन देसाई उपस्थित राहणार असून त्यांचे सादरीकरण पाहून त्याबाबत निर्णय होणेकामी मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

मा. कार्यकारी अधिकारी यांचे उपरोक्त प्रस्तावानुसार व मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रसिध्द कलानेपथ्यकार श्री. नितिन देसाई व त्यांचे सहकारी श्री. नितिन कुलकर्णी, मुंबई हे सभेपुढे साईसृष्टी प्रकल्पाचे सादरीकरण करणेस हजर होते.

श्री.नितिन देसाई यांनी विषयांकित प्रकल्पाचे सादरीकरण करतांना, त्यातील काही ठळक बाबी खालीलप्रमाणे नमुद केल्या :

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. श्री साईबाबांची मोठी प्रतिमा उभारणेत येईल. सदर प्रतिमा ०५ ते १० किलोमीटर अंतरावरुन दिसू शकेल.
०२. साईसृष्टी प्रकल्प उभारणीसाठी अंदाजे २५ एकर जमीन उपलब्ध व्हावी, त्यापैकी ०५ एकर जमिनीमध्ये आवश्यक इमारती असतील.
०३. साधारणतः ०२ वर्षात प्रकल्प पूर्ण होऊन, ०६ वर्षात प्रकल्पाचा संपूर्ण खर्च वसूल होईल.
०४. विशेषतः अमेरिका व भारतातून शिल्पकृती घडविणेसाठी शिल्पकार येतील.
०५. साईसृष्टीत ठेवणेत येणाऱ्या सर्व मुर्त्या Wax (मेणामध्ये) घडविण्यात येतील.
०६. या प्रकल्पास १२ तासात ४० हजार पर्यटक भक्त भेट देऊ शकतील.
०७. या प्रकल्पामध्ये जीवंत सादरीकरणांतर्गत श्री साईंची पालखी / मिरवणूक दररोज दिवसातून एकदा स्थानिक कलाकरांच्या माध्यमातून साकारणेत येईल.
०८. विषयांकित प्रकल्प उभारणीसाठी अंदाजे खर्च रुपये ३० ते ३५ कोटी मात्र येईल.

उपरोक्त सादरीकरणास मा. व्यवस्थापन समिती सदस्यांनी पसंती देऊन, श्री. नितिन देसाई, मुंबई यांचे आभार मानले.

**निर्णय क्र. २०१ प्रसिध्द कलानेपथ्यकर श्री. नितिन देसाई, मुंबई यांनी शिर्डी येथे साईसृष्टी प्रकल्प उभारणेसाठी उपरोक्त सादरीकरणावर सविस्तर चर्चा करणेत येऊन, साईसृष्टी प्रकल्पासाठी श्री. नितिन देसाई, मुंबई यांची / त्यांच्या संस्थेची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणुक करणेत यावी, असे ठरले.**

**श्री. देसाई यांचेशी चर्चा करुन, विषयांकित प्रकल्पासाठी त्यांनी देऊ केलेल्या सेवेचा Scope of Work ठरविणेत यावा. या Scope of Work मध्ये प्रामुख्याने, विषयांकित प्रकल्पाचे डिझाईन व ड्रॉईंग्ज तयार करणे, प्रकल्पाचे विविध बाबींसाठी निविदा तयार करुन देणे, निविदेप्रमाणे कार्यादेश बहाल करणेस सहाय्य करणे, प्रकल्प उभारणीची सुरुवात करुन ती अंतिम होईपर्यन्त, विविध बाबींची अंमलबजावणी करणे, कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे, प्रकल्प खर्चाचे पृथःक्करण करुन खर्चाचे प्रमाणपत्र देणे, काही विशेष बाबी, जसे मुर्त्या तयार करणे, साऊंड इफेक्टस्, लाईटींग आदि कामांसाठी एजन्सीज नेमणे, प्रकल्प उभारणीसाठी संस्थान व ठेकेदार यांचेत समन्वय साधून प्रकल्प पूर्णत्वास नेणे आदि बाबींचा समावेश असावा. सदरहु सल्ला सेवा आर्किटेक्ट, स्ट्रक्चरल इंजिनिअर व प्रकल्प व्यवस्थापन सेवेसह सर्वसमावेशक असावा व त्यासाठी संस्थानचे तांत्रिक मनुष्यबळ वापरु नये. श्री. नितिन देसाई, मुंबई किंवा त्यांच्या अखत्यारीतील ते नामनिर्देशीत करतील त्या संस्थेस प्रकल्प सल्लागार म्हणून सेवा पुरविणेसाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ०६ टक्के अधिक सेवाकर अतिरिक्त, याप्रमाणे सल्लागार शुल्क आदा करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०२ दिनांक १३.०२.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. २०२** दिनांक १३.०२.२०११ रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र. ५८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, Ms.Weikfield Mnemonix Infonetworks,Pune यांना वेबसाईट नूतनिकरणाचे कामकाजात स्वारस्य नाही किंवा सदर कामकाज त्यांचेकडून पूर्ण होणार नाही. त्यामुळे त्यांचेकडून फक्त तीन्ही भाषेतील नूतनीकृत वेबसाईट संस्थानच्या ताब्यात घेऊन, कार्यादेशातील रक्कम रु. १४,००,००० पैकी त्यांना देण्यात आलेली ॲडव्हान्स रक्कम रु. ६,१२,९२०/- मात्र जमा नावे करुन उर्वरित रक्कम त्यांना अदा न करता नूतनीकरणाचे उर्वरित कामकाज रद्द करणेत यावे असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Ms.Weikfield Mnemonix Infonetworks, Pune यांना वेबसाईट नूतनिकरणाचे कामकाजात स्वारस्य नाही तसेच सदर कामकाज त्यांचेकडून पूर्ण होणार नाही. त्यामुळे त्यांचेकडून फक्त तीन्ही भाषेतील नूतनीकृत वेबसाईट संस्थानच्या ताब्यात घेऊन, कार्यादेशातील रक्कम रु. १४,००,००० पैकी त्यांना देण्यात आलेली ॲडव्हान्स रक्कम रु.६,१२,९२०/- यापोटी त्यांची संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रुपये १,६०,०००/- मात्र जमा करुन घेण्यात यावी व उर्वरित रक्कम रुपये ४,५२,९२०/- जमा-नावे करुन नुतनीकरणाचे उर्वरित काम रद्द करणेत यावे असें ठरलें.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

---

**(०२) निर्णय क्र. ६४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०४/२०११ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणीचे काम मे. एम. वॉल्श, मुंबई यांना सध्या आहे त्याच दराने सध्या आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०४/२०११ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी भक्तनिवासस्थान, हॉस्पिटल इत्यादी ठिकाणी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात दरम्यानचे काळात किटकनाशके (पेस्ट कंट्रोल ) फवारणी कामात अडचण होऊ नये याकरीता मे. एम. वॉल्श, मुंबई यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**(०३) निर्णय क्र. ६५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन,पूर्वीचेच अटी-शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें. तसेच सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे गरमपाणी वाटपाचा कालावधी पहाटे ३.०० ते सकाळी ८.०० असा ठेवण्यात यावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,पूर्वीचेच अटी-शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें. तसेच सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे गरमपाणी वाटपाचा कालावधी पहाटे ३.०० ते दुपारी १२.०० असा ठेवण्यात यावा.** (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**(०४) निर्णय क्र. ६७-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतीत गरम पाणी पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉ. क्रे.को. ऑप. सोसा.लि., शिर्डी यांना दिलेल्या गरम पाणी पुरवठा व्यवसायास दि.०५.०१.२०११ पासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर सध्याचे मासिक परवाना फीमध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देण्यात यावी. दरम्यानचे कालावधीत इमारतीचे प्रत्येक मजल्यावर गॅस गिझर बसविण्यात येऊन, त्याद्वारे साईभक्तांना गरम पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतीत गरम पाणी पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉ. क्रे.को. ऑप. सोसा.लि., शिर्डी यांना दिलेल्या गरम पाणी पुरवठा व्यवसायास दि.०५.०१.२०११ पासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचेच अटी शर्तीवर लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी. दरम्यानचे कालावधीत इमारतीचे प्रत्येक मजल्यावर गिझर बसविण्यात येऊन, त्याद्वारे साईभक्तांना गरम पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी/अधिक्षक, द्वारावती)

**(०५) निर्णय क्र. ७२-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे रुपये ११ लाख सशस्त्र सेना ध्वजदिन निधी पैकी गतवर्षाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांकडून अंदाजे रु. २,७८,५००/- कपात करण्यास व उर्वरीत संस्थानचा हिस्सा अंदाजे रु.८,२१,५००/- रक्कम मा.जिल्हाधिकारी व अध्यक्ष,जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर, यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र. १७ (६) च्या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. सदर तरतूदीनुसार प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नसल्याने प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे रुपये ११ लाख सशस्त्र सेना ध्वजदिन निधी पैकी संस्थान कर्मचाऱ्यांकडून कपात केलेली रक्कम रु. २,७८,३५०/- व उर्वरीत संस्थानचा हिस्सा रुपये ८,२१,६५०/- रक्कम मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३** **दिनांक २७.०२.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. २०३** दिनांक २७.०२.२०११ रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र.१९३-**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदाबाद येथे दि.०३ एप्रिल, २०११ रोजी साईभजन संध्या व साईभक्त संम्मेलन आयोजित करणे यावे, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदाबाद येथे दि.२८ एप्रिल, २०११ रोजी साईभजन संध्या व साईभक्त संम्मेलन आयोजित करणे यावे, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी-०५)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०४ दिनांक ०६.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. २०४ सदहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.०५ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे फेब्रुवारी- २०११**

**(ब) माहे फेब्रुवारी- २०११मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे फेब्रुवारी- २०११ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे फेब्रुवारी- २०११मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे फेब्रुवारी-२०११ मधील जमा रुपये २१,७६,४४,७५८/- आणि खर्च रुपये १३,४०,७३,१७७/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे फेब्रुवारी- २०११ रूपये ३,०२,२१७/- चा तक्ता, दिनांक २१.०३.२०११ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ५२६,८३,२९,८८१/- चा तक्ता, माहे फेब्रुवारी -२०११ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे रुपये ९,०६,७७,५५१/- देणगीचा तक्ता, माहे फेब्रुवारी -२०११ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये २,०५,३०५/- चा अहवालाच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२०५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०२.श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये जानेवारी-२०११ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे जानेवारी,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २७,०९,७२८/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२०५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. माहे डिसेंबर-२०१० मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे लेखा अहवालाची नोंद घेणे बाबत.**

**(C)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे डिसेंबर-२०१० या महिन्यात रुपये ८,९८,०००५/- मात्र देणगी चेक प्राप्त झाले आहेत

**निर्णय क्र.२०५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी- २०११ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(D)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे फेब्रुवारी-२०११ या महिन्यात रु.३०,१९,७२०/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२०५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी -२०११ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(E)** साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी-२०११ मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुपये ९४,४६८/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५९,५५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. १२५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(F)** माहे फेब्रुवारी- २०११ संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४२,६०७ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२०५ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.२०५ (G) नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) इंग्लिश मिडीयम स्कुल करिता नविन संगणक प्रयोगशाळा तयार करणेकरिता इंटेरिअर सिव्हील फर्निचर करणेकामी मे.मगर जायभावे असोसिएटस,नाशिक यांचे अंतिम बील रुपये ३,६१,४६१/- आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०२) मंदीर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात सुरक्षा साहित्याची सेंट्रल लाईज कंट्रोल रुम तयार करणेकरिता इंटेरिअरचे काम करणेकामी मे.त्रिमिती इंटेरिअर,नाशिक यांचे अंतिम बील रुपये ३,२८,२९०/- मात्र आदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०३) श्रीसाईबाबा साठवण बंधारा क्र.१० (कोहकी) दगडी भिंतीचे बांधकाम करणेकामी ठेकेदार श्री.पी.बी.जाधव, संगमनेर यांचे रु. ३,६८,५४७/- मात्र रकमेचे अंतीम बिल आदा करणेस मान्यता देणेत आली.**

**(०४) श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान कार्यालयाचे पश्चिम बाजूकडील व शैक्षणिक संकुल (इंग्लिश मिडीयम स्कुल) पश्चिमेकडील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेकामी श्री.एस.जी.गायकवाड, राहाता यांचे अंतिम बील रुपये ८,४२,२७५/- मात्र आदा करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०८. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.२०५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं. ०६ संस्थान परिसरात रामनवमी उत्सव व उन्हाळयाकरिता मंडप उभारणी बाबत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी दि. ११ एप्रिल, २०११ ते दि. १३ एप्रिल, २०११ अखेर "श्रीं" चा श्रीरामनवमी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, धर्मशाळा परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी तसेच मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत व विद्युत व्यवस्थेसह तात्पुरते स्वरुपात उभारणी करणे. तसेच उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे तसेच तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन खालील ठिकाणी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

**(अ) श्रीरामनवमी उत्सवा निमीत्ताने समाधी मंदिर, जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनगर इ. परिसरात करावयाचे मंडप, स्टेज, पार्टीशन, बॅरेकेटींग व दर्शन रांगकरीता कनात इ. व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१. | साई उद्यान, मंगल कार्यालय, जुने व नविन प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईनगर मैदान परिसर तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. | ७६०६०.०० चौरस फुट |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०२. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ६०'x८०' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ४८००.०० चौ. फुट |
| ०३. | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४.०० चौरस फुट |
| ०४. | साईनगर व भक्तनिवासस्थान येथे बाथरुम व्यवस्थेसाठी तात्पुरते कापडी / पत्र्याचे पार्टीशन | ५००.० रनिंग फुट |
| ०५. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था | १५००.०० रनिंग फुट |
| ०६. | दर्शन रांगेसाठी कनात | ८००.०० रनिंग फुट |

**(ब) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल. | परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी व घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३१,६००.०० चौरस फुट | दि.०२/०४/२०११ ते ०७/०४/२०१११ अखेर ०६ दिवस |
| ०२. | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ७६,६५१.०० चौरस फुट | दि. ०६/०४/२०११ ते १०/०४/२०१११ अखेर ०५ दिवस |
| ०३. | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | २९,९३८.०० चौरस फुट | दि. ०६/०४/२०११ ते १०/०४/२०१११ अखेर ०५ दिवस |

**(क) उन्हाळया निमीत्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरात करावयाची मंडप व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये (समाधि मंदिर उत्तर बाजू, सभाकुंड, समाधि मंदिर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्रीं चे चावडी समोर, नंदादीप मागील बाजू, दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट, शनि, महादेव, श्री गणेश मंदिर समोर, समाधी मंदिर उत्तर कडील मंडप ते कॅलेंडर विक्री स्टॉलपर्यंत, श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत, गेट नं. ३ ते श्री मारुती मंदिर, गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने, उदी काउंटर समोर, प्रवेशव्दार ४ ते नंदादिप पर्यंत दर्शन रांगेसाठी (लेंडीबागेतून), दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, साई कॉम्पलॅक्स समोरील मोकळ्या जागेत, श्री साई कॉम्पलॅक्स मधील देणगी काउंटर व बुक स्टॉल समोर, श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर इ. भागात) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे | ५८,४८६.०० चौरस फुट | दि. ०१/०४/२०११ ते दि. १५/०६/२०११ अखेर ७६ दिवस |
| ०२. | जुने प्रसादालय, साईउद्यान परिसरामध्ये शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे | २७,६९५.०० चौरस फुट | दि. ०१/०४/२०११ ते दि. १५/०६/२०११ अखेर ७६ दिवस |

**"अ"** चे तपशिलानूसार उत्सवा निमीत्ताने मंदिर व इतर परिसरामध्ये मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु. ६,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**"ब"**नुसार मुंबई येथून पालखी घेवून येणारे साईभक्तांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप कनात, बिछायतीसह तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था करुन घेणेकामी अंदाजे रु. १२,०८,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

तसेच **"क"**नुसार उन्हाळ्या निमीत्ताने मंदिर व जुने प्रसादालय परिसरात कापडी व शामियाना मंडप उभारणी करुन घेणेकामी अंदाजे रु. १३,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरिल 'अ' व 'ब' नुसार श्रीरामनवमी उत्सवा निमीत्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी एकुण रु. १८,०८,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता वरिल अ, ब व क नुसार व्यवस्था करुन घेणेकामी येणारे खर्चास व याकामी अशा प्रकारचे मंडप व्यवस्थेचे काम करणारे खालील ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०८ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव |
| ०३ | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, (सावता मंडप) राहाता | १० | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १२ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी |
| ०६ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | १३ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर |
| ०७ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | १४ | जीस आयडीयाज प्रा. लि., मुंबई |
| | | १५ | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर |

तरी श्रीरामनवमी उत्सवासाठी येणारे रु. १८,०८,०००/- व उन्हाळ्यासाठी उभारवयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारे रु. १३,१०,०००/-मात्रचे खर्चास व वरिल ठेकेदार यांचेकडून प्राप्त होणारे कोटेशन उघडून त्यावर, चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबतचा विषय मा. कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता. त्यानूसार खालील ठेकेदार यांचे प्राप्त झालेले कोटेशन उघडणेत आले असून, त्यांचेशी चर्चा वाटाघाटी अंती ठेकेदार यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

**श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळया निमीत्ताने उभारवयाचे मंडप व्यवस्थेचे दरपत्रकाचा तुलनात्मक तपशिल.**

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | व्यवस्थेचा तपशिल | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अ) श्रीरामनवमी उत्सव व्यवस्था. ०३ दिवस.** | | | | | **ब) साईनगर कलाकार स्टेज. ०३ दिवस.** |
| | | उत्सव शामियाना मंडप ७६०६० चौ. फुट | किर्तनासाठी स्टेज ३८४ चौ. फुट | बाथरुम करीता पार्टीशन ५०० र. फुट. | दर्शन रांग बॅरेकेटींग १५०० र. फुट | दर्शन रांगेच्या बाजूने कनात ८०० र. फुट | साईनगर मैदानावर स्टेज व इतर व्यवस्था ४८०० चौ. फुट |
| | | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति रनिंग फुट | दर प्रति दिवस प्रति रनिंग फुट | दर प्रति दिवस प्रति रनिंग फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | | | | | |
| निविदा दर | | १.५० | ३१.५० | ९.०० | १८.०० | १२.०० | ५७.२९ |
| चर्चा दर | | १.३० | ३०.०० | १५.०० | १५.०० | ९.०० | ५०.०० |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | | | | | | |
| निविदा दर | | १.३० | ३५.०० | १३.०० | ११.०० | ५.०० | ५७.०० |
| चर्चा दर | | १.१० | ३१.०० | १०.०० | १०.० | ४.०० | ५१.०० |
| ०३ | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, (सावता मंडप) राहाता | | | | | | |
| निविदा दर | | १.८० | ३५.०० | १३.०० | ६.०० | ३.७५ | ६०.०० |
| चर्चा दर | | १.४० | ३०.५० | १२.०० | ५.०० | **३.००** | ५०.०० |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | | | | | | |
| निविदा दर | | १.३५ | १२.०० | १०.०० | १५.०० | ८.०० | ६०.०० |
| चर्चा दर | | **०.९०** | **६.००** | **७.००** | **४.००** | ४.०० | ४५.०० |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | | | | | | |
| निविदा दर | | १.३० | ३०.०० | १५.०० | १८.०० | ५.०० | ५४.८६ |
| चर्चा दर | | १.१० | २८.०० | १५.०० | १३.०० | ५.०० | ४७.०० |
| ०६ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | | | | | | |
| निविदा दर | | १.६० | ३७.०० | १५.०० | १३.०० | ६.५० | -- |
| चर्चा दर | | १.६० | ३५.०० | १४.०० | १२.०० | ६.०० | -- |
| ०७ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | | | | | | |
| निविदा दर | | १.७५ | ४०.०० | १५.०० | १२.५० | ६.५० | ५०.०० |
| चर्चा दर | | १.७५ | ४०.०० | १५.०० | १२.५० | ६.५० | **४५.००** |
| ०८ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, | | | | | | |
| निविदा दर | | १.७५ | ४०.०० | १५.०० | १३.०० | ६.५० | -- |
| चर्चा दर | | १.६० | ४०.०० | १५.०० | १३.०० | ६.५० | -- |
| ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | | | | | | |
| निविदा दर | | १.७० | ४१.०० | १५.०० | ११.५० | ७.५० | -- |
| चर्चा दर | | १.८० | -- | -- | -- | -- | -- |
| १० | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | | | | | | |
| निविदा दर | | १.८० | ४२.०० | १६.०० | १३.०० | ५.०० | -- |
| चर्चा दर | | १.०० | ३०.०० | १०.०० | १०.०० | ४.०० | -- |
| ११ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | | | | | | |
| निविदा दर | | २.०० | -- | -- | -- | -- | -- |
| चर्चा दर | | २.०० | -- | -- | -- | -- | -- |
| १२ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | | | | | | |
| निविदा दर | | १.७५ | ३९.०० | १६५.०० | १७.०० | ७.७५ | -- |
| चर्चा दर | | १.७५ | ३९.०० | १६.५० | १७.०० | ७.७५ | -- |
| १३ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर | | | | | | |
| निविदा दर | | -- | -- | -- | -- | -- | -- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| चर्चा दर | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १४ स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर | | | | | | |
| निविदा दर | १.५० | ३५.०० | १७.०० | २०.०० | ९.०० | ६२.५० |
| चर्चा दर | १.४० | २५.० | १५.०० | १२.०० | ७.०० | ५२.०० |
| १५ नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला | | | | | | |
| निविदा दर | २.५९ | -- | -- | -- | -- | -- |
| चर्चा दर | -- | -- | -- | -- | -- | -- |

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | व्यवस्थेचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **क) मुंबई ते शिर्डी मार्गावर पालखी करीता मंडप व्यवस्था.** | | | **ड) उन्हाळी मंडप व्यवस्था. ७६ दिवस** | |
| | | खडी गोलभान ते घोटी मार्गावर कापडी मंडप ३१६०० चौ. फुट | सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप ७६६५१ चौ. फुट | पाथरे ते निमगांव कोऱ्हाळे मार्गावर शामियाना मंडप ३६८०० चौ. फुट | ताडपत्रीचे मंडप ५८४८६ चौ. फुट | शामियाना मंडप २७६९५ चौ. फुट |
| | | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौरस फुट |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | | | | |
| निविदा दर | | ४.०० | २.०० | २.२५ | ०.८० | ०.८० |
| चर्चा दर | | २.०० | २.०० | २.०० | ०.६० | ०.६० |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | | | | | |
| निविदा दर | | ३.५० | १.५० | २.०० | ०.९५ | ०.८० |
| चर्चा दर | | ४.०० | १.५० | १.२० | ०.८५ | ०.५० |
| ०३ | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, (सावता मंडप) राहाता | | | | | |
| निविदा दर | | ४.१० | १.५५ | २.६० | १.५० | ०.९० |
| चर्चा दर | | ३.०० | १.६० | १.६० | ०.८० | ०.७० |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | | | | | |
| निविदा दर | | ४.०० | १.५० | १.५० | ०.९० | १.०० |
| चर्चा दर | | ३.०० | **१.००** | **१.००** | **०.५०** | **०.३०** |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | | | | | |
| निविदा दर | | ४.०० | २.०० | १.६० | ०.८५ | ०.७५ |
| चर्चा दर | | ३.५० | १.९५ | १.५५ | ०.७५ | ०.५० |
| ०६ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | | | | | |
| निविदा दर | | ४.०० | २.२० | १.६० | १.२० | ०.९० |
| चर्चा दर | | ३.२० | २.०० | १.५० | १.२० | ०.८० |
| ०७ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | | | | | |
| निविदा दर | | ५.५० | २.५० | २.२५ | १.०० | १.०० |
| चर्चा दर | | ५.५० | २.५० | २.२५ | ०.८० | १.०० |
| ०८ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर | | | | | |
| निविदा दर | | ३.०० | १.८० | १.७० | १.२० | १.०० |
| चर्चा दर | | २.२५ | १.६५ | १.६० | १.२० | ०.४० |
| ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | | | | | |
| निविदा दर | | २.०० | १.६० | १.६० | १.१० | ०.९५ |
| चर्चा दर | | २.०० | -- | -- | -- | -- |
| १० | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | | | | | |
| निविदा दर | | ३.०० | १.८० | १.७० | १.२० | ०.९० |
| चर्चा दर | | ३.०० | **१.००** | **१.००** | १.५० | ०.८० |
| ११ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | | | | | |
| निविदा दर | | ३.०० | २.०० | २.०० | -- | ०.५० |
| चर्चा दर | | **१.७०** | १.५० | १.५० | -- | ०.५० |
| १२ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | | | | | |
| निविदा दर | | ३.७५ | १.४५ | १.५० | १.२० | १.१० |
| चर्चा दर | | ३.०० | १.४० | १.४५ | -- | ०.९० |
| १३ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर | | | | | |
| निविदा दर | | १.९९ | -- | -- | -- | -- |
| चर्चा दर | | १.९५ | -- | -- | -- | -- |
| १४ | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर | | | | | |
| निविदा दर | | -- | -- | -- | १.१० | १.०० |
| चर्चा दर | | -- | -- | -- | ०.९० | ०.८० |
| १५ | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला | | | | | |
| निविदा दर | | -- | -- | -- | -- | -- |
| चर्चा दर | | -- | -- | -- | -- | -- |

**निर्णय क्र. २०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये सदरचे व्यवस्थेसाठी खालील ठेकेदार यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०१. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर**

**(अ) श्रीरामनवमी उत्सव व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | एकुण रक्कम ०३ दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | उत्सव **शामियाना मंडप,** कनात व बिछायतीसह उभारणे. | ७६०६०.०० चौरस फुट | दि. ११/०४/११ ते दि. १३/०४/११ अखेर ०३ दिवस | ०.९० प्रति दिवस प्रति चौरस फुट | २,०५,३६२.०० |
| ०२. | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे **स्टेज** | ३८४.०० चौरस फुट | | ६.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | ६,९१२.०० |
| ०३. | साईनगर व भक्तनिवासस्थान येथे बाथरुम व्यवस्थेसाठी तात्पुरते **कापडी / पत्र्याचे पार्टीशन** | ५०० रनिंग फुट | | ७.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | १०,५००.०० |
| ०४. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी **बॅरेकेटींग** | १५०० रनिंग फुट | | ४.०० प्रति दिवस प्रति रनिंग फुट | १८,०००.०० |
| | | | | एकुण रुपये (अ).. | २,४०,७७४.०० |

**(ब) पालखीसाठी पाथरे ते शिर्डी मार्गावर शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे ते शिर्डी मार्गावर शामियाना मंडप , कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह उभारणी करणे.<br>०१. पाथरे, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे | ३०,०५०.०० चौरस फुट | दि. ०६/०४/२०११ ते १०/०४/२०१११ अखेर ०५ दिवस | १.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | १,५०,२५०.०० |
| | ०२. पोहेगांव येथे | ६,७५०.०० चौरस फुट | ०४.०४.२०११ ते दि. १२.०४.२०११ अखेर ०९ दिवस | | ६०,७५०.०० |
| | | | | एकुण रुपये (ब).. | २,११,०००.०० |

**(क) उन्हाळ्या निमीत्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरात करावयाची मंडप व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये ताडपत्रीचे छत असलेले **कापडी मंडप** | ५८,४८६.०० चौरस फुट | दि. ०१/०४/२०११ ते दि. १५/०६/२०११ अखेर ७६ दिवस | ०.५० प्रति दिवस प्रति चौरस फुट | २२,२२,४६८.०० |
| ०२. | जुने प्रसादालय, साईउद्यान परिसरामध्ये शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | २७,६९५.०० चौरस फुट | | ०.३० प्रति दिवस प्रति चौरस फुट | ६,३१,४४६.०० |
| | | | | एकुण रुपये (क).. | २८,५३,९१४.०० |
| | | | | **एकुण रुपये (अ + ब + क)** | **३३,०५,६८८.००** |

**०२. शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था. | ४८००.०० चौरस फुट | दि.११/०४/२०११ ते १२/०४/२०१११ अखेर ०३ दिवस | ४५.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | ४,३२,०००.०० |
| | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था. | १२००.०० चौरस फुट | दि.१३/०४/२०११ अखेर ०१दिवस | ४५.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | ५४,०००.०० |
| | | | | एकुण रुपये.. | ४,८६,०००.०० |

**०३. बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड**

पालखीसाठी घोटी ते सिन्नर मार्गावर कापडी मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी व घोटी येथे | ३१,६००.०० चौरस फुट | दि.०२/०४/२०११ ते | १.७० प्रति दिवस | ३,२२,३२०.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कापडी मंडप, | | ०७/०४/२०१११ अखेर ०६ दिवस | प्रति चौ. फुट | |
| | | | | **एकुण रुपये..** | **३,२२,३२०.००** |

**०४. लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर**

पालखीसाठी सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप. | ७६,६५१.०० चौरस फुट | दि.०६/०४/२०११ ते १०/०४/२०१११ अखेर ०५ दिवस | १.०० प्रति दिवस प्रति चौ. फुट | ३,८३,२५५.०० |
| | | | | **एकुण रुपये..** | **३,८३,२५५.००** |

**०५. श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता**

दर्शन रांगेच्या बाजूने कनात बांधणे.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांग व इतर आवश्यक ठिकाणी ६' उंचीची कनात बांधणे. | ८०० रनिंग फुट | दि. ११/०४/२०११ ते १३/०४/२०१११ अखेर ०३ दिवस | ३.०० प्रति दिवस प्रति रनिंग फुट | ७,२००.०० |
| | | | | **एकुण रुपये..** | **७,२००.००** |

**वरिल प्रमाणे आलेले निम्नतम दराने सदरचे काम करुन घेणेस मान्यता देणेत आली तसेच सदरहू दरामध्ये मुंबई ते शिर्डी मार्गावरील सिन्नर ते वावी व पाथरे ते शिर्डी मार्गावर उभारावयाचे मंडप व्यवस्थेसाठी रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर व लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे दर समान आलेले असल्याने सदरहू कामापैकी सिन्नर ते वावी मार्गावरील मंडप उभारणीचे काम लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर यांचेकडून व पाथरे ते शिर्डी मार्गावरील मंडप उभारणीचे काम ठेकेदार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून करुन घेणेत यावे असे ठरले. तसेच पालखी मार्गावरील मौजे पोहेगांव मार्गाने पायी पालखी येण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याने तसेच तेथे टाकण्यात येणारे मंडपात स्थानिकांनी पारायण सप्ताह आयोजित केलेला असल्याने, याठिकाणी १५०'x४५' साईजचे मंडपाची उभारणी दि. ०४.०४.२०११ ते १२.०४.२०११ अखेर ०९ दिवस करणेत यावी. उपरोक्त सर्व मंडप उभारणी कामी येणारे एकुण रु. ४५,०४,४६३/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. उत्सवाचे व उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देणेत यावी असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ शिर्डी श्री साईबाबा की श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रौच्चार व्हीसीडी व श्री साईबाबा आरती (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) डीव्हीडी सुधारित आवृत्ती चित्रीकरण व ध्वनीमुद्रणाचे निर्मिती करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडून निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.०९.२०१० चे सभेतील निर्णय क्र..७२४ नुसार "शिरडी श्री साईबाबा की - व्ही.सी.डी " व "श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार "व्ही.सी.डी तसेच "श्री साईबाबा आरती " (ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा) डी.व्ही.डी. या तीन सी.डी. सोन्याच्या सिंहासनाप्रमाणे आता नव्याने समाधी मंदिराचे आतिल भागास सोन्याचा मुलामा दिल्याने त्यांचे नव्याने चित्रिकरण करुन निर्मिती करणेस मान्यता मिळालेली आहे.

वरील कामाचे चित्रिकरण व ध्वनीमुद्रण करणेकामी मुंबई येथील ५ नामांकित स्टुडिओ-धारकांना जा.नं.एसएसएस-वशी- प्रकाशने - १२१०६ दि.१४.०२.२०११ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील ४ स्टुडिओ - धारकांचे त्यात दोन सिलबंद व २ उघडलेले दरपत्रके प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | स्टुडिओ - धारकांचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | मे. आर्या प्रॉडक्शन,साकीनाका, मुंबई | बंद दरपत्रक पाकिट |
| ०२ | मे.स्टुडिओ राजमुंद्रा,घाटकोपर, मुंबई | उघडलेले दरपत्रक |
| ०३ | मे. चॅनल कम्यूनिकेशन, शेवरी, मुंबई | उघडलेले दरपत्रक |
| ०४ | मे.मॅक वर्क्स स्टुडिओ, सायन मुंबई | बंद दरपत्रक पाकिट |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सबब वरील ४ स्टुडिओ-धारकांचे दोन उघडलेले व दोन सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला, तो खालीलप्रमाणे -

| अ.नं. | स्टुडिओ - धारकांचे नांव | कोटेशन्स मध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | मे. आर्या प्रॉडक्शन,साकीनाका, मुंबई | ७,६८,५००/- |
| ०२. | मे.स्टुडिओ राजमुंद्रा,घाटकोपर, मुंबई | ४,६०,०००/- |
| ०३. | मे. चॅनल कम्यूनिकेशन, शेवरी, मुंबई | **४,४८,०००/-** |
| ०४. | मे.मॅक वर्क्स स्टुडिओ, सायन मुंबई | ५,५०,०००/- |

**निर्णय क्र.२०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. चॅनल कम्यूनिकेशन, शेवरी, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०८** **नवीन दोन इनोव्हा वाहने खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून,निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** दि.२७/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयान्वये, वाहन विभागाकडील जुनी १२ वाहने जाहीर लिलावाने विक्री करणेस या वाहनांऐवजी नवीन दोन ईनोव्हा, एक स्विफ्ट डिजायर, एक बोलेरो, दोन रुग्णवाहीका एक मालवाहतुक अशी एकुण सात वाहने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.एक कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त निर्णयान्वये, खरेदी करावयाच्या सात वाहनांपैकी तुर्त नवीन दोन ईनोव्हा वाहने खरेदी करणेसाठी इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/१२६७१/२०११, दि.१७/०३/२०११ ने खालील प्रमाणे टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडुन कोटेशन बोलाविण्यात आले होते.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | वासन टोयोटा, नाशिक |
| ०२ | डी.एस.के. टोयोटा, केडगांव, अहमदनगर |
| ०३ | मिलेनियम टोयोटा, ठाणे |

उपरोक्त तीन अधिकृत डिलर्स पैकी खालील प्रमाणे दोन कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | |
|---|---|---|
| ०१ | डी.एस.के. टोयोटा, केडगांव, अहमदनगर | बंद कोटेशन |
| ०२ | मिलेनियम टोयोटा, ठाणे | ईमेल कोटेशन |

नवीन दोन ईनोव्हा वाहने खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या उपरोक्त निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | वाहनाचा प्रकार (INNOVA-२.५ VX) | निविदेतील दर रु. (हॅण्डलिंग/ सीआरटीएम चार्जेससह) | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | डी.एस.के. मोटार्स लि., अहमदनगर | DD (७S) | १२,०८,१७५/- | १२,०८,१७५/- |
| | | DQ (८S) | १२,१२,१७१/- | १२,१२, १७१/- |
| ०२ | मिलेनियम टोयोटा, ठाणे | DD (७S) | १२,३२,६९०/- | टोयोटो कंपनीचे निर्बंधामुळे अहमदनगर जिल्हयाकरिता वाहन देता येणार नसल्याचे कळविले. चर्चेस अनुपस्थित |
| | | DQ (८S) | १२,३६,६८०/- | |

**निर्णय क्र.२०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरिता सात सिटर INNOVA- २.५ VX DD (७S) ऐवजी आठ सिटर INNOVA- २.५ VX DQ (८S) दोन वाहने खरेदी करावीत व याकामी टोयोटा कंपनीचे अहमदनगर जिल्हयाकरिताचे अधिकृत डिलर डी.एस.के. मोटार्स लि., अहमदनगर यांचे निम्नतम दर प्रती वाहन रु.१२,१२,१७१/- मात्र स्विकारणेत येऊन त्यांना दोन INNOVA- २.५ VX DQ (८S) वाहने खरेदीचा कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **सन २०११-१२ करीता व्दारावती भक्तनिवास हाऊसकिपींग कामाचे निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ हया आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास हाऊस किपींग सेवेकरीता नामांकित कंपन्याकडुन निविदा मागविण्यास निर्णय झालेला असुन त्या अनुषंगाने दि. २२/०२/२०११ रोजी दै.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सकाळ पुणे, दै. गावकरी नाशिक, दै. सामना औरंगाबाद, दै. लोकमत मुंबई अशा विविध वर्तमान पत्रातुन जनसंपर्क कार्यालया मार्फत टेडर विक्रीची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली.

निविदा विक्री मुदत दि.२२/०२/२०११ ते दि. २८/०२/२०११ अखेर कार्यालयीन वेळेत होती. हया दरम्यान १ ते २२ क्रंमाकाच्या निविदा पैकी अ.नं. १४ व १५ हया क्रंमाकाच्या निविदा शिल्लक राहुन बाकी एकुण २० निविदा ( मुंबई कार्यालय - ५ व शिरडी कार्यालय - १५ ) विक्री झालेल्या पैकी सिलबंद निविदा दि. ०४/०३/२०११ रोजी कार्यालयीन वेळेत मुंबई व शिरडी कार्यालयात सादर करण्याबाबत तशी प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

खालील तक्यात दर्शविले प्रमाणे अ.नं. १ ते ५ अशा पाच निविदा शिरडी येथे व अ.नं. ६ ते ८ अशा तिन निविदा मुंबई कार्यालयात कार्यालयीन वेळेपुर्वी जमा झालेल्या आहेत. म्हणजेच २० विक्री निविदा पैकी ८ निविदा सिलबंद पाकीटात प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव |
|---|---|
| १ | रिलायन्स एन्टप्रायजेस, पुणे. |
| २ | सावली मॅनेजमेंट कन्सलटंसी प्रा लि. पुणे. |
| ३ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे. |
| ४ | श्री वाल्मिक मजुर सह. संस्था. मर्या. येवला जि.नाशिक |
| ५ | स्प्लेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. |
| ६ | कल्पतरु हॉस्पिटीलीटी फॅसिलिटी प्रा. लि. मुंबई |
| ७ | ऑल सर्व्हिसेस ग्लोबल प्रा लि. मुंबई |
| ८ | डस्टर टोटल सोलुशन सर्व्हीसेस प्रा. मुंबई |

उपरोक्त आलेल्या निविदा सोबतचे पाकीट नं.१ टेक्नीकल बीड मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आले.

निविदे मध्ये नमुद केलेली पात्रता व निविदा सादरकर्त्यांनी कळविलेली पात्रता (टेक्नीकल बीड) यांचा अभ्यास करुन १) तात्रिंक माहिती तक्ता २) मनुष्यबळ तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन उपरोक्त तक्त्यातील अ.नं. २) सावली मॅनजमेंट कन्सलटंसी प्रा. लि. पुणे व अ.नं. ४ ) श्री वाल्मिक मजुर सह. संस्था. मर्या. येवला जि.नाशिक. हया दोन निविदाधाकांचे कागदपत्राची कमतरता असल्याने हया दोन निविदाधाकांना सोडुन बाकीचे खालील तक्यात दर्शविलेले निविदाधारक यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आलेले आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव |
|---|---|
| १ | रिलायन्स एन्टप्रायजेस, पुणे. |
| २ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे. |
| ३ | स्प्लेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. |
| ४ | कल्पतरु हॉस्पिटीलीटी फॅसिलिटी प्रा. लि. मुंबई |
| ५ | ऑल सर्व्हिसेस ग्लोबल प्रा लि. मुंबई |
| ६ | डस्टर टोटल सोलुशन सर्व्हीसेस प्रा. मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील दरमहा रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दरमहा रुपये |
|---|---|---|---|
| १ | रिलायन्स एन्टप्रायजेस, पुणे. | ४,८७,१०८/- | अनुपस्थित |
| २ | बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे. | ६,८८,५१६/- | ६,२५,०००/- |
| ३ | स्प्लेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे. | ५,२२,५६१.८० | ५,१५,०००/- |
| ४ | कल्पतरु हॉस्पिटीलीटी फॅसिलिटी प्रा. लि. मुंबई | ६,२०,५३०/- | ५,८९,५०४/- |
| ५ | ऑल सर्व्हिसेस ग्लोबल प्रा लि. मुंबई | ७,७२,१६२.४७ | ७,५०,०००/- |
| ६ | डस्टर टोटल सोलुशन सर्व्हीसेस प्रा. मुंबई | ७,५२,३७४/- | ६,४५,२५५/- |

**निर्णय क्र.२०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, स्प्लेनडिड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे यांचे दर निम्नतम आहेत परंतू त्यांना कामाचा अनुभव नसल्याचे दिसून आले. सबब बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे हे सध्या द्वारावती निवासस्थानाकडे काम करीत असून त्यांचे काम समाधान कारक असून त्यांचेबाबत कोणतीही तक्रार नसल्याने त्यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. त्यांना दररोज ७६ कर्मचारी पुरविणेबाबत अट घालण्यात यावी,असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,द्वारावती)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१०** **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरमध्ये युरोलॉजी ओ.टी. टेबल खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपडीक, जनरल व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने खालीलप्रमाणे मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या असलेली काही मशिनरी / उपकरणे / फर्नीचर वापरुन खराब झालेले आहेत, तर काही नविन मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची त्यांना आवश्यकता आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.७०१ अन्वये सदरची मशिनरी / उपकरणे / फर्नीचर खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई या इंग्रजी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.०६/१०/२०१० ते १६/१०/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.१८/१०/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २० उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ३६७३ दि.०४/१०/२०१० अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ५ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात १ निविदा अशा एकूण ६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या, प्राप्त ०६ तांत्रिक बार्बीच्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० रोजीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बार्बीचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला आहे. त्यामध्ये सदर टेबल खरेदीकामी चार निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले अूसन त्यांचा तक्ता संबंधीत श्री साईबाबा रुग्णालयातील मानद युरोलॉजिस्ट डॉ. पटणी यांना दाखविण्यात आला असता त्यांनी M/s. Staan Bio-Med Engineering Pvt. Ltd., Coimbatore, Model - Glory या भारतीय कंपनीच्या टेबलची शिफारस केलेली आहे.

सदर टेबल खरेदीकामी प्राप्त झालेल्या चार Commercial बाबींच्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून तो सोबत सादर केला आहे. त्यातील तीन निविदा धारकांनी परदेशी कंपनीचे दर दिलेले आहेत तर M/s. Staan Bio-Med Engi., Coimbatore यांनी भारतीय कंपनीचे दर दिलेले आहेत. सदर तुलनात्मक तक्त्यावर श्री साईबाबा रुग्णालयातील मानद युरोलॉजिस्ट डॉ. राजन पाटणी यांनी M/s. Staan Bio-Med Engi., Coimbatore (Indian - Make) यांची शिफारस केलेली आहे. भारतीय कंपनीचे मॉडेल करीता एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झाल्यामुळे स्पर्धात्मक दर मिळणार नाही त्यामुळे स्पर्धात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने परदेशी कंपनीचे प्राप्त निम्नतम दर असलेले M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai यांना देखील समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलवुन निर्णय घेता येईल.

त्यानूसार उपरोक्त दोन निविदा धारकांना आजचे सभेपुढे बोलविण्यात आलेले आले होते, त्यापैकी M/s. Staan Bio-Med Engi., Coimbatore हे निविदाधारक आजचे सभेपुढे उपस्थित होते, त्यांनी देऊ केलेल्या सुटीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Staan Bio-Med Engi., Coimbatore | Summit Healthcare (P) Ltd., Mumbai | Maquet Medical, Mumbai | Esbee Dynamed, Mumbai |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | O.T. Table for Urology Surgery | 1 | Make - Own / Model - Glory | Make - Belmont Model - DR-2600Y | Make- MAQUET GmbH & Co KG /Model- Betastar Mobile OT. Table | Make - Schaerer Medical / Model - Axis 300E |
| | | | | | Part No. 1131.12B0 - BETASTAR mobile operating table, electrohydraulic, without cable-connected hand control, head plate, extension plate or leg plates, with SFC padding | Cat No. 580002 - Schaerer Axis 300 E Mobile Operating Table without Head rest and leg plated, with corded hand control. Electro-hydraulic and manual adjustments. |
| | Rate Per in Rs | | 450000.00 | ¥3254554 1 Yen-0.55 =1790004.70 + Customs Duty 19.68%=352272.92 Clearing Charges 1% - 17900.05 & Transportation Charges = 10000=Total Landed Cost = 2170177.67 | € 36751 1 Euro=App.60.00 =App.2205060.00 + Customs Duty 19.6%=432191.76 Clearing Charges & Transportation Charges 1.4% = 36921.5246 =Total Landed Cost = App.2674173.2876 | €32690 1 Euro-62.00 =2026780.00 + Customs Duty 19.86%=402518.51 Clearing Charges 1% - 20267.80 & Transportation Charges = 10000=Total Landed Cost = 2459566.31 |
| | Total Amt. in | | **450000.00** | **2170177.67** | **2674173.29** | **2459566.31** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Rs.** | | | | | |
| | **Warranty** | | 2 Year | 2 Years | 1 Year | 2 Year |
| | **AMC** | | 1st Year- Rs.14625.00<br>2nd Year- Rs.18000.00<br>3rd Year- Rs.19125.00<br>4th Year- Rs.20250.00<br>5th Year- Rs.21375.00 | 3% quoted value. & there after 5% escalation every year till the last year. | AMC will be charged at 3% with an escalation of 10% over pervious Year. Service tax will be additional and charged as applicable | 1st Year- Rs.50650.00<br>2nd Year- Rs.55700.00<br>3rd Year- Rs.61300.00<br>4th Year- Rs.67400.00<br>5th Year- Rs.74100.00<br>Service tax is currently at 10.3% and shall be charged at the rate applicable at the time of billing |
| | **CMC** | | 1st Year- Rs31500.00<br>2nd Year- Rs.34875.00<br>3rd Year- Rs.36000.00<br>4th Year- Rs.37125.00<br>5th Year- Rs.38250.00 | 8% quoted value. & there after 5% escalation every year till the last year. | CMC will be charged at 7% with an escalation of 10% over pervious Year. Service tax will be additional and charged as applicable | 1st Year- Rs.162100.00<br>2nd Year- Rs.178350.00<br>3rd Year- Rs.196150.00<br>4th Year- Rs.215800.00<br>5th Year- Rs.237400.00<br>Service tax is currently at 10.3% and shall be charged at the rate applicable at the time of billing |
| | **Payment** | | | Through L/C | Through L/C | Through L/C |
| **Rate After Negotiation** | | | | | | |
| | **Total Amt. in Rs.** | | 440000.00 | Absent | | |
| | **Warranty** | | 3Year | | | |
| | **AMC** | | 1st Year- Rs.14625.00<br>2nd Year- Rs.18000.00<br>3rd Year- Rs.19125.00<br>4th Year- Rs.20250.00<br>5th Year- Rs.21375.00 | | | |
| | **CMC** | | 4th Year- Rs.29925.00 5th Year- Rs.33131.00 6th Year- Rs.34200.00 7th Year- Rs.35269.00 8th Year- Rs.36338.00 | | | |

**निर्णय क्र.२१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चर्चा / वाटाघाटी नुसार निम्नतम दर असलेले M/s. Staan Bio-Med Engineering Pvt. Ltd., Coimbatore यांचेकडून रु.४,४०,०००/- (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत खरेदीस तसेच तीन वर्ष वॉरंटी कालावधी संपल्यानंतर त्यांचेकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC & CMC) आवश्यकतेनुसार करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.११** **नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीकामी निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविण्यासाठी मे.टॉप्स सिक्युरिटी लि., मुंबई, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक व मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी.) यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सध्या कार्यरत असलेल्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत अनुक्रमे दि.२०-०३-२०१० व दि.२४-०५-२०१० अखेर संपलेली आहे. त्यामुळे पुढील दोन वर्ष कालावधीसाठी संस्थानला सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलीत पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत वरील सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०३-२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३०८ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे.

वरील सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीने पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमुद केलेल्या सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी कंत्राटी सुरक्षा कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण |
| १. | मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | १८४ | ०४ | १८८ |
| २. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडीया) लि., नाशिक (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | १७५ | १० | १८५ |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | ८३ | २२ | १०५ |
| | **एकूण-** | **४४२** | **३६** | **४७८** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



संस्थानला अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील दोन वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या. त्यास अनुसरून मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे शिर्डी कार्यालयास-२६ व मुंबई कार्यालयास-१३ अशा एकूण-३९ "सिलबंद निविदा" प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त झालेल्या ३९ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-१०-२०१० रोजीचे सभेमध्ये उघडणेत आल्या. त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, तो मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५-१२-२०१० रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला. सदर दिवशी उपस्थित २९ ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरांसंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देवू केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरूपात बंद पाकीटात आजच सादर करावीत असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांचे सर्व्हिस चार्जेस दर न्युनतम आहे अशा प्रत्येकी ०५ ठेकेदारांनाच पुढील सभेपुढे अंतिम चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत यावे असे ठरले.

चर्चा/वाटाघाटीचे वेळी उपस्थित २९ ठेकेदारांपैकी २८ ठेकेदारांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकीटे) प्राप्त झालेले असून, ते मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, सदर तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०२-२०११ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, न्युनतम सर्व्हिस चार्जेस दराच्या ०५ निविदा सादरकर्त्यांमध्ये मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांचे दर न्युनतम आहेत. परंतू त्यांचा संस्थानमधील पुर्वीचे कामाचा अनुभव समाधानकारक नसल्यामुळे, त्यांना वगळून ०५ न्युनतम सर्व्हिस चार्जेस दराच्या निविदा सादरकर्त्यांना पुढील सभेपुढे अंतिम चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत यावे असे ठरले. त्यास अनुसरून मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेपुढे २४ ठेकेदारांनी देऊ केलेल्या अंतिम सुधारीत दरांबाबत तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सादर करणेत येऊन, संबंधीत ०५ न्युनतम सर्व्हिस चार्जेस दराच्या ठेकेदारांना अंतिम चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. त्याप्रमाणे उपस्थित ठेकेदारांशी दराबाबत चर्चा/वाटाघाटी होवून, संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी पात्रताधारक सर्व निविदा धारकांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे अंतिम चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत यावे असे ठरले.

त्यास अनुसरून २४ ठेकेदारांनी देऊ केलेल्या अंतिम सुधारीत दरांबाबत तुलनात्मक तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केलेला असून,संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी पात्रताधारक २२ निविदा धारकांना/ठेकेदारांना अंतिम चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

<u>(वार्षीक उलाढाल रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त असलेले ठेकेदार)</u>

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) रुपये (३६०.००) | सुरक्षा सु.वायझर (माजी सैनिक) रुपये (२६७.९०) | सशस्त्र सु.रक्षक (माजी सैनिक) रुपये (२२१.३५) | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) रुपये (२००.१०) | सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री) सिव्हीलियन (कि.वे.दर रु.१८८.१३) | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) (०.७५%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| ०१ | **मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, मुंबई-४०० ०६५.** | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३८०.०० | ३००.०० | ३२५.०० | २७५.०० | १५८.६२ | २.५०% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३८०.०० | ३००.०० | ३२५.०० | २७५.०० | १५८.६२ | २.५०% |
| ०२ | **चेकमेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लि.,** बडोदरा-(गुजरात) | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ५०१.०० | ३९५.०० | ४३८.०० | ३५२.०० | ३१८.०० | ८% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०३ | **मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यु.(इं) लि.,** नाशिक **अपात्र** | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३२३.०६ | २८४.६० | ३१५.३७ | २४६.१४ | १७६.९१ | ०.७५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३२३.०६ | २८४.६० | ३१५.३७ | २४६.१४ | १७६.९१ | ०.७५% |
| ०४ | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे-४११ ०१९** | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | १७६.९२ | ०.२% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | निविदा मागे घेण्यात आली. | | | | | |
| ०५ | **मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,** पुणे | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | ०.५५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | **३८५.००** | **२८९.३३** | **२६५.७९** | **२१९.१०** | **१८८.१३** | **०.५%** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | **ग्रुप सेवन गार्ड्स (इंडिया) प्रा.लिमिटेड,** नाशिक | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३९१.०० | ३६८.०० | २६०.०० | २४५.०० | १७६.९२ | ८% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३९१.०० | ३६८.०० | २६०.०० | २४५.०० | १७६.९२ | ५% |
| ०७ | **फ्रन्टलाईन गार्ड्स प्रा.लि.** मुंबई-४०० ०८६ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३२३.०७ | २८४.६१ | २५७.६८ | २१९.२२ | १६१.५३ | ०.७५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३२३.०७ | २८४.६१ | २५७.६८ | २१९.२२ | १६१.५३ | ०.३०% |
| ०८ | **मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,**पुणे **अपात्र** | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३५०.०० | २६५.४९ | २७८.४१ | २३०.०० | २००.८७ | ०.००५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०९ | **संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड,** नाशिक | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | १% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | १% |
| १० | **जय भवानी एन्टरप्रायजेस,** पुणे-४११ ०१९ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | १७६.९२ | ५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | १७६.९२ | ४ % |
| ११ | **परांजपे स्किमस प्रॉपर्टीज सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड,**पुणे | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३८०.०० | ३००.०० | २८०.०० | २६०.०० | १९५.०० | ०.४०% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३८०.०० | ३००.०० | २८०.०० | २६०.०० | १९५.०० | ०.४०% |
| १२ | **एजीस फॅसिलिटी ॲन्ड मॅनेजमेंट सर्व्हिसेस,** पुणे | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३५८.०० | ३२०.०० | ३४५.०० | २९५.०० | २७०.०० | ४% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १३ | **इंडस्ट्रियल गार्ड्स सर्व्हिसेस प्रा.लि.,** ठाणे-४०० ६०२ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३७५.०० | ३००.०० | २७०.०० | २३०.०० | १७४.०० | ७.५०% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १४ | **मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,** मुंबई | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३६०.०० | ३००.०० | ३००.०० | २००.१० | १७६.९२ | ०१% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | **३८५.००** | **२८९.३३** | **२६५.७९** | **२१९.१०** | **१८८.१३** | **०.५%** |
| १५ | **जीके सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.** मुंबई-४०० ०२१ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३८५.०० | २८९.३३ | २६५.७९ | २१९.१० | १७६.९१ | नमुद केलेली नाही ७.००% (निविदेप्रमाणे) |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | **३८५.००** | **२८९.३३** | **२६५.७९** | **२१९.१०** | **१८८.१३** | **०.५** % |
| १६ | **ट्रीगर फॅसिलिटी प्रा.लि.,** मुंबई ४०० १०२ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | १७६.९२ | १.००% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | १७६.९२ | ०.८% |
| १७ | **सागर सर्व्हिस एजन्सी** औंध, पुणे-४११ ००७. | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | ०.६०% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | ०.०२% |
| १८ | **मे.गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट** (नागपूर) प्रा.लि.,मुंबई | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | २८०.०० | २५०.०० | २७५.०० | १९९.०० | १८५.०० | २% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | २८४.६० | २३०.७६ | ३०७.६८ | १७६.९१ | १७६.९१ | १ % |
| १९ | **रिलायंन्स एन्टरप्राईजेस,**कॅम्प, पुणे-४११ ००१ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३६०.०० | २६७.९० | २२१.०० | २००.०० | १७६.९२ | ४.७१% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २० | **मे.ईगल आय एन्टरप्राईज,**वापी-दमन रोड, दमन(यु.टी.) | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ४१०.०० | ३१७.०० | २७१.०० | २५०.०० | १७६.०० | ५% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | **३८५.००** | **२८९.३३** | **२६५.७९** | **२१९.१०** | **१८८.१३** | **०.५%** |
| २१ | **मे.लिओज ब्रिगेड,**वाशी, नवी मुंबई-४३० ००५ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | ३५०.०० | २३५.०० | ३००.०० | २२०.०० | १९५.०० | ३% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २२ | **मे.श्री स्वामी सर्व्हिसेस,** चिंचवड, पुणे-४११०१९ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | २८६.४८ | २४९.१२ | २६४.२७ | २३४.९९ | १९५.६२ | ४.२१% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | २८६.४८ | २४९.१२ | २६४.२७ | २३४.९९ | १९५.६२ | ३.२५% |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | **रक्षक सिक्युरिटी फोर्स,** धायरी, पुणे-४११०४१ | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | १९१.०० | १८७.०० | ३८३.०० | १८७.०० | १८३.०० | ४% |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | **३८५.००** | **२८९.३३** | **२६५.७९** | **२१९.१०** | **१८८.१३** | **०.५%** |

**निर्णय क्र.२११** **यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानला कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर सुरक्षा कामगार पुरविणेकामी खालील ०५ ठेकेदारांची/एजन्सीची कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेची क्षमता व पात्रता विचारात घेऊन, तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीप्रमाणे किमान वेतन दरापेक्षा कमी दर अनुज्ञेय नसल्यामुळे सदरची बाब विचारात घेऊन, सदर ठेकेदारांनी चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे देऊ केलेले वेतनदर मान्य करण्यात यावे व त्यांना दि.०१-०५-२०११ पासून पुढे ०२ वर्षे कालावधीसाठी कार्यादेश देणेत यावा असे ठरले.**

**१) मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., औंध, पुणे-४११ ००७.**
**२) मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६.**
**३) जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,नरिमन पॉईट, मुंबई-४०० ०२१**
**४) रक्षक सिक्युरिटी फोर्स, धायरी, पुणे-४११ ०४१.**
**५) मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी-दमन रोड, दमन (यु.टी.)**

**या निविदा सादरकर्त्यांना खालीलप्रमाणे वेतनदर देणेत यावा.**

**अ) सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक)-रूपये-३८५.००/- प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)**
**ब) सुरक्षा पर्यवेक्षक (माजी सैनिक)-रूपये-२८९.३३/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)**
**क) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक)-रूपये-२६५.७९/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)**
**ड) सुरक्षा गार्ड (माजी सैनिक)-रूपये-२१९.१०/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)**
**इ) सुरक्षा गार्ड (सिव्हीलीयन/पुरूष, स्त्री)-रूपये-१८८.१३/- प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)**
**ई) सुरक्षा गार्ड (मुंबई कार्यालय, झोन नं.०१)-रूपये-२११.२१/-प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)**
**फ) व्यायामशाळा प्रशिक्षक/लिपीक (कुशल)-रूपये-२१८.९०/-प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)**

**उपरोक्त पाचही निविदा सादरकर्त्यांना/ठेकेदारांना किमान वेतनदर/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदरावर ०.५०% इतका सर्व्हिस चार्ज, अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर १०.३०% इतका सर्व्हिस टॅक्स अधिक प्रॉव्हीडंड फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१% इतकी रक्कम, अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इंन्शुरंन्स पॉलीसी प्रिमियम (अंशदान), याप्रमाणे रक्कम देणेत यावी. तसेच माहे-ऑक्टोबर ते सप्टेंबर या एक वर्ष कालावधीत याप्रमाणे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाचे रक्कमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कंत्राटी सुरक्षा कामगारांना दिपावली सणाचे अगोदर अदा करणेकामी देणेत यावी.**

**उपरोक्त दर हे सध्या लागु असलेले किमान वेतनदर, भविष्यनिर्वाह निधी, सर्व्हिस टॅक्स यास अधिन राहून आहेत. केवळ किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदी अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (मुंबई कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंट फंड अधिनियम अंतर्गत प्रॉव्हीडंट फंड अंशदान दर, व सर्व्हिस टॅक्स दर यातच वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारीत दर लागु करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहेत.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी/उपकरणे खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या (Technical Bid) निविदा उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर विभागासाठी Flexible Fibreoptic Bronchoscope -१ नग खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,३६,०००/- चे खर्चास, श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन टी. ऑपरेशन थिएटर विभागासाठी ऑपरेटींग मायक्रोस्कोप-१ नग खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३३,९१,२५६/- चे खर्चास तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेत श्री साईनाथ रक्तपेढीकरीता Apheresis मशिन -१ नग व Fully Automatic Elisa System मशिन -१ नग खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३५,००,०००/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



निविदा विक्रीची मुदत दि.१६/०१/२०११ ते २८/०१/२०११ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.३१/०१/२०११ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २८ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ६१७४ दि.११/०१/२०११ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०९ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा अशा एकूण १० निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Ark Diagnostics Pvt. Ltd., Mumbai | 24/01/2011 |
| 2 | Carl Zeiss India (Bangalore) Pvt.Ltd., Mumbai | 31/01/2011 |
| 3 | Krish Bio-Sciences, Vasai (West) Dist Thane | 20/01/2011 |
| 4 | Lab india Instrument Pvt. Ltd., Thane | 31/01/2011 |
| 5 | Mitra Medical Service LLP, New Delhi | 31/01/2011 |
| 6 | Paradigm Medivision Pvt. Ltd., Mumbai | 20/01/2011 |
| 7 | South India Surgical Co. Ltd., Mumbai | 31/01/2011 |
| 8 | Sterling Healthcare, Mumbai | 31/01/2011 |
| 9 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai | 31/01/2011 |
| 10 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 31/01/2011 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या १० तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१२** **उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या १० तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदाबाबत तज्ञांचा सल्ला घेऊन, प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३** **सन २०११-१२ साठी प्रसादालय व कॅन्टीन वार्षिक किराणा माल व तांदुळ खरेदी... निविदा उघडणे व नमुने निवडणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व तांदुळ वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.०२.२०११ मध्ये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्या-नुसार दि.२८.०२.२०११ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०१.०३.२०११ ते दि.१०.०३.२०११ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१२.०३.२०११ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे. तरी प्राप्त निविदा आपलेसमक्ष उघडुन मालाचे नमुने निवडणेत यावेत असे नम्र मत आहे. निविडलेल्या नमुना धारकांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानच्या काळात निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम, कागदपत्रे व नमुने नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही. प्राप्त निविदांचा तपशील सोबतच्या परिशिष्टात सादर करणेत येत आहे.

तरी प्राप्त निविदाधारकांच्या निविदा उघडून, नमुने निवडणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ साठी प्रसादालय व कॅन्टीन वार्षिक किराणा माल व तांदुळ खरेदीकामी मागवीण्यात आलेला लिफाफा क्र.०२ आजचे सभेत समक्ष उघडण्यात आला. सन २०११-१२ साठी प्रसादालय व कॅन्टीन वार्षिक किराणा माल व तांदुळ नमुने निवडणेकामी स्थानिक समितीच्या सभेत निर्णय घेण्यात यावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री साई प्रसादालय आतील भागाचे रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय हे दि. ०८/०१/२००९ पासून साई भक्तांसाठी प्रसाद भोजन घेणेकरीता खुले करण्यात आले आहे. श्री साई प्रसादालय येथे प्रसादभोजन घेणेकरीता साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच उत्सव काळात व सुट्ट्यांचे दिवशी मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अधिक्षक श्री साई प्रसादालय यांनी दि.२०/११/२०१० रोजीचे पत्राव्दारे सर्व्हिस पॅसेज व आवश्यक त्या ठिकाणी रंगकाम करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रसादालयाचे मुख्य डायनींग हॉलमध्ये जेवण घेतल्यानंतर भक्त हात धुणेकरीता हॉलचे बाहेर पडताना पॅसेजमधील भिंतींना हात लागल्यामुळे भिंतीचे रंगकाम खराब झालेले आहे. तसेच भिंतीचे सिरॅमिक फरशीवरील डाग साफ सफाई करणेचे दरम्यान पाणी उडाल्यामुळे पावसाचे पाणी व ड्रेनेज

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पाईपचे लिकेजमुळे व Expansion जॉईंटमधून लिकेज झालेल्या पाण्यामुळे रंगकाम खराब झालेले आहे. किचनमधील धुरामुळे चपाती किचन मुख्य किचन व लाडू बर्फी किचनमधील भिंतीचे सिलींगचे रंगकाम खराब झालेले आहे. त्यामुळे श्री साई प्रसादालय इमारतीचे संपूर्ण आतिल भागास रंगकाम करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर इमारतीतील निरनिराळ्या भागांची क्वांटीटी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक |
|---|---|---|---|
| | साई प्रसादालय इमारतीचे आतिल भागातील सिलींग व भिंतीचे मॅट फिनीश ऑईल पेंटमध्ये रंगकाम करणे | | |
| ०१ | बुंदी किचन | २८०४.०० | चौ.मी. |
| ०२ | मुख्य किचन | ४७७७.०० | चौ.मी. |
| ०३ | मुख्य डायनिंग हॉल, पॅसेज व ऑफीस | ७०१६.०० | चौ.मी. |
| ०४ | प्रतिक्षा रांग | ४९६५.०० | चौ.मी. |
| ०५ | उप भांडार | २४१५.०० | चौ.मी. |
| ०६ | अन्नदान, इलेक्ट्रीक रुम, पंपरुम जनरल संडास बाथरुम व चेन्जीग रुम | २१२५.०० | चौ.मी. |
| ०६ | पहिल्या मजल्यावरील डायनींग हॉल | ६१५०.०० | चौ.मी. |
| ०७ | सुशोभित डोमचे स्ट्रक्चरल स्टीलसह रंगकाम | ६२६८.०० | चौ.मी. |
| ०८ | श्री प्रसादालय इमारतीमधील दरवाजे फ्रेम, रेलिंग, ग्रील गेट व खिडक्या इ. चे रंगकाम | ७००.०० | चौ.मी |
| | **एकूण** | **३७२२०.००** | चौ.मी. |

श्री साई प्रसादालय प्रमुख यांनी दि.२०/११/२०१० रोजीचे पत्रान्वये खराब भागातील रंगकाम करणेकामी कळविले आहे. श्री साईप्रसादालय श्री साईभक्तांसाठी प्रसाद भोजन घेणेकामी २००९ पासून सुरु केलेले असून त्यानंतर दोन वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे त्यामुळे आतिल संपूर्ण भागाचे रंगकाम करणे गरजेचे आहे. वर नमूद केलेप्रमाणे एकूण क्वांटीटीचे रंगकामासाठी अंदाजे एकूण रु.२६,५७,५०८/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास व याकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईप्रसादालयात आतिल भागाचे रंगकामाबाबत मा.स्थानिक समिती सदस्यांनी पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१५** **श्री साई प्रसादालय येथे बुकस्टॉल व किचनमध्ये ॲल्युमिनीअम पार्टीशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे मुख्य किचन, उपभांडार व लाडू किचन या ठिकाणचे कर्मचाऱ्यांचे कामावर नियत्रण रहाणेसाठी पर्यवेक्षकीय काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता केबीन बनवून मिळणेबाबत श्री साई प्रसादालय विभागाने मागणी केलेली आहे. याकामी प्रसादालय प्रमुख यांनी दाखविलेल्या जागेत एक फुट उंचीचे वीट बांधकामा मध्ये प्लॅटफॉर्म तयार करुन त्यावर ७ फुट उंचीचे ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये सोबतचे नकाशात दर्शविल्याप्रमाणे खालीलप्रमाणे केबीन तयार करता येईल.

| अ.नं. | तपशिल | साईज |
|---|---|---|
| ०१. | मुख्य किचन मध्ये पश्चिम उत्तर कोपऱ्यात | १०'x९'-६" |
| ०२. | बुंदी किचनमध्ये | १३'x७'-६" |
| ०३. | उप भांडाराकरीता शितगृहाशेजारी | १४'-३" |
| ०४. | बुकस्टॉल | १४'x११'-१" |

याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing & Fixing single leaf Alluminium door frame with shutter as per drwg. | 9.53 | M2 | 4000 | 38,120/- |
| 02 | Providing & Fixing Glazed Alluminium partition | 59.20 | M2 | 1700/- | 1,06,640/- |
| 03 | Providing Brick Masonry in Cement mortor 1:6 | 0.75 | M3 | 2200/- | 1650/- |
| 04 | Providing Cement Plaster 12 mm thk in single coat in c.m.1:5 | 6.66 | M2 | 74/- | 492.84 |
| 05 | P & F Ceramic tiles of approved qualify and size 7 mm thk for dado | 3.33 | M2 | 710/- | 2364.30 |
| 06 | P & L Ceramic Tiles of approved quality and size 7 mm thk for flooring | 17.91 | M2 | 680/- | 12,178.80 |
| | | | | Total | 1,55,445.94 |
| | | | | Add Contengencies 5% | 7,772.00 |
| | | | | **Total Rs.** | **1,63,218.00** |

सदरहू कामातील ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन करणेचे काम ठेकेदारामार्फत कोटेशन मागवून करता येईल तसेच प्लॅटफॉर्मचे काम विभागामार्फत मटेरीअल खरेदी करुन करता येईल. वरीलपैकी बुकस्टॉल येथे स्टेशनरी ठेवणेसाठी आवश्यक असलेल्या अल्युमिनीअम केबिनचे काम दि.12/02/2010 चे टिपणीवरील मंजुरीअन्वये करुन घेण्यात आले असून त्यासाठी रु.32,436/- मात्र

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इतका खर्च आलेला आहे. त्यास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. तसेच त्यासह वरीलप्रमाणे येणारे एकूण रु.1,63,218/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरहू काम स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बुक स्टॉलचे कामाचे बिल आदा करावे, किचनमध्ये प्रस्तावित असलेले अल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन करणेचे काम स्थगित ठेवण्यात यावे, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६** **कनकुरी येथील गोदावरी उजवा तट कालव्यावरील साठवण तलाव इनटेक गेटची दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे शिर्डी कनकुरी पिंपळवाडी एकत्रीत पाणी पुरवठा योजनेच्या तलावात कॅनालचे पाणी घेणेसाठी कनकुरी शिवारात पाटावर गेट बसविण्यात आलेले आहे. सदरचे गेट नादुरुस्त होऊन त्याठिकाणी गेटचे बांधकाम ढासळलेले आहे. तसेच बांधकामांवरील कॉंक्रीट कोपींग पडलेले आहे. त्यामुळे अशा स्थितीत गेट केंव्हाही पडू शकते व पाणी पुरवठा चालू केल्यास पाणी बंद करणे शक्य होणार नाही असे शाखाधिकारी, सिंचन शाखा शिर्डी यांनी कळविले आहे.

याबाबत पाणी पुरवठा विभागाकडून तात्पुरत्या स्वरुपात गेटची वेल्डींग करुन दुरुस्ती करण्यात आलेली असून बांधकामाची दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याने सदरचे काम इकडील विभागामार्फत तात्काळ करुन मिळणेस विनंती केली आहे. त्यामुळे सदरचे ठिकाणी कॉंक्रीटमध्ये नविन बांधकाम करणे तसेच नविन लोखंडी दरवाजा बसविणे आवश्यक आहे. याकामी कॅनाल बाजुकडील भिंतीचे व गेटचे बाजुचे विंग वॉलचे M-१५ ग्रेडमध्ये कॉंक्रीटींग करणेकामी व एम.एस. गेटबसविणेकामी अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) मटेरीअल खर्च :-**

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सिमेंट | १३७ | गोणी | २८०/- | ३८,३६०/- |
| ०२ | खडी | ८.०० | ब्रास | २०००/- | १६,०००/- |
| ०३ | वाळू | ४.०० | ब्रास | ३०००/- | १२०००/- |
| ०४ | एम.एस.गेट | ०१ | नग | L.S | ३००००/- |
| ०५ | एम.एस.स्टील | २०० | किलो | ३८.५० | ७,७००/- |
| ०६ | जे.सी.बी. मशीनव्दारे खोदकाम व रिफीलींग करणे | ११ | तास | ४९५/- | ५४४५/- |
| | | | | एकूण रुपये | १,०९,५०५ /- |
| | | अधिक ५% Contengencis | | | ५,४७५.२५ |
| | | | | **पूर्णांकीत रुपये** | **१,१४,९८०/-** |

**ब) मजुरी खर्च :-**

शटरींगसह कॉंक्रीटचे काम करणेकामी अंदाजे रु. ४२/- प्रती घनफुट प्रमाणे रु. ३१,५८४/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. अशा प्रकारे कॅनालचे बाजुकडील हेडवॉल व वींग वॉलचे कॉंक्रीट कामाकरीता व एम.एस. गेट बसविणेकामी मटेरीअल व मजुरीसह एकूण अंदाजे रु.१,४६,५६४/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर कामातील एम.एस.गेट पाणीपुरवठा विभागामार्फत तयार करुन बसविता येईल.

तरी याकामी वरीलप्रमाणे येणारे रु.१,४६,५६४/- मात्रचे अंदाजे खर्चास व आवश्यक मटेरीअल खरेदी करुन काम मजुरी ठेकेदारामार्फत विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करुन घेण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन,कनकुरी येथील गोदावरी उजवा तट कालव्यावरील साठवण तलाव इनटेक गेटची दुरुस्ती कामी येणारे रु.१,४६,५६४/- मात्रचे अंदाजे खर्चास तसेच याकामी आवश्यक मटेरीअल खरेदी करुन काम मजुरी ठेकेदारामार्फत विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७** **श्री साई प्रसादालय इमारत साईटेक प्रकल्पासाठी डाटा सेंटर हॉल डोमचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांसाठी साईटेक प्रकल्पांतर्गत नविन अद्ययावत संगणक प्रणाली व संगणकीय जाळे उभारणीची कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा. श्री.के.व्ही.रमणी सो., यांचे मार्गदर्शनाखाली व Congnizant Technology Solutions, Pune यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकल्पासाठी संस्थानचे श्री साई प्रसादालय इमारतीचे पहिल्या मजल्यावरील उत्तरेकडील हॉलमध्ये डाटा सेंटर रुमचे बांधकाम करण्यात आलेले आहे. उपरोक्त डाटा सेंटर हॉलकरीता मूळचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्रसादालय बांधकामामध्ये डोमचे आकर्षक छत तयार करण्यात आलेले आहे. सदर डोमचे मध्यवर्ती भागातील छतास पॉलीकाबार्नेट शिट बसविण्यात आलेले आहे. सदरचे शिट खराब झाल्यामुळे व व्हेन्टीलेटर मधून अवकाळी पावसात हॉलमध्ये पाण्याची गळती होते. याकामी तातडीने तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. तसेच जोरदार पावसादरम्यान कौलारु छतातील काही भागातून पाण्याची गळती झाली होती. त्याचीही त्वरीत दुरुस्ती करणेत आली. सदर ठिकाणी डाटा सेंटर उभारणेत आलेले आहे. साईटेक प्रकल्पाचे कामकाज तेथून चालणार आहे. त्यासाठी किंमती उपकरणे बसविण्यात आलेली आहेत. त्यामुळे तेथे पावसाचे पाण्याची गळती होऊ नये यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदर डेटा सेंअर हॉलवरील दोन डोमचे खालिलप्रमाणे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**अ)** पावसाचे पाण्याची गळती थांबविणे कामी म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेकामी सध्याचे पॉलिकार्बोनेट डोमवर PVDF fabrics make SIOEN N.V. tensile Fabric मध्ये tensile membrane structure तयार करणे त्यासाठी ६०० ते ८०० GSM जाडीचे Transparent mesh weave पीव्हीसी फॅब्रीक टाकणेकामी प्रती डोमनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | Structure made in translucent type 'o' 650 gsm fabric with colour (Life of Fabric 8 Years) | 1,10,000.00 |
| | add vat 8% & Service tax 4.08% | 13,288.00 |
| | | 1,23,288.00 |
| | Transport charges per trip | 6,300.00 |
| | **Total amount** | **1,29,588.00** |

**ब)** तसेच डोमचे छतावर बसविण्यात आलेल्या कौलामधून पाण्याची गळती थांबविणेकरीता प्रतिबंधक उपाय योजना करणेकामी सध्याचे कौले काढून त्याठिकाणी गॅल्व्होल्युम अथवा तत्सम कलर कोटेड शिट बसविणेकामी प्रति डोमनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Removing Mangalore and riddge tiles with battens, ridge & barge boards, boards etc and stacking the materials | 355.00 | sqm | 50/- | 17,750/- |
| 02 | Providing & Fixing glavalume or equivalent colour coated sheets | 355.00 | sqm | 581/- | 2,06,255/- |
| 03 | Providing fixing galvalume sheets over the riddge, hip or valley for gulvalume shect roofing including fastening with G.I. screws & bots. | 40.00 | RMt | 480/- | 19,200/- |
| 04 | Providing & fiabricating structural steel work in trusses, purlins with all bracing as per detailed drawing | 2.50 | M.T. | 70,000/- | 1,75,000/- |
| | | | | Total | 4,18,205/- |
| | | | | Add contingencies @ 5% | 20,910/- |
| | | | | **Total Amount** | **4,39,115/-** |

वरीलप्रमाणे पूर्वीचेच छतावर फॅब्रीक बसविणेकामी व कौलांचे ठिकाणी कलर कोटेड शिट बसविणेकामी अनुक्रमे रु.१,२९,५८८.०० व ४,३९,११५/- असा मिळून एकूण ५,६८,७०३/- प्रती डोम खर्च येणार आहे. अशाप्रकारे डेटा सेंटर हॉलचे दोन डोमचे छतावर उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती करणेकामी रक्कम रु.११,३७,४०६/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी श्री साईप्रसादालय येथील डेटा सेंटर हॉलचे छताचे डोमचे नूतनीकरणासाठी येणारे एकूण अंदाजे पुर्णांकीत रु.११.४० लक्ष मात्रचे अपेक्षित खर्चास व सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामासाठी श्री साई प्रसादालय प्रकल्पाचे आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांची सेवा घेणेत यावी. आर्किटेक्ट यांचे सल्ल्यानुसार, साईटेक प्रकल्पाचे डाटा सेंटर हॉल डोमचे नूतनीकरण सुधारित निविदा, बांधकाम आराखडा तयार करुन घेणेत यावा. याकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत याव्यात. सदर कामासाठी येणाऱ्या अंदाजे रु.११.४० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१८** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना संस्थान ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., यांची किमान अंतरिम बिल मर्यादा कमी करणेकामी केलेल्या विनंती बाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायतीचे प्रस्तावानुसार शहरातील रस्ते विकसीत करणेची कामे MSRDC व संस्थानमार्फत चालू आहे. संस्थानमार्फत चालू असलेल्या सहा रस्त्यांचे कामाची निविदा ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांना रु. ३३.८३ कोटी मात्र रकमेस देणेत आले आहे. आजअखेर खालील रस्त्यांचे कामे प्रगतीपथावर आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| रस्ता क्र. | रस्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | नांदुर्खी रस्ता -१८ मीटर रुंदी (नगर मनमाड रस्ता ते नांदुर्खी शीव रस्ता) लांबी -२०००मी. |
| ०२. | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता :- (नवीन पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता आरक्षण क्र.३१ पोहच ) लांबी-५५०मी. |
| ०३. | विकास योजनेतील २४ मीटर वळण रस्ता :- (नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचा रस्ता) लांबी -४५०मी. |
| ०४. | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा हॅाटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर रस्ता (पिंपळवाडी रस्ता-निमगांव शीव रस्ता) लांबी-४५०मी. |

तसेच इतर रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.

ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि. यांनी त्यांचे दि.०४/०२/२०११चे पत्रान्वये निविदेतील अट क्र.६०.२ नुसार घालून दिलेली रु.२.५० कोटी ही किमान अंतरिम बिल मर्यादा (Minimum amount of R.A.Bill) गाठणे सद्यस्थितीत कामाचे स्वरूप लक्षात घेता कठीण असल्याने ती कमी करून त्याऐवजी त्यांना किमान अंतरिम बिल मर्यादा विचारात न घेता दर महिन्याला जे बिल होईल ते अदा केल्यास कामाची गती राखता येईल, अशी विनंती केली आहे.

सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी त्यांचे दि.०४/०२/२०११ चे पत्रान्वये उपरोक्त विनंतीबाबत दि.०३/०२/२०११चे प्रकल्प आढावा बैठकीतील चर्चेचा संदर्भ घेवून खालीलप्रमाणे कळविले आहे.

निविदेतील अट क्र.६०.२ ही किमान अंतरिम बिल मर्यादा (Minimum amount of R.A.Bill) निश्चित करणारी अट सरासरी मासिक प्रगतीवर आधारीत आहे.

वाढलेला पावसाळा व काही प्रशासकीय अडचणींमुळे सुरुवातीच्या काळात कामासाठी रस्ते उपलब्ध होवू झाले नाहीत.

जलवाहिन्या, विद्यूतवाहिन्या स्थलांतरीत करणे तसेच गर्दीच्या भागात काम होते.

ठेकेदार यांनी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ स्थलांतरणाचे काम समाधानकारकरित्या पुर्ण केले आहे.

ठेकेदार यांनी अंदाजे रु.६० लक्ष रकमेचे काम पूर्ण केले आहे.

ठेकेदार यांचे अर्थिक स्थितीबाबत अभिप्राय देणेस असमर्थता दर्शवित सल्लागार यांनी वरील अडचणी, ठेकेदार यांनी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ स्थलांतरणाचे केलेले काम कंपनीचे वरिष्ठ समन्वयक यांनी प्रगती साधण्याचे दिलेले ठाम आश्वासन तसेच या मोठया प्रकल्पातील सहभाग लक्षात घेता निविदेतील अट क्र.६०.२ नुसार घालून दिलेली रु.२.५० कोटी ही किमान अंतरिम बिल मर्यादा (Minimum amount of R.A.Bill) शिथिल करून ठेकेदार यानी कामात गती राखण्याचे अटीस अधीन राहून तिसऱ्या बिलापर्यंत किमान अंतरिम बिल मर्यादा विचारात न घेता दर महिन्याला जे बिल होईल ते अदा करणेबाबत शिफारस केली आहे.ङ

निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांना बॅक गॅरंटीपोटी रु.१,६९,१६,३१०/- मात्र Mobilisation Advance अदा करणेत आलेले आहेत. ठेकेदार यांचे निविदेनुसार जानेवारी २०११ अखेर पहिल्या सहा महिने कालावधीत किमान रु.१५ कोटी रकमेचे काम होणे अपेक्षित होते. तथापि ठेकेदार यांनी यापुर्वी समक्ष चर्चेचेवेळेस तसेच दि.०४/०२/२०११ चे पत्रान्वये, विषयांकित कामाचे संदर्भात, निविदेत व कार्यादेशात नमूद केलेली अंतरीम बिलाची मर्यादा शिथील केल्यास याबिलांच्या पोटी मिळणाऱ्या रक्कमेतून विषयांकीत कामासाठी आवश्यक असणारे बांधकाम साहित्य उपलब्ध करुन घेणे शक्य होईल. याबाबींचा विचार करता ठेकेदार यांना, प्रकल्प सल्लागार युनिसन यांचे दि.०४/०२/२०११ चे अभिप्रायानुसार प्रथमत : प्राप्त होणारी ०३ बिले, ज्या रक्कमेची प्राप्त होतील ती बिले आवश्यक तपासणी करुन, बिलाच्या रक्कमेच्या ७५% रक्कमे पर्यंत ॲडव्हान्स देता येईल. त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **शैक्षणिक संकुल इमारत व साईनाथ रुग्णालय इमारत बाहेरील बाजुने रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इमारतींना तसेच साईनाथ रुग्णालय या इमारतींचे बाहेरील भागाचे रंगकाम करुन सुमारे ११ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यामुळे सदर इमारतींचे बाहेरील रंगकाम खराब झालेले आहे. सदर इमारतींचे सिमेंट पेंटमध्ये रंगकाम करणेसाठी खालील इमारतींचा समवोश आहे.

**इमारतींची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे आहे.**

| अ. नं. | इमारतीचे नांव | रंगकामाचे क्षेत्रफळ | यापूर्वी रंगकाम केलेचे साल |
|---|---|---|---|
| ०१ | इंग्लिश मिडीअम स्कुल, कन्या शाळा व आय. टी. आय. क्लास रुम इमारत | १२१६३.०१ चौरस मिटर | १९९८ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | आय. टी. आय. कार्यशाळा इमारत | ३४९६.६७ चौरस मिटर | १९९८ |
| ०३ | श्री साईनाथ रुग्णालय (धर्मशाळा क्र. ०१ व ०२) | १४८२७.०० चौरस मिटर | १९९९ |

उपरोक्त इमारतींचे रंगकाम करणेसाठी खालील पर्यायानुसार रंगकाम करता येईल.

**(अ) ॲपेक्स पेंट वापरल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ०१ | इंग्लिश मिडीअम स्कुल, कन्या शाळा, आय. टी. आय., साईनाथ रुग्णालय इमारत क्र. ०१ व ०२ या इमारतीनां बाहेरील बाजूने रंगकाम करणे. (Apex Paints from Asian Paints) | ४४,२०,६१५.०० |
| | एकुण अपेक्षित खर्च रुपये.. | ४४,२०,६१५.०० |
| | + ५ % अधिक रुपये.. | २,२१,०३१.०० |
| | एकुण अपेक्षित खर्च रुपये.. | ४६,४१,६४६.०० |

**(ब) सिमेंट पेंट रंग वापरल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ०१ | इंग्लिश मिडीअम स्कुल, कन्या शाळा, आय. टी. आय., साईनाथ रुग्णालय इमारत क्र. ०१ व ०२ या इमारतीनां बाहेरील बाजूने रंगकाम करणे. | |
| | ०१. Cement Paint | ५,१६,५१६.०० |
| | ०२. Texture Paint (साईनाथ रुग्णालयाचे काही भागासाठी) | ४,८३,६२१.०० |
| | एकुण अपेक्षित खर्च रुपये.. | १०,००,१३७.०० |
| | + ५ % अधिक रुपये.. | ५०,००६.८५ |
| | एकुण अपेक्षित खर्च रुपये.. | १०,५०,१४४.०० |

उपरोक्त अ चे पर्यायानुसार (अपेक्स पेंट) रंग मटेरियल वापरुन रंगकाम करणेसाठी अंदाजे रु.४६,४१,६४६/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

अथवा ब नुसारचे (सिमेंट पेंट व काही भागात टेक्चर पेंट) रंग मटेरियल वापरुन रंगकाम करणेसाठी अंदाजे रु. १०,५०,१४४/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तथापि, सिमेंट पेंट पेक्षा ॲपेक्स पेंटवर वातावरणाचा परिणाम लवकर होत नाही. त्यामुळे सदरचे रंगकाम जास्त कालावधी करीता टिकते तसेच आकर्षक व उठावदार दिसेल परंतू जास्त खर्चाचा आहे. यापुर्वी सिमेंट पेंट दिलेला असल्याने पर्याय क्र. ब नुसार सिमेंट पेंट व टेक्चर पेंट मटेरियल वापरुन रंगकाम करणे उचित राहील. तरी याकामी अंदाजे रु. १०,५०,१४४/- मात्रचे अपेक्षित खर्चास व याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुल इमारत व साईनाथ रुग्णालय इमारत बाहेरील बाजुने रंगकाम करणेबाबत स्थानिक विश्वस्तांनी पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **जनसंपर्क कार्यालयात वाढीव सुविधांसह फर्निचर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर परिसरात महाद्वार क्र.१ जवळ जनसंपर्क कार्यालय आहे. अतिमहत्वाच्या व्यक्ती (VIP) / साईभक्त दर्शन पाससाठी मागणी करीत असतात. त्यामुळे तेथे नेहमी गर्दी असते. पासेस देणेसाठी दोन खिडक्यामध्ये असलेल्या काउंटरव्दारे दर्शनाचे पासेसचे वाटप करणेत येत असते. सदर ठिकाणी असलेले तीन लिपीक व पर्यवेक्षक यांना पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे काम करणे अडचणीचे होते. तसेच गर्दीचे कालावधीत काम करणे अधिक अडचणीचे होते.

तरी साईभक्तांना सुरळीतपणे पासेस घेता यावे व कार्यालयातील कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था सुव्यवस्थीत व्हावी यासाठी त्यामध्ये खालील प्रमाणेच्या सुविधा करणे आवश्यक आहे.

१. कार्यालयाचे पश्चिम बाजूने काउंटरव्दारे पासेस व्यवस्थेसाठी काउंटर तयार करणे.
२. सध्या असलेल्या खिडक्या स्लायडींग करणे.
३. ओहरहेड स्टोरेज कॅबीनेट तयार करणे.
४. फॅक्समशीन करीता टेबल करणे.
५. खिडक्यां करीता ॲल्यु. ग्रील व काचा बसविणे.
६. जीप्सम पार्टीशन करणे.
७. प्रवेशव्दाराची जागा बदलून दरवाजा नुतनिकरण करणे.
८. इलेक्ट्रीक फीटींग
९. रंगकाम इ. कामे करणे.

उपरोक्त प्रमाणे व्यवस्था करणेकामी चार काउंटरची व्यवस्था करावयाची असल्यास याकामी अंदाजे रु.२,४६,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.२,४६,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी विहित पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **साईबाबा मल्टीमेडीया थिम पार्क लेजर- शो बाबत लेजरव्हिजन मेगामेडीया लि.,हॉंगकॉंग योचंशी करारनामा करणेबाबत. तसेच प्रस्तावित साई गार्डन थिम पार्क प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांचे मार्फत सादरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, श्री साईबाबा मल्टीमिडिया थीमपार्क प्रकल्पांतर्गत लेजर उभारणी कामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ डिसेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९७४ अन्वये, Laservision Mega~Media Ltd., Hong Kong ( येथूनपुढे प्रस्तावात / टिपणीत सदर कंपनीचा उल्लेख लेजरव्हिजन या नावांने उल्लेख करणेत आलेला आहे. ) या संस्थेची अंतिम वित्तीय देकार USD ५५,००,०००/- only (अंदाजे भारतीय रक्कम रुपये २४,७५,००,०००/- मात्र) या रक्कमेची निविदा मंजूर करणेत आलेली आहे. सदर निर्णयानुसार लेजरव्हिजन या संस्थेस इकडील जावक क्रमांक एसएसएस / बांधकाम / १०८९४ /२०१०, दिनांक ०६ डिसेंबर, २०१० अन्वये Letter of Intent देणेत आलेले आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, लेजर शो उभारणी कामी लेजरव्हिजन या संस्थेशी करावयाचा कार्यपूर्ततेचा करारनामा व इतर अनुषंगिक बाबींसाठी मा. अध्यक्षसाो. यांचे सुचनेनुसार आंतराष्ट्रीय स्तरावरील कायद्याचा अनुभव असलेले मुंबई येथील सॉलिसिटर्स ॲण्ड ॲडव्होकेटस् मे. सिंघानिया ॲण्ड कंपनी, एलएलपी यांची नेमणूक करणेत आली असून, सदर संस्थेमार्फत त्यांचे प्रतिनिधी ॲड. प्रदिपकुमार जैन हे काम पहात आहेत.

लेजर शो उभारणीकामी लेजरव्हिजन या संस्थेशी करावयाचे करारनामासंबंधी, सॉलिसिटर्स संस्थेने, लेजरव्हिजन संस्थेच्या प्रतिनिधींशी व संस्थान प्रतिनिधी वेळोवेळी , चर्चा करुन आणि एकत्रित बैठक घेऊन करारनाम्याचा मसुदा तयार केला आहे.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०५ डिसेंबर, २०१० रोजीचे निर्णयात नमूद केलेल्या अटी-शर्तीस अनुसरुन, सॉलिसिटर्स यांनी करारनामा मसुदा तयार केला आहे. या करारनाम्यातील काही महत्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत तसेच काही तरतुदी करणे आवश्यक आहे , त्याचा तपशील :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | करारनाम्यातील तरतुद | शेरा |
|---|---|---|
| ०१ | **Clause 4.1 :** .. .. .. To avoid any confusion, Trust is agreed to pay withholding tax (WHT) or any tax to be levied on income of LV, on behalf of LV and price is in this clause is net price in the hand of LV. | सदर क्लॉज नुसार withhold tax (WHT/TDS) संस्थानने भरावयाचा आहे. परंतू Laservision यांनीच (WHT/TDS) भरणे योग्य राहील. |
| ०२ | लेजर शोचे उभारणीसाठी येणारा खर्च लेजरव्हिजन यांना कशा पध्दतीने आदा करावयाचा याबाबत Annexure B - Payment Schedule मध्ये नमूद केलेले आहे. तसेच याकामी 5.1 C क्लॉजचा समावेश खालीलप्रमाणे केला आहे.<br>Parties agree to enter into the Escrow Agreement for the payment as described in Annexure B. It is agreed that Escrow agreement will be part ot this agreement. | सदर परिशिष्टात नमुद केल्यानुसार लेजरव्हिजन रक्कम आदा करावी लागेल. तसेच त्यासाठी बॅंक गॅरंटी ऐवजी Escrow Agreement प्रस्तावित केले आहे. त्याबाबतचा तपशील तक्ता क्रमांक ०२ मध्ये नमूद केला आहे. |
| ०३ | The Trust will carry out all civil, plumbing, electrical, HVAC and landscaping works required for operating the multimedia show. | Aqua Screen व Musicial Fountain साठी सिव्हील वर्क संस्थानने करावयाचे आहे. |
| ०४ | Sound Track | लेजरव्हिजन हे एकूण ०४ भाषांमध्ये कार्यक्रम प्रसारीत करणार आहेत, त्यापैकी मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषा असून, याव्यतिरिक्त चौथी भाषा कोणती असावी याबाबत निर्णय कळविणे आहे. |
| ०५ | -- | लेजरव्हिजन यांनी RFP नुसार Performance Guarantee सादर करणे आवश्यक आहे. |
| ०६ | कलम ६ (e) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे :<br>Provide the housings, mountings, and associated infrastructure for the installation of the assets and equipments specified in Annexure C to Laservision specification. | सदरचा खर्च संस्थानने करावयाचा आहे. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०७ | कलम ८.२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे :<br>The Trust will be responsible at all times for ensuring the security of the Site Facilities. | सदरची व्यवस्था संस्थानने स्व:खर्चाने पुरवावयाची आहे. |

**क)** करारनामा झाल्यापासून काम पुर्ण हाईपर्यंत खालीलप्रमाणे रक्कम आदा करणेबाबत करारात Paymement Schedule चा समावेश करण्यात यावा. त्यानुसार रक्कम आदा करावी. अशी Laservision यांची मागणी आहे.

**तक्ता क्रमांक ०२**

PAYMENT SCHEDULE

| Sr. No. | Description | Payment Stage | Stage wise Approx. Amount USD 55,00,000/- only i.e. Indian Rs. 24,75,00,000/- |
|---|---|---|---|
| 01 | Advance - Due upon execution of contract | 1.82 % | 4504500 |
| 02 | Payment 1 – Due upon arrival at Shirdi of Concept Phase staff | 10 % | 24750000 |
| 03 | Payment 2 – Due upon departure from Shirdi of Concept Phase staff | 10 % | 24750000 |
| 04 | Payment 3 – Due upon submission of Concept Phase report | 3.18 % | 7870500 |
| 05 | Payment 4 – Due upon completion of the deliverables for 50 % of the Design Phase | 14 % | 34650000 |
| 06 | Payment 5 – Due upon completion of the deliverables for 100 % of the Design Phase | 14 % | 34650000 |
| 07 | Payment 6 – Due upon Storyboard signoff | 5 % | 12375000 |
| 08 | Payment 7– Due upon Creative Visual signoff | 5 % | 12375000 |
| 09 | Payment 8 – Due upon Creative final signoff | 4 % | 9900000 |
| 10 | Payment 9 – Due upon confimation of hardware purchase | 10 % | 24750000 |
| 11 | Payment 10 – Due upon completion of water based assets installation | 2.5 % | 6187500 |
| 12 | Payment 11 – Due upon completion of lands based assets installation | 2.5 % | 6187500 |
| 13 | Payment 12 – Due upon achievement of Practical Completion | 10 % | 24750000 |
| 14 | Payment 13 – Due upon achievement of Final Completion | 8 % | 4455000 |
| | Total | 100 % | 247500000 |

**(ड)** सोबत, लेजर शो उभारणीकामी लेजरव्हिजन या संस्थेशी करावयाच्या करारनाम्याचा संपूर्ण मसुद्याची प्रत माहितीस्तव जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेप्रमाणे आवश्यक असे बदल करुन, करारनामा अंतिम करुन, तो स्वाक्षरीत करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी म्हणून मा. कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता असावी. करारनाम्यातील तरतुदीनुसार लेजर शो उभारणीसाठी, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने संस्थान आर्किटेक्ट / कन्सल्टंटस् यांचे अभिप्रायानुसार व शिफारशीनुसार अपेक्षित वाढीव खर्च वेळोवेळी आदा करणेस मान्यता असावी.

तसेच उपरोक्त प्रकल्पाबाबत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी सुधारीत साई गार्डन थीम पार्क बाबत तयार केलेले सादरीकरण करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२२१** **नियोजित साईगार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट उदय काप्रे यांनी आजचे सभेपुढे सुधारीत बांधकाम आराखड्याचे सादरीकरण केले. त्यावर चर्चा होऊन, आर्किटेक्ट काप्रे यांनी सादर केलेले साई गार्डन प्रकल्पाचे बांधकाम आराखड्यामध्ये सुधारणा करण्याचे दृष्टीने आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांचे मार्गदर्शन घेणेत यावे. त्यानुसार आराखड्यामध्ये सुधारणा करुन मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा, असें ठरलें.**

**श्री साईबाबा मल्टीमेडिया थिमपार्क हा प्रकल्प अतिविशिष्ट स्वरुपाचा असून, भारतातील पहिलाच प्रकल्प ठरणार आहे. सदरहू प्रकल्पाची संकल्पना ही नाविण्यपूर्ण व नवखी आहे. त्याबाबतची माहिती तयार स्वरुपात कुठेही एकत्रित उपलब्ध नव्हती. जागतिक पातळीवर या स्वरुपाच्या प्रकल्पांची उभारणी करणाऱ्या फारच मोजक्या संस्था असून त्यापैकी Laservision ही एक नामांकित व अग्रगण्य संस्था आहे. त्यामूळे RFP मधील अटी व शर्तीमध्ये उभय पक्षांचे सहमतीने योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी करण्यात येत असलेला करारनामा हा अंतिम समजण्यात यावा.**

**तसेच सॉलिसिटर श्री. प्रदिपकुमार जैन यांनी लेजरशो उभारणीसाठी Laservision या कंपनीशी करावयाचे करारनाम्याचा प्रारुप मसुदा तयार केला आहे. या करारनाम्यात खाली नमूद**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



केलेल्या काही महत्वाच्या तरतुदी समाविष्ट करणेबाबत निर्णय घेणेत आला, त्याचा थोडक्यात तपशील :

| अ.नं. | करारनाम्यातील तरतुद | निर्णय |
|---|---|---|
| ०१ | **Clause 4.1 : .. .. .. To avoid any confusion, Trust is agreed to pay withholding tax (WHT) or any tax to be levied on income of LV, on behalf of LV and price is in this clause is net price in the hand of LV.** | सदर क्लॉज नुसार **withholding tax** (भारतातील TDS) संस्थानने भरावयाचा आहे.<br>सदरहू बाब मान्य करणेत आली. |
| ०२ | लेजर शोचे उभारणीसाठी येणारा खर्च लेजरव्हिजन यांना कशा पध्दतीने आदा करावयाचा याबाबत **Annexure B - Payment Schedule** मध्ये नमूद केलेले आहे. तसेच याकामी **5.1 C** क्लॉजचा समावेश खालीलप्रमाणे केला आहे.<br>**Parties agree to enter into the Escrow Agreement for the payment as described in Annexure B. It is agreed that Escrow agreement will be part ot this agreement.** | सदर परिशिष्टात नमुद केल्यानुसार लेजरव्हिजन रक्कम आदा करावी लागेल. तसेच त्यासाठी बँक गँरटी ऐवजी **Escrow Agreement** प्रस्तावित केले आहे. त्यानुसार करारनामा करुन मा.कार्यकारी अधिकारी यांनी याकामी बँकेत **Escrow Account** उघडण्यात यावे, असे ठरले.<br>सदरहू बाब मान्य करणेत आली. |
| ०३ | **The Trust will carry out all civil, plumbing, electrical, HVAC and landscaping works required for operating the multimedia show.** | **Aqua Screen** व **Musical Fountain** साठी सिव्हील वर्क संस्थानने करावयाचे आहे.<br>सदरहू बाब मान्य करणेत आली. |
| ०४ | **Sound Track** | लेजरव्हिजन हे एकूण ०४ भाषांमध्ये कार्यक्रम प्रसारीत करणार आहेत, त्यापैकी मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषा असून, याव्यतिरिक्त तेलगू भाषेचा चौथी भाषा म्हणून समावेश करावा. |
| ०५ | -- | लेजरव्हिजन यांचेकडून ५% रकमेचा **Performance** bond घेणेत यावा, सदरहू बाब मान्य करण्यात आली. |
| ०६ | कलम ६ (e) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे : **Provide the housings, mountings, and associated infrastructure for the installation of the assets and equipments specified in Annexure C to Laservision specification.** | सदरचा खर्च संस्थानने करावयाचा आहे.<br>सदरहू बाब मान्य करणेत आली. |
| ०७ | कलम ८.२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे :<br>**The Trust will be responsible at all times for ensuring the security of the Site Facilities.** | सदरची व्यवस्था संस्थानने स्वःखर्चाने पुरवावयाची आहे.<br>सदरहू बाब मान्य करणेत आली. |

उपरोक्त प्रमाणे मान्य करणेत आलेल्या बाबींचा समावेश करारनाम्यात करणेसाठी सॉलिसिटर्स श्री. प्रदिपकुमार जैन व Laservision यांना कळविणेत यावे. संबंधितांकडून उपरोक्त बाबींचा समावेश करारनाम्यात करणेबाबत अभिप्राय व मान्यता मिळालेनंतर करारनामा मसुदा अंतिम करणेत यावा. Laservision या कंपनीशी करारनामा करुन तो स्वाक्षरीत करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी म्हणून, पर्यायाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे प्रतिनिधी म्हणून मा. कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेस व त्याकामी उचित अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत आली.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्तावातील परिच्छेद क व ड मध्ये विवेचन केलेनुसार, Laservision यांना लेजरशो उभारणीपोटी तक्ता क्रमांक ०२ मध्ये नमूद केलेल्या बिल आदायगीच्या अनुसूचीनुसार (Payment Schedule) तसेच दिनांक २३.०३.२०११ रोजीच्या ई-मेलनुसार Laservision कंपनीने Payment Schedule ७ आणि ८ एकत्र केलेले आहेत. त्यानुसार रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली. तसेच करारनाम्यातील तरतुदीमध्ये काही आवश्यक असे बदल मान्य केले असल्याने, त्या अनुषंगाने लेजर शो उभारणीसाठी वाढीव खर्च येणार आहे, सदरचा वाढीव खर्च मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, संस्थान आर्किटेक्ट / कन्सल्टंटस् यांचे अभिप्रायानुसार व शिफारशीनुसार वेळोवेळी आदा करणेस मान्यता देणेत आली.**

**मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, नियोजित लेजरशोचे उभारणीसाठी Laservision यांना दिनांक ०६ डिसेंबर, २०१० रोजी Letter of Intent देणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने, Laservision या कंपनीशी करावयाच्या करारनाम्याचा प्रारुप मसुदा सॉलिसिटर्स श्री. प्रदिपकुमार जैन यांनी तयार केलेला आहे. सदर मसुद्यात काही आवश्यक तरतुदी समाविष्ट करणेबाबत आजचे सभेत वरील परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे मान्यता देणेत आली आहे. सदर तरतुदी करारनाम्यात संबंधितांच्या अभिप्राय व मंजुरीसह समाविष्ट करुन, मसुदा अंतिम करणेसाठी, प्रकल्प उभारणीसाठी करावयाचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु करणेसाठी बऱ्यापैकी कालावधी लागणार आहे. करारनाम्यावर स्वाक्षरी झालेनंतर Annexure - B नुसार Escrow account चे माध्यमातून अथवा थेट संस्थान मार्फत Laservision यांना रक्कम आदा करण्यात यावी. दरम्यानचे कालावधीत Laservision यांचेकडून लेजर शो उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींचा सविस्तर अहवाल, तसेच विशेषतः श्री साईंचे जीवनावर आधारीत लेजरशोव्दारे प्रसारीत करणेत येणाऱ्या प्रसंगाची स्क्रिप्ट आदि तयार करुन घेणेत यावी, जेणेकरुन लेजरशो उभारणी पूर्ण होईपर्यन्त ती अंतिम करुन त्यावर कार्यवाही करणे सोयीचे होईल, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२२** **वारंवार, जादा वैद्यकिय बीलाच्या परताव्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कायम कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांसाठी संस्थानचे दोन्ही रुग्णालयात संस्थान वैदयकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये मोफत उपचार करण्यात येत असतात. संस्थान रुग्णालयात उपचारासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध आहेत ती त्यांना देण्यात येतात तर जी औषधे उपलब्ध नाही ती त्यांना बाहेरुन लिहून दिली जातात. तसेच जे उपचार संस्थानचे दोन्ही रुग्णालयात उपलब्ध नाहीत त्याकरीता मा. व्यवस्थापन समिती सभेने मान्य केलेल्या बाहेरील रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात येत असतात. तसेच काही आजारासाठी मान्य यादीतील रुग्णालयाव्यतिरिक्त इतर रुग्णालयासाठी डॉक्टरांची शिफारशीन्वये उपचार घ्यावे लागतात. यासाठी रु.१०,०००/- पर्यंतची वैद्यकिय खर्चाची बीले हे वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात मंजूर करण्यात येतात.

तर रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्च असेल तर ती मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०९/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक १९ अन्वये अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकिय बीले वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांनी तपासून त्यांचे शिफारशी-नूसार अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२७/०२/२०११ चे सभेत एकूण १५ कर्मचाऱ्यांची बीले मान्यतेसाठी ठेवण्यात आली होती. यावर चर्चा होऊन असे निर्दशनास आलेले आहे की, काही ठराविकच कर्मचाऱ्यांची बीले ही वैद्यकिय परताव्यासाठी येत असतात. याबाबत सविस्तर माहिती घेऊन ती पुढील सभेपूढे ठेवण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानूसार मागील एक वर्षाच्या बीलांची तपासणी केली असता खालील १७ कर्मचाऱ्यांनी बीले दोन ते तीन वेळा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा सादर केलेली आहे. याबाबत सदर रुग्णांना गंभीर स्वरुपाचे किंवा कायमस्वरुपी आजार आहे. उदा - कॅन्सर, ब्लड प्रेशर, डायबेटीज, ॲन्जीओप्लास्टी केलेले, किडनी संबंधीचे आजार, टि.बी., सांधे दुखी इ. आजाराचा समावेश आहे. काही रुग्णांना अकस्मात उपचाराची देखील गरज पडते. उदा - उपघात, नैसर्गिक घटकाची कमतरता उदा - Harmon Deficiency, Psychiatric Disorder, अपघातानंतर येणारे अपंगत्व इ. आजारांसाठी बऱ्याच दिवसांपर्यंत किंवा कायमस्वरुपी औषधे घ्यावे लागतात.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | हुद्दा | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | सध्या उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | वर्ग-४ श्री साईनाथ हॉस्पिटल | आई | Diabeties & Blood Pressure | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी |
| २ | प्रदिप भालचंद्र धर्माधिकारी | वार्ड बॉय- श्री साईनाथ रुग्णालय | मुलगी | Psychological Disorder | सहस्त्रबुध्दे, श्रीरामपुर |
| ३ | प्रणोती रुपेश जडगे | आर.एम.ओ.- श्री साईबाबा हॉस्पिटल | आई | Arthritis | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मधुकर भिवाजी डोखे | वॉर्डबॉय-श्री साईनाथ रुग्णालय | मुलगी | Idiopathic Isosexual Central Precocious Pubert | के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई |
| ५ | मनोज सतिष बकरे | मदतनीस - न.भ.नी. | आई | Diabeties & Blood Pressure | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| ६ | एन. एस. म्हस्के | उपवैद्यकीय संचालक-श्री साईबाबा हॉस्पिटल | स्वत: व पत्नी | Blood Pressure & Diabetis | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| ७ | डिसोजा बासिल ॲन्थनी | सहाय्यक शिक्षक - इं.मि.स्कुल | स्वत: | घशाचा कॅन्सर | रुबी हॉल क्लिनिक,पुणे |
| ८ | दिनकर हनुमंत डोखे | मदतनीस -साईनाथ रुग्णालय | स्वत: | Heart Disease | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| ९ | दादासाहेब लुमा कांबळे | त्वचा रोग तज्ञ -साईनाथ रुग्णालय | मुलगी | Autisum pervasie | सानवड स्पीच हेअरींग क्लीनिक, कोल्हापूर |
| १० | ॲग्नेस जॉर्ज देठे | स्टाफ नर्स- साईबाबा हॉस्पिटल | मुलगा | Arnold chiart Syndrome Hudrocephalus Spinabifidq. With menigngomyelocele (lumber region) | वाडीया हॉस्पिटल, मुंबई |
| ११ | वसंत शिवाजी चौधरी | मदतनीस - विद्युत विभाग | वडील | Ichemic Heart Disease with LV Disfunction for Stress Test. | Nuscint Diagnostic Pvt.Ltd, Isotope Scan Centre, Nashik |
| १२ | सतिष गंगाधर बकरे | वरिष्ठ लिपीक- आरोग्य विभाग | मुलगी | Maleria | श्री साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी |
| १३ | सुर्वे वैशाली वसंतराव | स्टाफ नर्स - श्री साईबाबा हॉस्पिटल | आई | Diabetis & Blood Pressure | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| १४ | संगिता संजय थोरात | परिचारिका-साईबाबा रुग्णालय | पती | Heart Disease | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| १५ | श्रावण माधव चौधरी | वरिष्ठ लिपीक- बांधकाम विभाग | स्वत: व पत्नी | Diabeties | श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |
| १६ | नवले रविंद्र बाळासाहेब | एच.आर.मॅनेजर - श्री साईबाबा हॉस्पिटल | आई | Tuber Culosis | बंडोपाध्याय हॉस्पिटल, नाशिक |
| १७ | कल्पना रघुनाथ मुसमाडे | स्टाफ नर्स- श्री साईनाथ हॉस्पिटल | आई | Chronic Renal failure | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी |

तसेच औषधांच्या किंमती देखील दिवसेंदिवस ह्या वाढतच असल्याने रु.१०,०००/- ची रक्कम कमी पडते त्यामुळे पुढील खर्चाची बीले कर्मचारी परतावा मिळणेसाठी सादर करतात. वरील १७ कर्मचारी परतावा मिळणेकामी वारंवार बीले सादर करतांनी दिसून येतात. त्यांचे आजार व ते ज्या रुग्णालयात उपचार घेत आहेत ते उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहे. वरील आजार अशा प्रकारचे आहे की, त्यासाठी त्यांना बरेच दिवस किंवा कायमस्वरुपी देखील उपचार घ्यावे लागतात. दि.०१/०४/२०१० ते १५/०३/२०११ अखेर एकूण ५५० कर्मचाऱ्यांना वैद्यकिय बीलाचा परतावा देण्यात आला असून त्याची रक्कम रु.२७,४६,०००/- इतकी होते.

**निर्णय क्र.२२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्या प्रलंबित असलेल्या बीलांचा परतावा करण्यात यावा. मात्र यापुढे येणारे जादा वैद्यकीय बीलांच्या परताव्याबाबत वैद्यकीय अधिकारी,संस्थान अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित बैठक घेऊन, शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बीलांचा परतावा करणेबाबत काय पद्धती आहे याबाबत चौकशी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०११-१२ या वर्षाकरीता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०११-२०१२ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो मटेरीयल, सि.टी.स्कॅन व एमआरआय फिल्म्स, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.१३/१२/२०१० चे परीपत्रकान्वये वॉर्ड / विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. तो सोबत पान नं. १ ते ९६ सादर केला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सन २०११-१२ करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|
| १ | गोळया | ६६,८३,०५६.९१ |
| २ | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | ३,९१,५१,८५७.०९ |
| ३ | लिक्विड ओरल्स् | २१,५६,३७४.२० |
| ४ | मलम | ७,६१,३४१.५२ |
| ५ | आय, इअर, व नोझल ड्रॉप्स | २३,२२,३१४.२८ |
| ६ | डेंटल मटेरीयल | ४,८४,२८२.६० |
| ७ | क्ष-किरण फिल्म्स् (श्री साईनाथ रुग्णालय) | १५,९५,८६३.०० |
| ८ | सि.टी. स्कॅन व एम.आर.आय. व डिजीटल क्ष-किरण मशिनसाठी लागणारे फिल्म्स व इतर साहित्य (साईबाबा हॉस्पिटल) | १,६१,६८,८७६.७५ |
| ९ | श्री साईनाथ रुग्णालय लॅब केमीकल्स | ३५,४८,८६४.४० |
| १० | श्री साईबाबा रुग्णालय लॅब केमीकल्स | १,५९,७२,६२५.०४ |
| ११ | ब्लड बँक केमीकल्स | ४७,५३,२९५.५० |
| १२ | Miscellaneous (इतर किरकोळ साहित्य) | ५०,८०,४०९.२४ |
| १३ | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | ३,१७,४२,१९०.४३ |
| १४ | कॅथलॅब विभाग, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व परफ्युजीनीस्ट यांचे सर्जीकल साहित्य (नविन एक कार्डीयाक ओ.टी. सह) | ६,९७,७६,०२८.१६ |
| १५ | डायलेसीस युनिट | ८,९०,१४४.७५ |
| १६ | न्युरो ऑपरेशन थिएटरसाठीचे साहित्य | ८,०२,६०६.३० |
| १७ | आयुर्वेदीक औषधे | १४,११,२२१.५७ |
| १८ | कॅटगट ॲन्ड सुचर्स मटेरियल (श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल सर्व ओ.टी.) | २,६९,४३,५१७.९९ |
| १९ | होमिओपॅथीक औषधे | ५२,४३०.०० |
| २० | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker /Device etc) | ८,००,००,०००.०० |
| | **एकुण रक्कम रु. -** | **३१,०२,९७,२९९.७३** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु. -** | **३१,०२,९७,३००.००** |

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत -

०१) दि.०१/०१/२०१० ते ३१/०१/२०११ या कालावधीतील खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणार खप तसेच साईबाबा रुग्णालय सुरु होऊन पाच वर्षे झालेले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे. नविन एक कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व तेथे होणाऱ्या दररोज तीन शस्त्रक्रियांसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु.मध्ये लागणारी इंजेक्शन इत्यादींचा देखील विचार करुन मागणी तयार केलेली आहे.

०२) श्री साईनाथ रुग्णालयातील अंतर्रुग्ण व बाहयरुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे.-

| अ.नं. | तपशिल | सन २००६ - २००७ (०१.०४.०६ ते ३१.०३.०७) | सन २००७ - २००८ (०१.०४.०७ ते ३१.०३.०८) | सन २००८ - २००९ (०१.०४.०८ ते ३१.०३.०९) | सन २००९ - २०१० (०१.०४.०९ ते ३१.०३.१०) | सन २०१० - २०११ (०१.०४.१० ते ३१.१२.१०) **(९ महिने)** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अंतर्रुग्ण संख्या | ५६३९८ | ६४७७१ | ६८१९२ | ६४००७ | ५९१५५ |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | २४२७९८ | २५३११० | २४०८९० | २२३८४४ | १९९४०० |

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या, मलम, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे.

०४) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचवलेली आहे.

०५) श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि. टी. स्कॅन, एम.आर.आय., २-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ पाच वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | तपशिल | सन २००६-२००७ (०१.०४.०६ ते ३१.०३.०७) | सन २००७-२००८ (०१.०४.०७ ते ३१.०३.०८) | सन २००८- २००९ (०१.०४.०८ ते ३१.०३.०९) | सन २००९ - २०१० (०१.०४.०९ ते ३१.०३.१०) | सन २०१० - २०११ (०१.०४.१० ते फेब्रु. ११) **(११ महिने)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅथलॅब प्रोसुज्यर | १३४० | ३१६५ | ४६१६ | ४९२२ | ४८९८ |
| २ | ह्दयशस्त्रक्रिया | २१३ | ५९१ | ७२१ | १०२३ | १०८२ |
| ३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | ३६३ | २८९ | ५४२ | ६९९ | २५२ |
| ४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ४५४ | ३६५ | ७१० | ७२८ | ६९३ |
| ५ | जनरल शस्त्रक्रिया | २६७ | ६७६ | ८१७ | १५३५ | १५३९ |
| ६ | न्युरो शस्त्रक्रिया | ४१ | २०० | २५३ | ४८९ | ५१३ |
| ७ | युरोलॉजी शस्त्रक्रिया | १४ | १७९ | ३२८ | ३९७ | ३९२ |
| ८ | सि.टी. स्कॅन | ३३२८ | ६३५१ | ८०९१ | ८०२४ | ८९८० |
| ९ | एम. आर. आय. | - | ३३८३ | ७९४३ | ८७७७ | ९०४१ |
| १० | २ - डि इको | ८२५ | २६६४ | ६४०२ | ६७८५ | ७९३८ |
| ११ | डायलेसीस | ५१७ | १३७३ | १७७७ | १८५० | १८०८ |
| १२ | अंतर्रुग्ण संख्या | ३९८८ | ९८६४ | ११९४७ | १२६८९ | १२२२२ |
| १३ | बाहयरुग्ण संख्या | ३०९५४ | ६२३०४ | ६६५४३ | ७३०६८ | ९६४६५ |
| | **एकुण संख्या** | **४२३०४** | **९१४०४** | **१०९८९०** | **१२०९८६** | **१४५८२३** |

उपरोक्त माहितीवरुन श्री साईबाबा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या हि दिवसेंदिवस वाढतीच आहे. श्री साईबाबा रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणत वाढ झालेली आहे. सध्या कार्डीयाक शस्त्रक्रियांचे रुग्ण जवळपास २-३ महिन्यांचे प्रतीक्षा यादीत आहे. ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, ह्दयशस्त्रक्रियासाठी रुग्णांना लागणारे सर्जीकल साहित्य, औषधे इत्यादी संस्थानतर्फे ठरलेल्या पॅकेजमध्येच पुरवण्यात येतात त्यामध्ये प्रामुख्याने महागडी स्टेन्ट, व्हाल्व, बलून, डायग्नोस्टीक कॅथेटर, सुचर्स मटेरीयल, इंजेक्शन इत्यादींचा समावेश आहे.

०६) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी व जीवनदायी योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा. किडनी स्टोन शिबिरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, अध्यात्मीक शिबिरे, पालखी सोहळा इत्यादी)

०७) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जीकल साहित्य इत्यादींचा विचार करण्यात आलेला आहे.

०८) श्री साईबाबा रुग्णालयातील सि.टी. स्कॅन, एमआरआय व डिजीटल क्ष-किरण मशिनकरीता Kodak कंपनीचा कॅमेरा आहे व त्यासाठी Kodak कंपनीच्याच फिल्म वापराव्या लागतात. सदर फिल्म्ससाठी सन २००९-१० या वर्षामध्ये Kodak कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. निर्मल एजन्सी, अहमदनगर यांचेकडे ३ वर्षाकरीता दर निश्चित करुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावात फिल्मचे अंदाजे खरेदीसाठीच्या रक्कमेस मान्यता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे, त्यामुळे याकामी सन २०११-१२ या वर्षाकरीता फेर निविदा मागविण्याचा प्रस्ताव नाही.

०९) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. ती आपण रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतुद केलेली आहे.

सोबतच्या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर ह्या पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. दि.०१/०४/२०१० ते दि.३१/०१/२०११ (१० महिने) या महिन्यांच्या कालावधीमध्ये औषधे खरेदीवर एकुण रु.१७,६७,९९,४७०/- इतका खर्च झालेला आहे, म्हणजे साधारणतः औषधे खरेदीवर दरमहा रु.१,७६,७९,९४७/- इतका खर्च होतो तर नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरकरीता दरमहा साधारणतः २ कोटीपर्यंत खर्च घेऊन एका वर्षाकरीता रु. २५,००,००,०००/- पर्यंत खर्च होईल, असा अंदाज आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे खालील पध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-

१) औषधे खरेदीकामी दरवर्षीप्रमाणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात व टेंडर फॉर्म टाकून निविदा मागविण्यात याव्यात.

२) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी शक्य तेथे नामांकित थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. तसेच नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

३) दरपत्रक मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कंपन्याचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात येऊन त्यांना जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावे.

४) प्रत्येक औषधांसाठी प्राप्त कंपन्यापैकी दर तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावेत व त्यातील नामांकित कंपन्याचे व गतवर्षाचा संबंधित विभागाचा वापरताना आलेला अनुभव, अडचणी, मालाचा दर्जा, पुरवठा वेळेवर न करणाऱ्या कंपन्या व अधिकृत विक्रेते यांना शक्यतो टाळून दर स्विकारण्यात यावेत.

५) ज्या औषधांसाठी / साहित्यासाठी उत्पादक कंपन्यांचे दर येणार नाहीत, त्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या कंपन्यापैकी नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

६) सर्व प्राप्त निविदा हया मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन त्यातील ज्या निविदाधारकांना रु.१,००,०००/- (रु.एक लाख) पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या औषधांकरीता पुरवठा आदेश जात असेल किंवा जाऊ शकेल, अशाच निविदाधारकांना मा. व्यवस्थापन समिती / उपसमिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे.

७) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात रु.२५,०००/- पर्यंत मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करावी.

८) रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.

सोबतच्या तक्त्यातील Annual Req. २०११-१२ या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, साहित्य, कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य इत्यादी तसेच Stent / Valve / Balloon / Pacemaker / Device इत्यादी On Consignment Basis वर खरेदी करण्यास अंदाजे एकुण रु.३१,०२,९७,३००/- इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात झालेला खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३१,०२,९७,३००/- चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते ८ चे प्रस्तावास मान्यता असावी.

सन २०११-२०१२ या वर्षाकरीता औषधे खरेदीकामी रु.२५,००,००,०००/- बजेट तरतुद करण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.२२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०११-१२ या वर्षाकरीता लागणारे औषधे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३१,०२,९७,३००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अ.नं. १ ते ८ प्रमाणे पध्दत अवलंबविण्यात यावी,असे ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता सोलापूर चादरी खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयासाठी एकुण १००० नग सोलापुरी चादर खरेदीस मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०७/०८/२०१० निर्णय क्रमांक ६२७ अन्वये अंदाजे रु.१९६/- प्रती नग प्रमाणे एकुण रु.१,९६,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता एकुण १०० नग सोलापुरी चादर मा.व्यवस्थापन सभा दिनांक २७/०१/२०१० निर्णय क्रमांक २१२ अन्वये प्रती नग रु.१९६/-प्रमाणे एकुण रु.१९६००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. परंतु मा.व्यवस्थापन सभा दिनांक १०/१०/२०१० चे सभेत यावर चर्चा होऊन संस्थानचे खरेदी विभागाकडुन नविन १००० साईआश्रम इमारतीतील खोल्यांकरीता चादरी खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे त्याचमध्ये रुग्णालयाच्या चादरी खरेदी करण्यात यावे म्हणजे कमीत कमी दर मिळणेस मदत होईल असा निर्णय झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्तप्रमाणे एकुण ११०० चादरी खरेदीविभागाकडुन खरेदीकरुन मिळणेस व त्यापैकी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ५०० नग व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ६०० नग घेऊन त्यावर रुग्णालयाचे नाव एम्ब्रॉयडरी करुन मिळणेचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे दि.०३/११/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. परंतु सदर चादरीची खरेदी प्रशासकीय अधिकारी श्रीयुत बी.डी.साबळे साहेब यांचेकडुन चालु आहे असे खरेदी विभागाने कळविले होते. तेव्हा त्याबाबद श्रीयुत साबळे साहेब यांचेशी दिनांक ०६/०३/२०११ रोजी चर्चा केली असता अदयाप चादरींचे नमुने पाहण्यासाठी मा.विश्वस्तांना घेऊन जावयाचे आहे त्यानंतर पुढील निर्णय होणार आहे.

खरेदी विभागाकडुन चादरी उपलब्ध होण्यास अंदाजे ४ ते ५ महिन्याचा कालावधी लागेल असा अंदाज आहे त्यामुळे तुर्तास रुग्णालयास चौकशी विभागाकडुन २०० चादरी आणल्या होत्या परंतु त्याचा दर्जा इतकासा चांगल्या प्रतीचा नाही त्यामुळे रुग्णालयास खरेदी विभागाकडुन चादरी उपलब्ध होईपर्यंत ३०० नग चादरी तातडीने कोटेशन मागवुन खरेदी करता येईल.

त्यासाठी प्रती चादर अंदाजे रु.२५०/- प्रमाणे ३०० नग चादर खरेदीस रु.७५०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

**निर्णय क्र.२२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा हॉस्पिटलकरिता ३०० नग सोलापूर चादरी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७५,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **Duluxe/SPR विभागासाठी बेडशिट खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०७/११/२००९ चे सभेतील निर्णय क्रमांक ८९५ व निर्णय क्रमांक ८९६ दिनांक २९/०३/२०१० अन्वये मे.बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रिज,पानिपत यांचेकडुन सन २००९-२०१० मध्ये ऑफ व्हाईट रंगाचे एकुण ११०० नग बेडशीट खरेदी केले होते. सदरील बेडशीट वॉर्डच्या मागणीप्रमाणे देण्यात आले असुन सध्या लिनन विभागातील स्टॉकमध्ये ४०० बेडशीट शिल्लक आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Deluxe विभागात डिलक्स रुमचे आकार जास्त असल्याने व शक्यतो तेथे उच्च वर्गीय रुग्ण उपचारासाठी येत असतात तेव्हा तेथे उपरोक्त बेडशीट ऐवजी वेगळया रंगाचे बेडशीट व पिलोकव्हर ठेवणे योग्य होईल असे मत आहे, त्याकरीता वेगळया रंगाचे बेडशीट १०० व पिलोकव्हर १०० मिळणेकामी डिलक्स रुम विभागाने त्यांचे डि.पी.क्रमांक ७०७५ दिनांक २४/०२/२०११ अन्वये मागणी केली आहे.

यापुर्वी माहे डिसेंबर २००८ मध्ये बॉम्बे डाइंग कंपनीचे एक कलर बेडशीट रु.२२०/- व एक नग पिलोकव्हर रु.४८/- प्रमाणे खरेदी केले होते त्यामुळे साधारणत: १०० बेडशीट व १०० पिलोकव्हर करीता अंदाजे रु.२६,८००/- खर्च अपेक्षीत आहे.

**निर्णय क्र.२२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Duluxe/SPR विभागासाठी १०० बेडशिट व १०० पिलोकव्हर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २६,८००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **डिझेल वाहतुकीकरीता टँकर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, ५०० रुम, साईनगर, धर्मशाळा, श्री साई प्रसादालय, साठवण तलाव याठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे दररोज ०६ ते १२ तास भारनियमन असते. याव्यतिरिक्त तातडीचे भारनियमन वेगळेच जसे भारनियमन वाढेल त्याप्रमाणात डिझेलची मागणी वाढते. आपल्याला भारनियमनाच्या कालावधीनुसार दररोज कमीत-कमी ५०० ते जास्तीत जास्त १५०० लिटर पर्यंत डिझेल हे शिर्डी, सावळविहीर येथील पेट्रोल पंपावरुन तसेच टंचाई काळात बाहेरगावच्या पेट्रोल पंपावरुन देखील डिझेल खरेदी करुन जनरेटर चालवावे लागते.

डिझेल वाहतुकीसाठी आतापर्यंत आपण संस्थानच्या ४०७ या ट्रकमध्ये २०० लिटर क्षमतेच्या टाक्या ठेऊन त्यामध्ये डिझेल आणतो. या डिझेल टाक्या गाडीतून प्रत्येक जनरेटर रुमला खाली कराव्या लागतात. ट्रकची / गाडीची उंची जास्त असल्याने टाक्या गाडीतून खाली घेतांना दबल्या जाऊन खराब होतात. कालांतराने त्यामधून बॅरलला चीर जाऊन डिझेल गळती होते. त्यामुळे गाडीमध्ये सर्वत्र डिझेल पसरुन या गाडीचा दुस-या कामासाठी उपयोग करता येत नाही. तसेच टाक्या वारंवार खराब होत असल्याने वर्षभरात ०५ झोनसाठी दरवेळेस ०६ टाक्या याप्रमाणे आपल्याला १०० ते १५० लोखंडी बॅरल खरेदी करावे लागतात. एका रिकाम्या बॅरलची किंमत अंदाजे रु.७००/- इतकी असून वर्षाला १०० ते २०० बॅरल लागतात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यासाठी वॉटर टँकप्रमाणे डिझेल टँकर असल्यास व त्यावर डिझेल मापक सयंत्र लावल्यास आपणाला पंपावरुन आणलेले डिझेल प्रत्येक झोनसाठी मोजून देता येईल. डिझेल टाक्यांचा खर्च वाचेल व डिझेल वाहतूक धोका विरहित करता येईल. तसेच ४०७ या ट्रकचा उपयोग वाहन विभाग दुस-या कामासाठी करु शकतो. शिवाय या ट्रकमध्ये डिझेल सांडल्याने त्याचा वापर मर्यादित होत होता (भाजीपाला वगैरेसाठी) तो थांबेल. या प्रकारचा डिझेल वाहतुक टँकर नाशिक येथे भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात मे.स्पायर टँकस ॲण्ड व्हिसेल्स प्रा.लि., अंबड, नाशिक या उत्पादक कंपनीने उत्पादित करुन पाहण्यासाठी ठेवलेला होता. या संदर्भात चौकशी केली असता फक्त ट्रॉली टँकरची किंमत अंदाजे रक्कम रुपये ३,९०,०००/- इतकी असल्याचे सांगितले. तरी डिझेल वाहतुकीसाठी ट्रॉली टँकर खरेदी करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदरचा टँकरची खरेदी कोटेशन मागवून करणेस व त्यासाठी अंदाजे रक्कम रु.३,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

डिझेल वाहतुकीकरीता टँकरची खरेदी कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२७ AVR खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साई प्रसादालय याठिकाणचा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयाकरीता ५०० केव्हीए क्षमतेचे नविन प्रकारचे Acoustic जनरेटर बसविण्यात आलेले आहेत. नविन प्रकारच्या Acoustic जनरेटरची एकुण संख्या सहा इतकी आहे. या जनरेटरसेटच्या अल्टरनेटर मधील वीजनिर्मितीकरीता AVR (Automatic Voltage Regulator) बसविलेला असतो. सदरील AVR इलेक्ट्रॉनिक्स पार्टस्ने बनलेला असतो.

जनरेटरसेट हे दररोज चालविले जातात. AVR च्या दैनंदिन वापरामुळे त्यातील इलेक्ट्रॉनिक पार्ट खराब होऊन AVR नादुरुस्त होऊ शकतो. व अल्टरेनेटरपासून निर्माण होणारी विद्युत निर्मिती बंद होतो. अशा वेळेला निकडीची गरज म्हणून आपणाकडे सदरील AVR उपलब्ध असणे गरजेचे आहे.

AVR खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|
| 01) | AUTOMATIC VOLTAGE REGULATOR FOR STAMFORD MAKE ALTERNATOR TYPE – AS – 440 E-00 – 2 4403 | 02 Nos. | 24,000.00 | 48,000.00 |
| | | | **Total :-** | **48,000.00** |

उपरोक्तप्रमाणे AVR ची खरेदी कोटेशन मागवून करणेस व याकामी अंदाजे रक्कम रुपये ४८,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे AVR ची खरेदी कोटेशन मागवून करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे AVR ची खरेदी कोटेशन मागवून करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ४८,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२८ मेंटेनन्ससाठी मेनस्वीच व चेंजओव्हर स्विचेस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परीसर, साईनगर + श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ हॉस्पीटल + व्दारावती इमारत, नविन भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय याठिकाणी विद्युत पुरवठयाकरीता सबस्टेशन उभारुन इमारतींना व इमारतीच्या परीसरांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. प्रत्येक सबस्टेशनमध्ये पॅनेल बोर्ड असून या पॅनेल बोर्डवर विविध क्षमतेचे मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस आहे. सदरील मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस दैनंदिन ऑन-ऑफ करण्याच्या क्रियेमुळे कालांतराने खराब होतात. खराब झालेले मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस काढून त्याठिकाणी नविन मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस बसवून सप्लाय पुर्ववत चालू करुन दयावा लागतो. तसेच नविन ठिकाणी विद्युतपुरवठा करावयाचा असल्यास त्याठिकाणीही मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस बसवून विद्युतपुरवठा चालू करुन दयावा लागतो.

उपरोक्तकामी आपणाकडे मेन्टेनन्ससाठी मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस शिल्लक नसल्याने खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| S.No. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|
| 01) | L & T MAKE, 125 A HRC MAIN SWITCH ENCLOSED IN SHEAT METAL BOX WITH CABLE END BOXES. | 10 Nos. | 6,130.00 | 0,61,300.00 |
| 02) | L & T MAKE, 250 A HRC MAIN SWITCH ENCLOSED IN SHEAT METAL BOX WITH CABLE END BOXES. | 10 Nos. | 7,110.00 | 0,71,100.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03) | L & T MAKE, 125 A CHANGE OVER SWITCH ENCLOSED IN SHEAT METAL BOX WITH CABLE END BOXES. | 04 Nos. | 6,120.00 | 0,61,200.00 |
| | | | **Total :-** | **1,93,600.00** |

उपरोक्तप्रमाणे मेन्टेनन्ससाठी मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेसची खरेदी कोटेशन मागवून करणेस व याकामी अंदाजे रक्कम रुपये १,९३,६००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेस कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मेन्टेनन्ससाठी मेनस्वीचेस व चेंजओव्हर स्विचेसची खरेदी कोटेशन मागवून करणेस व याकामी अंदाजे रक्कम रुपये १,९३,६००/-पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२९** **श्री साई प्रसादालयाचे उत्तर दिशेकडील एल.पी. गॅस सिलेंडर मेनफोल्ड शेडमध्ये फ्लेम प्रुफ वायरींग (लॅम्प व मेनस्वीच सहित) चे कामास व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे उत्तर दिशेकडील एल.पी.गॅस सिलेंडर मेनफोल्ड शेडमध्ये एक्सप्लोसिव्ह विभाग (भारत सरकार) यांचे नियमाप्रमाणे आय.एस.आय.प्रमाणित फ्लेम प्रुफ वायरींग (लॅम्प व मेनस्वीच सहित) चे काम तातडीचे असल्याने त्वरीत कोटेशन मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६९,५५७/- इतक्या खर्चास दिनांक ३०-१२-२०१० चे टिपणीनुसार मान्यता मिळाली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस/विद्युत/११७०४/२०१० दिनांक १९-०१-२०११ अन्वये पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आली होती. यानंतर आलेली कोटेशन्स उघडण्यात आली व त्यामध्ये मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी दर कमी दिल्याने जा.क्र. एसएसएस / विद्युत / १२२९५ /२०११ दिनांक २३-०२-२०११अन्वये त्यांना रक्कम रुपये ६५,९३०/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशील | मागणी | मे. श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | मे. गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | मे. व्दारकाधिश इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Supplying & Erecting PVC Flame proof armoured cable 4 core 2.5 Sq.mm. copper conductor with 10 HWG G.I.Wire complete erected with gland and lugs. | 40 Mtr. | रु. ०७,६८०.०० | रु. ०७,९६०.०० | रु. ०७,८८०.०० |
| 02) | Supplying & Erecting PVC Flame proof armoured cable 4 core 1.5 Sq.mm. copper conductor with 10 HWG G.I.Wire complete erected with gland and lugs. | 45 Mtr. | रु. ०५,७६०.०० | रु. ०६,२१०.०० | रु.०६,३००.०० |
| 03) | Supplying & Erecting PVC Flame proof 4 way Junction box. | 04 Nos. | रु. ०३,७८०.०० | रु. ०४,२००.०० | रु. ०४,०००.०० |
| 04) | Supplying & Erecting PVC Flame proof 100 A 4 pole isolator with complete box. | 01 Nos. | रु. १७,९९५.०० | रु. १८,५००.०० | रु. १९,०००.०० |
| 05) | Supplying & Erecting PVC Flame proof fitting with 45 watt C.F.L. lamp. | 04 Nos. | रु. २३,२००.०० | रु. २५,२००.०० | रु.२४,८००.०० |
| 06) | Supplying & Erecting PVC Flame proof 50 sq.mm. gland & lugs with complete erection. | 01 Nos. | रु. ००,५००.०० | रु. ००,७५०.०० | रु. ००,८००.०० |
| 07) | Supplying & Erecting PVC Flame proof 2.5 sq.mm. gland & lugs with complete erection. | 02 Nos. | रु. ००,२६०.०० | रु. ००,३४०.०० | रु. ००,३५६.०० |
| 08) | Supplying & Erecting PVC Flame proof 1.5 sq.mm. gland & lugs with complete erection. | 14 Nos. | रु. ०२,३१०.०० | रु. ०३,५००.०० | रु. ०३,५४२.०० |
| 09) | Supplying & Erecting PVC Flame proof 4 way MCB Box with 10 A MCB. | 01 Nos. | रु. ०४,४४५.०० | रु. ०५,५००.०० | रु. ०५,५३०.०० |
| | **एकुण रक्कम :-** | | रु. ६५,९३०.०० | रु. ७२,१६०.०० | रु. ७२,२०८.०० |

तरी मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना दिलेल्या रक्कम रुपये ६५,९३०/- इतक्या रकमेच्या कार्यदेशास व आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३०** **वॉटरकुलर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईप्रसाद निवासस्थान विभागाने दिनांक १९-०२-२०११ रोजी टिपणीव्दारे पुढीलप्रमाणे कळविले आहे की, साईभक्तांच्या सेवेकरीता दर्शनलाईनमध्ये पिण्याचे पाणी वाटप केले जाते. साधारण दररोज ८ ते १० कर्मचारी पाणी वाटप करणेकरीता ठेवावे लागतात व सुट्टीच्या कालावधीत साईभक्तांची गर्दी वाढल्यास

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कर्मचारी संख्या वाढवावी लागते. सध्या दर्शनलाईन मध्ये शांतिनिवास तळमाळा पूर्व बाजूस व पहिला माळा पुर्व बाजूस एक वॉटरकुलर बसविलेले आहे. हे सर्व कुलर जनरल संडास-बाथरुम जवळ असल्याने त्याचा जास्त वापर होत नाही.

श्री रामनवमी उत्सवाचे शताब्दी वर्ष असल्याने उत्सव काळात जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच एप्रिल, मे मध्ये शाळांना सुट्टया असल्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गर्दी होण्याची शक्यता आहे. उन्हाळयाचे दिवस जवळ आल्याने गर्दीच्या काळात भक्तांना सहजपणे पिण्याचे पाणी मिळणेकरीता दिनांक १८-०२-२०११ रोजी झालेल्या राऊंडप्रमाणे शांतिनिवास तळमाळा, पहिला माळा, भक्तनिवास तळमाळा, पहिला माळा प्रत्येक बाजूस एक एक कुलर बसविल्यास साईभक्तांना सहजपणे पिण्याचे पाणी मिळेल फक्त ज्यावेळेस आरती सुरु होते अशा वेळेस साधरण १२ ते १ या दरम्यान दर्शनाची प्रत्येक लाईन न भरवता एक आड एक भरविल्यास भक्त सहजपणे पाणी पिण्यासाठी बाहेर येऊ शकतील. गर्दीत गोंधळ होणार नाही. याबाबत संरक्षण विभागात सुचना करता येतील. प्रत्येक बाजूस कुलर बसविल्यामुळे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत पिण्याचे पाणी वाटपासाठी नेमावे लागणारे १०/१२ कर्मचारी नेमण्याची गरज पडणार नाही. रु. १७०/- x १२ म्हणजे सध्याचे १२ कर्मचा-यामागे रुपये २,०४०/- इतके पैसे प्रत्येक दिवशी वाचतील व भक्तांनाही थंडगार पिण्याचे पाणी कुलरव्दारे मिळेल. तरी विद्युत विभागामार्फत १२ नग कुलर खरेदी करुन मिळावेत, अशी विनंती केली आहे.

मा.प्रशासकीय अधिकारी साहेब (निवासस्थाने) यांनी, सध्या शांतिनिवास तळमाळा, १ ला माळा, पूर्व बाजू कुलर चालू आहे. ते जनरल संडास बाथरुमचे ठिकाणी आहे. तसेच पश्चिम बाजूस सॉकेट काढून ठेवलेले आहे. परंतू पिण्याचे पाण्याचे ठिकाणी बाथरुम वरुन आलेवर भक्त हातपाय धूतात. व जवळ संडास असल्याने तेथील पाणी पिण्यास भक्ताची मानसिकता होत नाही. याकरीता पिण्याचे पाण्याची संडास-बाथरुम जवळील जागा बदलणे गरजेचे आहे. सदर जागा शांतिनिवास तळमाळा, पहिला माळा, उत्तर व दक्षिण बाजू तसेच शांतिनिवास पूर्व व पश्चिम बाजूस मोकळया जागेत प्रत्येक माळयावर ०४ कुलर बसवावे, म्हणजे भक्तांची सोय होईल व अतिरिक्त कर्मचारी ठेवण्याची गरज नाही, असे मत नोंदविलेले आहे.

तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे श्री साई प्रसादालयातील डेटा सेंटरकरीता ०१ नग वॉटरकुलरची मागणी करण्यात आलेली आहे. यासाठी खालीलप्रमाणे वॉटर कुलर खरेदी करावे लागतील.

| Sr.No | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | VOLTAS MAKE, WATER COOLER<br>CAPACITY-150 Ltr (Storage),<br>150 Ltr. P/hr. Delivery taps - Two Nos.<br>STAINLESS STEEL BODY | 12- NOS. | Rs. 47,000.00 | Rs. 5,64,000.00 |
| 02) | VOLTAS MAKE, WATER COOLER<br>CAPACITY-20/20 Ltr , Delivery taps - Two Nos.<br>STAINLESS STEEL BODY | 01- NOS. | Rs. 25,000.00 | Rs. 0,25,000.00 |
| | | | **Total Amount :-** | **Rs. 5,89,000.00** |

उपरोक्तप्रमाणे वॉटरकुलर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,८९,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वॉटरकुलर खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन,निविदा मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,८९,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३१** **देणगीदार भक्तांना विनाशुल्क निवास व्यवस्थेबाबत**

**प्रस्ताव-** दि. ०५/१२/२०१० रोजीच्या मा. व्यवस्थान समितीच्या सभेतील निर्णय क्रं. ९८५ नुसार विशेष स्वरुपाच्या देणगी योजनेतील देणगीदार भक्तांना द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये विनामुल्य निवासाची सोय सुरु करण्याबाबत भक्तांस कोणत्या प्रकारच्या रुम द्याव्यात याबाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीच्या पुढील सभे पुढे सादर करावा असे ठरले. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव खालील प्रमाणे .

दि.०८/०५/२००५, ०७/०७/२००८ ,१८/०४/२०१०, ०४/०७/२०१० रोजी अनुक्रमे निर्णय २२३, ५७४, ३७२, ५५७, असे निर्णय वेळोवेळी झालेले आहे. शेवटून दि. ०७/०८/२०१० च्या सभेतील निर्णय क्रं. ६१२ नुसार विशेष देणगीदार भक्तांना विनाशुल्क निवासव्यवस्था देणे बाबत खालील प्रमाणे ठरले.

भक्तांच्या प्रतिक्षा यादीतील भक्तांचा तसेच रु. ५ लाखाची देणगी देणा-या भक्तांचाही सामावेश आहे. या सर्व देणगीदार भक्तांना विनामुल्य निवासाची सुविधा देणे सोईस्कर होणेसाठी प्रति आर्थिक वर्षात पुढील प्रमाणे सुविधा देण्यात यावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं | देणगी रक्कम | निवास सुविधा (एका वेळेस कमीत कमी १ दिवस व जास्तीत जास्त ३ दिवस ) |
|---|---|---|
| १. | रु.१,९९,९९९/- पर्यंत देणगीदारास | १० दिवस |
| २. | रु.२,००,०००/-ते रु.२,९९,९९९/-पर्यंत देणगीदरास | १५ दिवस |
| ३. | रु.३,००,०००/-ते रु.३,९९,९९९/-पर्यंत देणगीदरास | २० दिवस |
| ४. | रु.४,००,०००/-ते रु.४,९९,९९९/पर्यंत देणगीदरास | २५ दिवस |
| ५. | रु.५,००,०००/- व त्यापुढील देणगदारास | ३० दिवस |

निर्णय क्रं. ५५७ नुसार नियमावलीस मान्यता देण्यात आली या योजनेतील देणगीदार भक्तांसाठी विनामुल्य निवास सुविधा कालावधी १५ वर्षापर्यंत मर्यादीत ठेवावा, भक्तांना भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड पुरविण्यात यावे, योजनेअंतर्गत दि. ३१/०३/२०११ अखेर पर्यंतच्या सर्व देणगीदार भक्तांची नावाची यादी द्वारावती इमारतीमध्ये लावण्यात यावे व त्यांना विनामुल्या निवासाची सुविधा सुरु करण्यात यावी, सदर सुविधा सुरु करण्यात आल्या बाबतचे पत्र या योजनेतील सर्व देणगीदार भक्तांना पाठविण्यात यावे, असे ठरले.

सदर निर्णयानुसार माहे जानेवारी २०११ पासुन ही सुविधा नॉन एसी रुम देऊन सुरु करण्यात आलेली आहे. माहे जानेवारी २०११ मध्ये २२ व माहे फेब्रुवारी २०११ मध्ये २१ देणगीदार भक्तांनी हया स्किमचा लाभ घेतलेला आहे.

द्वारावती भक्तनिवास विभागात सध्याला १) एसी २) नॉनएसी अशा दोन प्रकारच्या रुम्स आहेत. देणगीदारांना नियमानुसार विनाशुल्क रुम देतांना एसी रुम किंवा नॉन एसी रुम विनाशुल्क द्यावा अगर कसे किंवा रु.२,९९,९९९ पर्यंतच्या देणगीदारांना नॉन एसी व ३ लाख ते त्या पुढील देणगीदांराना एसी रुम देणे बाबत विचार व्हावा ही विनंती.

तरी उपरोक्त मुद्यांवर निर्णय होऊन भक्तांना कोणत्या प्रकारच्या रुम उपलब्ध करुन द्याव्यात याबाबत निर्णयास्तव सादर,

**निर्णय क्र.२३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,द्वारावती भक्तनिवास इमारतीत ज्या साईभक्तांनी रुपये ३ लाख किंवा त्यापेक्षा जादा देणगी दिलेली आहे, अशा साईभक्तांना ए.सी.रुम देण्यात याव्यात. तसेच ज्या साईभक्तांनी ३ लाखापेक्षा कमी देणगी दिलेली आहे, अशा साईभक्तांना नॉन-ए.सी. रुम देण्यात याव्यात,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,द्वारावती/मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.३२** **नवीन भक्तनिवासस्थान विभागासाठी लॉण्ड्री केमिकल्स खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागाकडील दि.१०.०९.२०१० चे मंजुर प्रस्ताव व मा.व्य.मंडळ सभा दि.०७.०८.२०१० मधील निर्णय क्र.६४७ अन्वये लॉण्ड्री केमिकल (परिशिष्ट "अ" आणि परिशिष्ट "ब") नुसार खालीलप्रमाणे खरेदी करण्यास व परिशिष्ट "अ" करिता १,७०,०००/- मात्र व परिशिष्ठ "ब" साठी ३,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**परिशिष्ट अ**

| अ.नं. | तपशिल | किलो ग्रॅम |
|---|---|---|
| ०१. | नॉक्स १०० | ७०० किलो |
| ०२. | नॉक्स बुस्ट | १४०० किलो |
| ०३. | नॉक्स सोर | ३५० किलो |
| ०४. | नॉक्स लिक्वीड सोप | १०० लिटर |

**परिशिष्ट- ब**

| अ.नं. | तपशिल | किलो ग्रॅम |
|---|---|---|
| ०१. | क्लेन अल्कली | ६३६ किलो |
| ०२. | क्लेन प्राईम | ५१६ किलो |
| ०३. | क्लेन एकस्ट्रा | १३२ लिटर |
| ०४. | क्लेन सोर | २१६ किलो |

उपरोक्तप्रमाणे इकडील जा.क्र.९६६०/१० दि.३०.०९.२०१० अन्वये नियमीत पुरवठाधारकांकडून लॉण्ड्री केमिकल परिशिष्ट "अ" आणि परिशिष्ट "ब") खरेदीकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यात आले होते. मुदतीअंती परिशिष्ट अ साठी मे.मिनीटेक, मुंबई व परिशिष्ट ब साठी डिलक्स क्लिनिंग सिस्टिम्स प्रा.लि., पुणे असे फक्त दोनच पुरवठाधारकांकडून दरपत्रके प्राप्त झालेली होते. पंरतू साहित्य खरेदी करणेसाठी किमान तीन दरपत्रके/ कोटेशन असणे गरजेचे असते. खरेदी विभागाकडील दि.२४.१२. २०१० रोजीच्या प्रस्तावावर मा.प्रशासकिय अधिकारी यांनी फेर कोटेशन मागविणेबाबत आदेशीत केले.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानुसार इकडील जा.क्र.११४२१/११ दि.०४.०१.२०११ अन्वये नियमीत पुरवठाधारकांकडून लॉण्ड्री केमिकल (परिशिष्ट "अ" आणि परिशिष्ट "ब") खरेदीकामी फेर कोटेशन मागविण्यात आले आहे. सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५.०१.२०११ अशी होती. मुदतीअंती परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" साठी खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | परिशिष्ठ अ साठी किंवा ब साठी |
|---|---|---|
| ०१. | मे.मिनिटेक, मुंबई | परिशिष्ठ अ साठी |
| ०२. | मे.केडिसन्स, पुणे (मागणीप्रमाणे नाही.) | परिशिष्ठ अ साठी (Open) |
| ०३. | मे.मिनिटेक, मुंबई | परिशिष्ठ ब साठी |
| ०४. | मे.डिलक्स क्लिनिंग सिस्टिम्स प्रा.लि., पुणे | परिशिष्ठ ब साठी |

उपरोक्त कोटेशनमध्ये परिशिष्ट "अ" साठी २ कोटेशन प्राप्त झाले. त्यातील अ.नं.२ मे.केडिसन्स, पुणे यांचे कोटेशन Open असून नमुद केलेले केमिकल मागणीप्रमाणे नाहीत. परिशिष्ट "ब" साठी २ कोटेशन प्राप्त झालेले आहेत. नवीन भक्तनिवासस्थान यांचेकडील लॉण्ड्री केमिकलचा साठा पुर्णपणे संपल्याने त्यांना लॉण्ड्री केमिकलची अत्यंत तातडीची गरज असल्याने, याबाबत दि.१६.०२.२०११ रोजी सदर विषयात्मक प्रस्ताव सादर केला असता, त्यावर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी लॉण्ड्री केमिकल्स खरेदीकामी प्राप्त कोटेशन स्थानिक विश्वस्तांसमोर उघडून त्वरीत कार्यवाही करणेबाबत आदेशीत केलेनुसार प्राप्त कोटेशन दि.१७.०२.२०११ रोजी स्थानिक विश्वस्तांसमोर उघडण्यात आली त्यातील दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट अ-**

| अ.क्र. | तपशिल | मागणी | मिनीटेक, मुंबई | केडीसन डिस्ट्रीब्युटर्स,पुणे |
|---|---|---|---|---|
| | | | दर प्रती किलो/लिटर व्हॅटसह | दर प्रती किलो/लिटर व्हॅटसह |
| ०१. | नॉक्स १०० | ७०० किलो | ८८/- | ९७.७३ |
| ०२ | नॉक्स बुस्ट | १४०० किलो | ४६/- | ४६.७९ |
| ०३ | नॉक्स सोर | ३५० किलो | ४८/- | ६६.५९ |
| ०४ | नॉक्स लिक्वीड सोप | १०० लिटर | २२/- | ३२.४० |
| | | **शेरा** | | मागणी प्रमाणे नाही. |

**उपरोक्त केमिकलचा वापर साईबाबा भक्तनिवासस्थान दि.१७.०९.२००९ पासून करीत आहेत.**
**(श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांचेकडील दि.२०.१२.२०१० चे टिपणीनुसार)**

**परिशिष्ट ब**

| अ.क्र. | तपशिल | मागणी | मिनीटेक, मुंबई | डिलक्स क्लिनींग सिस्टीम प्रा.लि.,पुणे |
|---|---|---|---|---|
| | | | दर प्रती किलो/लिटर व्हॅटसह | दर प्रती किलो/लिटर व्हॅटसह |
| ०१. | क्लेन अल्कली | ६३६ किलो | १९५/- | १६१.३९ |
| ०२ | क्लेन प्राईम | ५१६ किलो | १६५/- | १७१.३१ |
| ०३ | क्लेन एकस्ट्रा | १३२ लिटर | २८५/- | २७३.५३ |
| ०४ | क्लेन सोर | २१६ किलो | २१५/- | २२९.७५ |
| | | **शेरा** | मागणी प्रमाणे नाही. | |

उपरोक्त दरांचा तुलनात्मक तपशिल पाहाता परिशिष्ट "अ" करिता मे.मिनीटेक, मुंबई यांचे दर हे न्युनतम आहेत. मे.केडीसन डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांनी कोटेशनमध्ये नमुद केलेले केमिकल हे मागणी प्रमाणे नाही. तसेच परिशिष्ट ब मध्ये मे.मिनीटेक मुंबई यांनी कोटेशनमध्ये नमुद केलेले केमिकल मागणीप्रमाणे नाही व डिलक्स क्लिनींग सिस्टीम प्रा.लि., पुणे यांनी नमुद केलेले केमिकल मागणी प्रमाणे आहेत. त्यामुळे परिशिष्ट "अ" आणि "ब" याचा विचार करता "अ" साठी मे.मिनीटेक मुंबई व "ब" साठी मे.डिलक्स क्लिनींग सिस्टीम प्रा.लि., पुणे यांचे दर न्युनतम आहेत.

परंतू नवीन भक्तनिवासस्थान विभागाकडील दि.२०.१२.२०१० रोजीचे टिपणीत नमुद केलेनुसार भक्तनिवासस्थान दि.१७.०९.२००९ पासून परिशिष्ट "अ" चे मे.मिनिटेक, मुंबई यांचेकडील लॉण्ड्री केमिकल वापरत आहेत. नवीन भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्री केमिकलचा साठा पुर्णपणे संपल्याने त्यांना केमिकलची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे अधिक्षक नवीन भक्तनिवासस्थान यांनी सध्या तातडीची गरज लक्षात घेता परिशिष्ट अ मधील लॉण्ड्री केमिकल मे.मिनीटेक, मुंबई यांचेकडून घेण्याचे सुचीत केले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी भक्तनिवासस्थान विभागाकडील तातडीची गरज लक्षात घेता उपरोक्तप्रमाणे परिशिष्ट "अ" मधील लॉण्ड्री केमिकल न्युनतम दराने मे.मिनिटेक, मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारा रु.१,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,भक्तनिवासस्थान विभागाकडील तातडीची गरज लक्षात घेता उपरोक्तप्रमाणे परिशिष्ट "अ" मधील लॉण्ड्री केमिकल न्युनतम दराने मे.मिनिटेक, मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारा रु.१,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच येथूनपुढे संस्थानचे भक्तनिवासस्थाने, रुग्णालये व इतर विभागांचा लॉण्ड्री केमिकल खरेदीकामी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,खरेदी विभाग/अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.३३** **मे.मनिषा एंटरप्रायझेस, बीड यांची सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ सभा दि.२१.११.२०१० मधील निर्णयानुसार पाणी पुरवठा विभागास आवश्यक ६० टन फेरीक ॲलम खरेदीकामी निर्णय होऊन सन २०१०-११ करिता मे.मनिषा एंटरप्रायझेस, बीड यांना न्युनतम दराने इकडील जा.क्र.१०८२८/१०.१२.२०१० पुरवठा आदेश देणेत आलेला होता. फेरीक ॲलमचा पुरवठा करण्याची हमी म्हणून निविदेसोबत रोखीने भरलेली बयाणा रक्कम पावती नंबर २६१ दि.२१.१२.२०१० ने रु.५०००/- त्यांचे सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेत आलेली आहे. परंतू कच्च्या मालाचा बाजारभावन मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे त्यांनी माल पुरवठा न करता दरवाढीची मागणी केली होती.

पुरवठा आदेशातील अटीनुसार त्यांना दरवाढ देता येत नसल्यामुळे खरेदी विभागाकडील दि.०३.०१.२०११ रोजीचे टिपणीन्वये फेरीक ॲलम खरेदीकामी फेरनिविदा मागणी करणेस मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा.नं.११४७१/०६.०१.२०११ अन्वये फेर निविदा मागणी करणेत आली होती. प्राप्त निविदा मा.व्य.मंडळाचे दि.१३.०२.२०११ रोजीच्या सभेत उघडण्यात येऊन न्युनतम दरधारक मे.चिंतामणी केमिक्रॉप, परळी वैजनाथ यांना पुरवठा आदेश देणेत आला आहे.

मे.मनिषा एंटरप्रायजेस, बीड यांनी कच्च्या मालाचा बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे मालाचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे पुरवठा आदेशातील अट व शर्त क्र.१० नुसार मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. जर पुरवठाधारकाने माल पुरवठा करण्याचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास त्यांची पुर्णतः/अंशतः सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेची तरतुद आहे, तरी याबाबत निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.२३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मनिषा एंटरप्रायजेस, बीड यांनी कच्च्या मालाचा बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे मालाचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे पुरवठा आदेशातील अट व शर्त क्र.१० नुसार मे.मनिषा एंटरप्रायजेस,बीड यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.३४** **कोंकणी भाषेतील श्री साईसच्चरित संस्थान मार्फत प्रकाशित करणे बाबत**

**प्रस्ताव-** अध्यक्ष श्री साई सेवा समिती घोगळवाडी, मडगांव-गोवा यांनी मा.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना आग्रेषीत केलेल्या दि.०३.०३.२०११ चे पत्राने मुळ ओवीबद्ध मराठी साईसच्चरित श्री जय नायक यांचेकडून कोंकणी भाषेत ओविबद्ध भाषांतर करुन घेतले आहे. सदर ओवीबद्ध कोंकणी भाषेतील साईसच्चरित संस्थानकडून प्रकाशित करावे अशी विनंती केली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

सध्या १२ भाषेत संस्थान प्रकाशित साईचरित्रे उपलब्ध आहेत. कोंकणी भाषेतील श्री साईसच्चरित संस्थानकडे उपलब्ध नाही. संस्थानकडे जास्तीत जास्त भाषेत श्री साईबाबांचे जीवनावरील श्री साईसच्चरित उपलब्ध असणे हे संस्थानला भुषणावह आहे. कोंकणी भाषेतील श्री साईसच्चरित संस्थानने प्रकाशीत केल्यास कोंकणी भाषिक साई भक्तात साईबाबांचा प्रचार - प्रसार होईल.

सदरचे कोंकणी भाषेतील श्री साईसच्चरित संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित मराठी बरहुकूम असलेबाबत तसेच कोंकणी भाषांतरीत श्री साईसच्चरितात मुळ मराठी श्री साईसच्चरितातील मजकुराखेरीज काहीही फेरबदल नसलेबाबत गोवा कोंकणी अकादमी - पणजी या संस्थेकडील दाखला पण ते देणार आहेत. श्री. जय नायक हे प्रकाशनाचे सर्व हक्क संस्थानला देण्यास तयार आहेत, ते छपाईकामी सी.डी. तयार करुन देणार आहेत.

संस्थानद्वारा कोंकणी भाषेतील श्री साईसच्चरित २,००० प्रती छपाई करणेकामी प्रती अंदाजे दर रु.९०/-प्रमाणे अंदाजे एकूण रुपये १,८०,०००/- मात्र चे खर्च अपेक्षित आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कोंकणी भाषेत श्री साईसच्चरित २,००० प्रती छपाई करणेस, त्याकामी येणारे अंदाजे एकूण रुपये १,८०,०००/- मात्र चे खर्चास तसेच पुस्तके व फोटो छपाई कामी निवडक प्रेसधारकाकडून दरपत्रके मागविणेस मान्यता असावी .

**निर्णय क्र.२३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कोंकणी भाषेत २,००० प्रती श्री साईसच्चरित छपाई करणेकामी निवडक प्रेसधारकाकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,८०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**विषय नं.३५ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील पुर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाकडे मानधन तत्त्वावर शिक्षण सेवक नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूलकडे ३१ वर्ग/ खोल्या सध्या उपलब्ध आहेत. सन २०११- १२ मध्ये ज्यु. के.जी वर्गासाठी वर्ग/ खोल्या उपलब्ध नसल्याने मा.उपकार्यकारी यांचे कक्षात समक्ष चर्चे नुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थे कडून १ हॉल व १ खोली उपलब्ध झाल्याने हॉल मध्ये पार्टीशन टाकून २ व १ खोली अशा ३ तुकडया २०११-१२ मध्ये ज्युनियर के.जी. वर्गाच्या करता येतील सन २०११-१२ मध्ये ज्युनियर के.जी.च्या ३ तुकडया केल्यास खालीलप्रमाणे शिक्षकांचे नियोजन करावे लागेल.

०१) सन २०११-१२ मध्ये ज्युनियर के.जी.च्या ०३ व सिनियर के.जी. वर्गाच्या ०६ तुकडया अशा एकूण ०९ तुकडया होणार आहे. आपल्याकडे के.जी. विभागासाठी ०४ कायम कर्मचारी शिक्षीका उपलब्ध आहेत व ०५ शिक्षणसेवक आणखी लागणार आहेत. सन २००९-१० मध्ये जाहिरात देऊन नेमलेले प्रथम ०४ शिक्षणसेवक व सन २०१०-११ मध्ये जाहीरात देऊन मुलाखतीद्वारे नेमणूक केलेल्या ०१ शिक्षणसेविका असे एकुण ०५ शिक्षण सेविकांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे. या ०५ शिक्षण सेविकांना सन २०११-१२ मध्ये ११ महिन्यांकरिता मागील वर्षाप्रमाणे दरमहा प्रत्येकी रु.२५००/- मानधन देऊन पुनरनेमणूक करता येईल.

०१) श्रीमती डांगे योगिता गोरक्ष, ०२) श्रीमती गाडेकर शितल अंबादास, ०३) श्रीमती लबडे उज्वला भागचंद, ०४) श्रीमती कोटकर सविता राधाकिसन, ०५) श्रीमती येवले उज्वला नानासाहेब

तसेच-

शैक्षणिक वर्ष २०१०- ११ मध्ये इ.१ ली ते ४ थी च्या एकूण १२ वर्ग/ तुकडया होणार आहे. आपल्याकडे प्राथमिक विभागासाठी ०६ कायम कर्मचारी शिक्षिका उपलब्ध आहेत व ०६ शिक्षणसेवक आणखी लागणार आहेत. सन २०१०- ११ मध्ये जाहीरात देऊन मुलाखती व्दारे नेमणूक केलेले ०५ शिक्षण सेवक/ सेविकांचे काम समाधानकारक असून वर्तणूक चांगली आहे. या ०५ शिक्षण सेवक/ सेविकांना सन २०११- १२ मध्ये ११ महिन्याकरीता मागील वर्षाप्रमाणे दरमहा प्रत्येकी रु.३०००/- मानधन देवून पूनर नेमणूक करता येईल.

०१) श्रीमती परदेशी निता हिरामण, ०२) श्रीमती शिंदे आश्विनी राजाराम, ०३) श्रीमती ठोकळ सोनिया प्रकाश, ०४) श्रीमती बोधक ज्योती अरूण, ०५) श्री राशिनकर रावसाहेब रामभाऊ

तथापि प्राथमिक विभागासाठी १ शिक्षण सेवकाची नेमणूक करावी लागणार आहे. त्यासाठी जाहिरात देवून अर्ज मागविणे व लेखी तोंडी परिक्षा घेऊन पात्र उमेदवार ठरविण्यास बराच कालावधी जातो. त्यामुळे मागील वर्षाचे लेखी व तोंडी परिक्षेत पात्र ठरलेल्या आणि प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना विचार करुन, सदर जागेवर नेमणूक करता येईल.

तरी वरीलप्रमाणे पुर्व प्राथमिक विभागासाठी ०५ व प्राथमिक विभागासाठी ०५ असे एकूण १० शिक्षण सेवकांना दरमहा मानधन तत्वावर पुनर नेमणूक देणे कामी व प्राथमिक विभागासाठी ०१ शिक्षण सेवकाची नेमणूक करणे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३५ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पूर्व प्राथमिक विभागासाठी ०५ व प्राथमिक विभागासाठी ०५ असे एकूण १० शिक्षण सेवकांना दरमहा मानधन तत्वावर २०११-१२ शैक्षणिक वर्षासाठी पूनर्नेमणूक देण्यात यावी.**

**तसेच प्राथमिक विभागासाठी शिक्षणसेवकाचे ०१ जागेसाठी जाहिरात देऊन अर्ज मागविणे व लेखी-तोंडी परिक्षा घेऊन, पात्र उमेदवार ठरविण्यास बराच कालावधी जातो, याकरिता मागील वर्षाचे लेखी व तोंडी परिक्षेतील पात्र यादीतील उमेदवारास शिक्षण सेवक या पदावर नेमणूक देण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/प्राचार्या,इंग्लिश मिडियम स्कुल)

---

**विषय नं.३६ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता स्कुल बस शुल्कात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इं.मि.स्कुलमध्ये सन २००८-०९ या वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ रोजीचे सभेत स्कुलबस शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता , त्यावर निर्णय

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



क्रमांक ४१५ नुसार स्कुलबस शुल्कात ३० % प्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे स्कुलबस फी अद्यापपर्यत आकारण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये श्री साईबाबा इं.मि.स्कुल कडील शैक्षणिक शुल्कात इतर शाळेच्या शुल्क तुलनेत प्रत्येक वर्गासाठी रु.१०००/- मात्र प्रमाणे वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता, त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३.०२.२०११ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

तथापि शालेय शुल्काबरोबरच स्कुलबस शुल्कात वाढ करण्यात यावी असे नम्र मत आहे. शाळेकडे एकुण ९ स्कुलबस वापरात असुन, त्यापैकी ३ स्कुलबस दोन ट्रिप करतात. एका स्कुलबस मागे इंधन खर्च , दुरुस्ती खर्च , कर्मचारी पगार, विमा खर्च , टॅक्स खर्च व शाळेकडे एकुण जमा होणारी स्कुलबस शुल्क (फी ) या गोष्टीचा विचार करता त्यामध्ये बरीच तफावत आढळुन आलेली आहे. आर्थिक वर्ष २००८-०९ व २००९-१० मध्ये झालेल्या ऑडीट अहवालामध्ये रुपये ४२,२९,४७५.५०/- मात्र व ६५,५४,०४२.००/-मात्र इतकी तुट दर्शविली असून, त्यामध्ये सदरची तुट कमी करणेबाबत ऑडीट अहवालमध्ये उपाययोजना करणेबाबत सुचित केले आहे. सध्या वेगवेगळया ठिकाणाहून येणाऱ्या विद्यार्थ्याकडुन खालीलप्रमाणे बस फी आकारण्यात येत आहे.

| अ.नं. | ठिकाण | एकुण विद्यार्थी संख्या | शाळेपासून अंतर कि.मी | आकारणेत येणारी बस फी |
|---|---|---|---|---|
| ०१ | रुई / बाराहाते वस्ती | ३४ | १५ कि.मी. | २२७५ |
| ०२ | निमगाव/निघोज/सावळीविहीर | १११ | ०५ कि.मी. | १५६० |
| ०३ | राहाता | ३३ | ०५ कि.मी. | १५६० |
| ०४ | पिंपळवाडी | ६३ | ०७ कि.मी. | १५६० |
| ०५ | बन | २१ | ०५ कि.मी. | १३०० |
| ०६ | नांदुर्खी | ६६ | ०७ कि.मी. | १३०० |
| ०७ | कनकुरी | ५७ | ०४ कि.मी. | १३०० |
| ०८ | डोऱ्हाळे | १२ | ०८ कि.मी. | १८२० |
| ०९ | चारी ११/पोलिसस्टेशन | १३ | ०३ कि.मी. | १३०० |
| १० | श्रीखंडेवस्ती/गोदावरी वसाहत | ५२ | ०२ कि.मी. | १३०० |
| ११ | लुटेवस्ती | ३ | ०४ कि.मी. | १३०० |
| १२ | शिरडी / परिसर | ५८३ | ०३ कि.मी. | ११७० |
| | **एकुण संख्या** | **१०४८** | | |

वाहन विभागाकडील आकडेवारीनुसार स्कुलबससाठी २०१०-११ मधील स्कुलबस शुल्क व खर्च याबाबतचा तपशिलवार तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. नं | स्कुलबस इंधन, दुरुस्ती खर्च , कर्मचारी पगार, विमा खर्च व टॅक्स खर्च | स्कुलबसने ये-जा करणारी एकुण विद्यार्थी संख्या | एकुण जमा झालेले स्कुलबस शुल्क | तूट |
|---|---|---|---|---|
| ०१ | २३,९२,०८६.०० | १०४८ | १३,९४,३००.०० | ९,९७,७८६.०० |

उपरोक्त तक्त्याचा विचार केला असता, स्कुलबसवरील एकुण खर्चाच्या तुलनेत सुमारे ४१ % तुट आहे. सन २०१०-११ मध्ये संस्थेला स्कुलबस साठी एकुण रु.९,९७,७८६.००/- (अक्षरी रुपये नऊ लाख सत्यान्नव हजार सातशे शहाऐंशी मात्रचा ) निव्वळ तोटा सहन करावा लागला आहे. सन २००८-०९ मध्ये ३०% वाढ केल्या नंतर स्कुलबस शुल्कात अद्यापपर्यत कुठलीही वाढ केलेली नाही. दरम्यानचे कालावधीमध्ये इंधन खर्च , कर्मचारी पगार, दुरुस्ती खर्च , टॅक्स खर्च इ. सर्वच खर्चात वाढ झालेली आहे.

तरी या खर्चाचा विचार करता सन २०११-१२ वर्षासाठी स्कुलबस शुल्कात वाढ करावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती .

**निर्णय क्र.२३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैधानिक लेखापरिक्षणातील अभिप्राय विचारात घेता, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडील शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता इंधन खर्च, कर्मचारी पगार, दुरुस्ती खर्च, टॅक्स खर्च इ. खर्चाचा विचार करुन तूट भरुन निघेल इतकी स्कुलबस शुल्कात वाढ करण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडियम स्कुल)

---

**विषय नं.३७** **नविन फळे (सिरॅमिक ग्रीन बोर्ड) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाच्या प्रत्येक वर्गामध्ये अध्यापनाकरीता सिमेंटचे फळे तयार करुन देण्यात आलेले आहेत. दैनंदिन वापरामुळे फळयावरील रंग निघून जातो. त्यामुळे प्रत्येक वर्गामधील फळे दरवर्षी घासून त्यावर रंग देऊन तयार करुन घ्यावे लागतात. असे वारंवार झाल्याने

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यावरील रंग व प्लॅस्टर गुळगुळीत झाले आहे. त्यावर खडूने लिहलेले स्पष्ट उमटत नाही. प्रकाशात फळे चमकतात. विद्यार्थ्यांना फळयावरील अक्षर कळण्यास अडचण निर्माण होते.

याकरीता पर्याय म्हणून सध्या बाजारामध्ये नवीन तंत्रज्ञानाचे वेगवेगळया मापाचे, रंगाचे, अतिशय टिकाऊ व आकर्षक सिरॅमिक फळे उपलब्ध झालेले आहेत. तपशीलात दिल्याप्रमाणे फळे खरेदी करण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | तपशील | साईज | नग |
|---|---|---|---|
| ०१ | वर्ग फळे | ४ फूट x ८ फूट | १२ |
| ०२ | सूचनाबोर्ड विथ फोर लेग स्टॅन्डसह | ३ फूट x४ फूट | ०१ |
| ०३ | ग्रोव्ह फेल्टबोर्ड | २ फूट x४ फूट | ०१ |

याकरीता अंदाजे खर्च रुपये १,००,०००/- (अंदाजे खर्च अक्षरी रुपये एक लक्ष) मात्र पर्यंत अपेक्षित आहे.

**निर्णय क्र.२३७ यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीराकरिता नविन फळे (सिरॅमिक ग्रीन बोर्ड) खरेदी करणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यध्यापिका कन्या विद्या मंदीर)

---

**विषय नं.३८ विविध देशात साई भजन संध्या आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम-२००४ मधील

**०१.** कलम नं.१७-२(ठ) मध्ये श्री साईबाबांचे जीवन कार्य , त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

**०२.** १७-२-ड मध्ये श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव , एकता , श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल

**०३.** १७ (६) मध्ये या अधिनियमातील तरतूदीस अधीन राहून, समितीला या अधिनीयमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.

**०४.** २१ (ड) मध्ये व्यवस्थापन समिती संस्थान निधीचा श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार करणे कामी विनीयोग करील अशी तरतूद आहे.

यानूसार विविध ठिकाणी भजन संध्या आयोजित करण्यात येतात. यापूर्वी लंडन येथील अल्बर्ट हॅाल येथे भजन संध्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास तेथील साई भक्तांचा उदंड प्रतिसाद मिळालेला आहे. या ठिकाणी उपस्थितांना साईबाबांचे चरीत्र व आरतीची सी डी संस्थान मार्फत मोफत देण्यात आलेली होती.

सदरचे कार्यक्रमाप्रमाणे विविध देशातील साईभक्तांनी त्यांच्या देशात साईभजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करणे बाबत पत्र पाठविलेली आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | अर्जदार साई भक्त / संस्थेचे नाव | ठिकाण | नियोजित तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01 | Persatuan Shirdi Sai baba Malayaia.S.P..Kannan. chairman | मलेशिया | 28 & 28/05/2011 or 04 & 05/06/2011 | कार्यक्रमाची रुपरेषा, नियमावली चर्चे नंतर ठरविता येईल. |
| 02 | Satish Aytha | New York Wshington | | तारीख व कार्यक्रमाची रुपरेषा, नियमावली चर्चे नंतर ठरविता येईल. |
| 03 | श्री अरविंद टिकु . सिंगापूर<br>या साईभक्ताने सिंगापूर येथे भजन सध्या कार्यक्रमाचे आयोजन करणेस विनंती केलेली आहे. | Singapore | 12-15 April 2011 or<br>26-28 April 2011 or<br>5-6 May 2011 or<br>21-24 june 2011 or<br>12-15 July 2011 or<br>16-17Aug. 2011 or<br>13-16 dec.2011 or<br>20-23 Dec.2011 | तारीख निश्चीतीनंतर कार्यक्रमाची रुपरेषा, नियमावली चर्चा करुन ठरविता येईल. |
| 04 | Shri Sai & Ruth Cholleti<br>Sri Sai Association Germany | Hamburg, Germany | 28 April 2012 | तारीख निश्चीतीनंतर कार्यक्रमाची रुपरेषा, नियमावली चर्चा करुन ठरविता येईल. |
| 05 | सच्चीदानंद सदगुरु शिडी साईनाथ महाराज मंदिर, मिसीसाऊगा - कॅनडा | मिसीसाऊगा- कॅनडा | . | तारीख व कार्यक्रमाची रुपरेषा, नियमावली चर्चे नंतर ठरविता येईल. |

वरील प्रमाणे विविध देशात साई भजन संध्या आयोजित करणे बाबत धोरणात्मक निर्णय होणेस विनंती आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.२३८ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. कार्यक्रमाचे निश्चितीबाबत संयोजकाशी संपर्क करण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-सामन्य प्रशासन,वशी-०५)

---

**दि.२६.०३.२०११ चे सभेतील निर्णय-**

**विषय नं.३९ साईउद्यान येथे शिर्डी पोस्ट ऑफिसला दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** ०१) अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांचे दि. २८/११/२००३ व दि. ०१/१२/२००३ चे पत्रास अनुसरुन संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२००३ चे मंजूर ठरावा प्रमाणे शिर्डी येथे पोष्ट ऑफीसचे वापरासाठी संस्थानने लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि. १८/१२/२००३ ते दि. १७/११/२००४ या कालावधीसाठी ११ महिने मुदतीसाठी संस्थानचे साईउद्यान इमारतीमधील २ हॉल्स् (१,५९९.४१ स्क्वे.फुट)वापरांस देणेत आले आहे. सदर जागेची परवाना फी शासकीय दराने(लाईट बिल अलहिदा ) पोष्ट ऑफीसने संस्थानास अदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/वशी ०२/६९४/२०१० दि.०७/०४/२००४ ने कळविणेत आलेले आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समीतीचे दि.२७/१२/२००४ ठरावांस अनुसरुन पुढील ११ महिने कालावधी साठी (दि.१८/११/२००४ ते १७/१०/२००५) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर उपरोक्त जागा पोष्ट खात्यास वापरास देणेत आली. टपाल विभागाचे भाडे-निर्धारण समितीने निर्धारित केलेले भाडे आकारणी (लाईट चार्जेस अलहिदा) प्रमाणे भाडे आकारणीवर प्रस्तुतची जागा त्यांना वापरांस देणेत आलेली आहे.

शिर्डी पोष्ट ऑफीसला वापरांस दिलेले उपरोक्त जागेचे संदर्भात त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/१२/२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत ठराव होऊन पी.डब्ल्यु.डी. ने ठरवुन दिलेले दराने पोष्ट ऑफीसकडुन पांच वर्षाचा करारनामा करणेत यावा. व त्यानंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी असा निर्णय झाला आहे. थोडक्यात खाली तक्त्यात दर्शविलेप्रमाणे जागा वापरांस दिलेली आहे.

| अ.क्र. | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव दिनांक | वापरांस दिलेला कालावधी |
|---|---|---|
| १ | दि. १३/१२/२००३ निर्णय क्र. ५९० | दि. १८/१२/२००३ ते दि. १७/११/२००४ |
| २ | दि. २७/१२/२००४ निर्णय क्र. १६६ | दि. १८/११/२००४ ते दि. १७/१०/२००५ |
| ३ | दि. १४/१२/२००५ निर्णय क्र. ७७० | दि. १८/१०/२००५ ते दि. १७/१०/२०१० |

परंतू संस्थान साठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी - २००४ हा अॅक्ट लागू झाला त्यामधील तरतुदी प्रमाणे शासनाची परवानगी असल्या शिवाय १ वर्षा पेक्षा जास्त कालावधी साठी संस्थान मिळकत हस्तांतरीत करता येत नाही. असे पोष्ट खात्यास कळविणेत आले आहे. रेंट, कराराचे बाबत स्पष्ट खुलासा मागविणेत आला. तसेच दि.०६/०८/२००९ चे कार्यालयीन टिपणीवरील आदेशास अनुसरुन इकडील एसएसएस/वशी-०२/११६६३/२००९, दि.१७/०९/२००९ चे पत्राने अधीक्षक , डाकघर श्रीरामपुर यांना दि.०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० अखेरपावेतो जागेबाबतचा करारनामा करुन दयावा, असे कळविण्यात आले आहे. ( सदरचा कालावधी आर्थीक वर्षाच्या सोयीने त्यांना कळविण्यात आला होता.) सदर जागेचा वापर वर तक्त्यात दर्शविले प्रमाणे आहे.

पोष्ट खाते हे केंद्र सरकारचे अखत्यारीतील खाते आहे. जनतेचे दृष्टीने टपाल सेवा त्यांचे मार्फत चालू आहेत. शिर्डी येथील पोष्टातील बराचसा व्यवहार संस्थान संबंधीत आहे. त्याचा विचार होऊन जागा वापरासाठी असावी असे पोष्ट खात्याचे म्हणणे आहे.

सध्या पोष्ट ऑफीसकडून या जागेचे रु. १,०००/- मासिक परवाना फी प्राप्त होत आहे. त्यांनी दि.०५/०३/२०१० चे पत्राने व त्यापुर्वीही ५ वर्षाचा भाडे पट्टा नोंदणी नुतनीकरणाबाबत मागणी केलेली आहे.

परंतू संस्थानचे अधिनियमाप्रमाणे ५ वर्षाचा भाडेपट्टा करता येणार नाही, व तसे संस्थानने त्यांना दि.३१/०७/२०१० जा.क्र.८७५१/१०, ने कळविलेले आहे. तसेच सदर जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून रेंट निश्चित करुन घेणेबाबत कळविलेले आहे. व ( त्याचप्रमाणे पोष्ट खात्याचे दि.०३/०८/२०१० रोजीचे पत्रावरुन व दि.२९/०१/२०११ चे सार्वजनिक बांधकाम विभाग, लोणी यांना त्यांनी पाठविलेले पत्रावरुन ) रेंट निश्चित करणेबाबत त्यांचे कार्यालयाकडून कार्यवाही चालू असल्याचे दिसून येते. मात्र पोष्ट ऑफीस हे केंद्र सरकारचे अखत्यारीत असल्यामुळे त्याबाबत रेट ठरविणेचे अधिकार सेंट्रल पी.डब्ल्यु.डी. नाशिक यांचकडून निश्चित होईल, अशी माहिती प्राप्त झाली आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत जागेचा रेंट निश्चित होणेसाठी कालावधी लागणार आहे. तसेच शासनाचे मान्यतेशिवाय ५ वर्षासाठी अधिनियमाचे तरतुदीस अनुसरुन त्यांना जागा वापरांस देता येणार नाही. याबाबतचा विचार करता १ वर्षासाठी दि. १७/१०/२०१० ते दि. १६/१०/२०११ या कालावधीसाठी त्यांना जागा लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांस देणेबाबत व त्यांचेकडून शासन नियमास अनुसरुन पी.डब्ल्यु.डी. / सेंट्रल पी.डब्ल्यु.डी. / पोष्टाची भाडे निर्धारण समिति यांनी निर्धारीत केलेले रेंट (भाडे) आकारुन (मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारुन) जागा वापरांस देणेबाबतचे निर्णयासाठी सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईउद्यान इमारतीत शिर्डी पोस्ट ऑफिसला दिलेल्या जागेस दिनांक १७/१०/२०१० ते दिनांक १६/१०/२०११ या ०१ वर्ष कालावधीसाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी. त्यांचेकडून शासन नियमास अनुसरुन पी.डब्ल्यु.डी. / सेंट्रल पी.डब्ल्यु.डी./ पोष्टाची भाडे निर्धारण समिती यांनी निर्धारीत केलेले रेंट (भाडे) व मिटर रिडींग प्रमाणे लाईट बील वेगळे आकारण्यात यावे. तसेच ०१ वर्षाचा कालावधी संपलेनंतर पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार नाही असे त्यांना स्पष्ट कळविण्यात यावे, असें ठरलें.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.४०** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. ऑप. सोसायटीचे मंदिर व परिसरातील स्टॉल इतरत्र हलविणेचे ठरावाची अट वगळुन मुदतवाढ देणेबाबत व साईभक्तांच्या सोयीसाठी सोसायटीस वापरांस दिलेले गाळे ५ वर्षाच्या मुदतीसाठी देणेबाबत तत्वतः मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सो.लि.शिर्डी यांना १२ महिन्याचे कालावधी साठी (दि. ०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१० अखेर) लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर खालील तक्त्यात दर्शविलेले व्यवसाय चालविण्यास देण्यात आले होते.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | मासिक भाडे<br>दि.१०/०१/२०१० मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. ९१ निर्णय क्र.९१ ने दि. १/६/२००९ ते ३१/५/२०१० | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | **कार पार्किग**<br>अ) नविन भक्तनिवासस्थान<br>ब ) धर्मशाळा ( २०० रुम ) | <br>रु.४७,१६०/-<br>रु. ११,७९२/- | <br>०१) भक्तनिवास परिसर<br>०२ ) धर्मशाळा परिसर |
| ०२ | **क्लोकरुम**<br>अ) सुलभ क्लोकरुम,<br>ब ) साईप्रसाद क्लोकरुम<br>क ) न.भक्तनिवास क्लोकरुम | <br>रु.५,१४८/-<br>(एकत्रित फी ) | <br>०१) सुलभ शौचालय इमारतमधील हॉल<br>०२) जुने चौकशी कार्यालय शेजारी रुम<br>०३) न.भक्तनिवास मेन गेट जवळ रुम |
| ०३ | **एस.टी.डी.बुथ**<br>अ) एस.टी.डी.-०१,<br>ब) एस.टी.डी.-०२,<br>**क) एस.टी.डी.-०३** | <br>रु.२,१४८/-<br>रु. २,१४८/-<br>रु.१,२९०/- | <br>०१) साईप्रसाद पॉ.हाऊस समोरील स्टॉल<br>०२) धर्मशाळा परिसर (२०० रुम)-गाळा<br>०३) शांती निवास उत्तर गेट-स्टॉल |
| ०४ | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३,<br>ब ) प्रसाद स्टोअर नं.-२,<br>क ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-१,<br>ड ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.- २,<br>ई ) प्रसाद स्टोअर नं.-१, | <br>रु. २,१४८/-<br>रु. २,१४८/-<br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/- | <br>०१) धर्मशाळा ब्लॉक नं.१ - गाळा<br>०२) धर्मशाळ ब्लॉक नं.२ - गाळा<br>०३) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ३ - गाळा<br>०४) भक्तनिवास डी ब्लॉक नं. २ - गाळा<br>०५) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ४ - गाळा |
| ०५ | **दुध स्टॉल /दुग्धजन्य पदार्थ**<br>अ) दुध स्टॉल नं.०१,<br>ब) दुध स्टॉल नं.२,<br>क) दुध स्टॉल नं.३<br>ड) दुध स्टॉल नं.०५,<br>इ ) दुध स्टॉल नं.०६,<br>ई ) दुध स्टॉल नं.०७,<br><br>उ ) दुध स्टॉल नं.०८<br><br>ऊ ) दुध स्टॉल नं.०४ | <br>रु. २,१४८/-<br>रु. २,१४८/-<br>रु. १७,७२०/-<br>रु. २,१४८ /-<br>रु. २,१४८ /-<br>रु. २,१४८/-<br><br>रु. २,१४८/-<br><br>रु. ५,१००/- | <br>०१) आब्दूलबाबा समाधी जवळ गाळा*<br>०२) साईप्रसाद परिसर स्टॉल<br>०३) उत्तर गेट पश्चिमेस गाळा *<br>०४) स्वागत कक्ष स्टॉल<br>०५) उत्तर गेट पुर्वेस स्टॉल *<br>०६) शांतिनिवास दर्शन लाईन गेट गाळा *<br>०७) भक्तनिवास दर्शन लाईन (ओपन स्पेस.) *<br>०८) न.भ.निवास कॅन्टीन शेजारी गाळा |

**उपरोक्त तक्त्यात बोल्ड करुन दर्शविलेले स्टॉल मंदीर परिसरातील आहे.**

दि. ३१/०५/२०१० रोजी उपरोक्त व्यवसायाच्या मुदती संपल्यानंतर सदरचे व्यवसायास पुढील १ वर्षासाठी ( म्हणजे दि. ०१/०६/२०१० ते दि. ३१/०५/२०११ अखेर ) मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देणेबाबत दि. ०४/०७/२०१० चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.७६ निर्णय क्र. ५९७ ने ठरले त्याच बरोबर सोसायटीने मंदीर परिसरातील स्टॉल्स मंदीर परिसरा बाहेर हलविल्यासच मुदतवाढ देण्यात यावी असा ठराव झाला आहे.

२) उपरोक्त ठरावास अनुसरुन जा.क्र. एसएसएस/वशी- विधी /१२०९०/२०११ दि. १४/०२/२०११ चे आदेशाने सोसायटीस मंदीर परिसरातील गाळे सोडून खालील तक्त्यातील स्टॉल्स / गाळ्यांचे व्यवसायास पुढील १ वर्षाचे कालावधी साठी (म्हणजे दि. ०१/०६/२०१० ते दि. ३१/०५/२०११ अखेर) मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | व्यवसायाचे नांव | मासिक भाडे ( दि. ०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१०) | मा.परवाना फी दि. ०४/०७/२०१० चे मा. व्य. स. सभेतील वि. नं.७६ नि. क्र. ५९७ ( दि. १/६/२०१० ते दि. ३१/०५/२०११) | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कार पार्किग**<br>अ)नविन भक्तनिवासस्थान<br>ब ) धर्मशाळा ( २०० रुम ) | <br>रु.४७,१६०/-<br>रु. ११,७९२/- | <br>रु. ५१,८७६/-<br>रु. १२,९७१ /- | <br>१) भक्तनिवास परिसर<br>२ ) धर्मशाळा परिसर |
| ०२ | **क्लोकरुम**<br>अ) सुलभ क्लोकरुम,<br>ब ) साईप्रसाद क्लोकरुम | <br>रु.५,१४८/-<br>(एकत्रित फी ) | <br>रु. ५,६६३/-<br>(एकत्रित फी ) | <br>१) सुलभ शौचालय इमारत हॉल<br>२) जुने चौकशी कार्यालय शेजारी रुम |
| ०३ | **एस.टी.डी.बुथ**<br>अ) एस.टी.डी.-०१,<br>ब) एस.टी.डी.-०२, | <br>रु.२,१४८/-<br>रु. २,१४८/- | <br>रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | <br>१) साईप्रसाद पॉ.हाऊस समोर स्टॉल<br>२) धर्मशाळा परिसर (२००रुम) गाळा |
| ०४ | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३,<br>ब ) प्रसाद स्टोअर नं.०२, | <br>रु. २,१४८/-<br>रु. २,१४८/- | <br>रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | <br>१) धर्मशाळा ब्लॉक नं.१, गाळा (२००रुम)<br>२) धर्मशाळ ब्लॉक नं.२, गाळा (२००रुम) |
| ०५ | **दुध स्टॉल**<br>१) दुध स्टॉल नं.२,<br>२) दुध स्टॉल नं.५, | <br>रु. २,१४८/-<br>रु. २,१४८/- | <br>रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | <br>१) साईप्रसाद परिसर स्टॉल - स्टॉल<br>२) स्वागत कक्ष स्टॉल - स्टॉल |

दि. १०/०१/२०१० चे मा.व्यवस्थापन समितीमध्ये आयत्या वेळचा विषय नं. ८९ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबतचा विषय होता. त्यावर निर्णय क्र. १९२ ने व " संस्थान परिसरातील जनसंपर्क कार्यालय, रेल्वे रिझर्वेशन काऊंटर व संस्थान कर्मचाऱ्यांची श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.सोसायटी साठी देण्यात आलेल सर्व स्टॉल जुने प्रसादालय परिसरात हलविण्यात यावे.." असा निर्णय झालेला असल्याने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सो.लि.शिर्डीस खालील तक्त्यातील स्टॉल हलविणेबाबत कळविलेले आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | मासिक भाडे | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | एस.टी.डी.बुथ | रु.१,२९०/- | शांती निवास उत्तर गेट स्टॉल |
| ०२ | दुध स्टॉल नं.०१, | रु. २,१४८/- | अब्दुल बाबा समाधी जवळ गाळा |
| ०३ | दुध स्टॉल नं. ०३ | रु.१७,७२०/- | मुख्य प्रवेशद्वार गेट नं.०२ उत्तर गेट पश्चिमेस गाळा |
| ०४ | दुध स्टॉल नं.०६, | रु. २,१४८/- | मुख्य प्रवेशद्वार गेट नं.०२ उत्तर गेट पुर्वेस गाळा |
| ०५ | दुध स्टॉल नं.०७, | रु. २,१४८/- | शांतिनिवास दर्शन लाईन गेट गाळा |
| ०६ | दुध स्टॉल नं.०८, | रु. २,१४८/- | भक्तनिवास दर्शन लाईन स्टॉल |

१) जा.क्र. एसएसएस / वशी -२/ ५७१६ / २०१० दि. ०९ /०४/२०१० २) जा.क्र. एसएसएस / वशी -२/ ३०७५/ २०१० दि. २९/०५/२०१० ३) जा.क्र. एसएसएस / वशी -२/ ३९५३ / २०१० दि. २० /०७/२०१० ४) जा.क्र. एसएसएस / वशी -विधी / १२०९०/ २०११ दि. १४/०२/२०११ या चार पत्राने व वारंवार तोंडी सुचने व्दारे सोसायटीस गाळे स्थलांतरीत करणेबाबत कळविलेले आहे. दि. ०४/०७/२०१० चे ठरावास अनुसरुन सोसायटीस मंदीर परिसरातील गाळे हलविल्यासच त्यांची पुढील मुदतवाढ देण्यात येईल असेही कळविलेले आहे. तरी ही सोसायटीने आद्याप गाळे स्थलांतरीत केलेले नाही. मंदीर परिसरातच असे वर दर्शविलेले ६ ठिकाणी असे व्यवसाय त्यांचेकडून चालू आहे. व त्याची मासिक परवाना फी अदा करीत आहेत. त्यांना कार्यालयीन आदेश दिलेला नाही. याबाबत पुढील भुमीका दि. ३१/०५/२०११ चे आत घेणे सोयीचे राहील.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप. सोसायटीने आता दि. १३/०१/२०११ चे मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र पाठवले आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे. की मा.श्री जयंतरावजी ससाणे, अध्यक्ष साहेब यांना श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप. सोसायटीस मंदीर परिसरात गाळे / स्टॉलसाठी खास बाब म्हणून ५ वर्षासाठी मुदतवाढ द्यावी असे कळविले आहे. परंतू याबाबत अद्यापपर्यंत संस्थानकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही व होत नाही. उलट पत्राने संस्थानकडून वारंवार गाळे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



खाली करुन देणेबाबत पत्र येत असल्याने संस्थेचे भवितव्य धोक्यात येत आहे. तरी आपण याबाबत लक्ष घालून संबंधीतांना सुचना देवून प्रत्यक्ष

कार्यवाही होणेस प्रस्तुत पत्रात विनंती केली आहे. तसेच २०० रुम परिसरातील गाळे व्दारावती इमारती मधील गाळ्यांमध्ये स्थलांतरीत करणेस विनंती केलेली आहे. मात्र व्दारावती इमारती मध्ये बांधकाम गाळे नाही. सदर ठिकाणी गाळे/स्टॉल तयार झाल्यानंतरच याबाबत पुढील यथायोग्य पुढील विचार करणे उचित राहील. तसे सोसायटीस कळविणेसाठी सादर. सोसायटीचे पत्रावर मा.नामदार साहेब यांनी दि. ३०/०१/२०११ रोजीचे मा.अध्यक्ष साहेब यांचे नांवे पत्र देवून सदर भाड्याची मुदतवाढ ५ वर्षे देणेबाबत तात्काळ मान्यता द्यावी असे कळविलेले आहे. त्या पत्रावर मा.अध्यक्षसाहेबांनी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस सुचित केलेले आहे.

संस्थानला सन २००४ पासून अधिनियम २००४ लागू झाला आहे. त्यातील कलम १७ (३) नुसार विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही, अशा आशयाचा आहे. त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप. सोसायटीचे गाळे / स्टॉल च्या व्यवसायास ५ वर्षासाठी पुढील मुदतवाढ देता येणार नाही. तथापि खासबाब म्हणून ५ वर्षासाठी व्यवसाय / गाळे चालविणेसाठी तत्वतः मान्यता देणे साठी (उपरोक्त परिस्थितीचा विचार करता व मा.अध्यक्ष सो. यांचे सुचने प्रमाणे ) निर्णय होणेसाठी प्रस्तुतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेचे मान्यतेसाठी आज्ञा होणेस विनंती आहे.

१) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप.सोसायटीचे मंदिर परिसरातील स्टॉल स्थलांतरीत केल्यासच मुदतवाढ (दि.३१/०५/२०११ पावेतो) देण्यात यावी, असा निर्णय झाला आहे. परंतू स्टॉलस् हलविणेत आलेले नाहीत. तरी मंदिर परिसरातील ६ स्टॉलचे स्थलांतर साईप्रसाद परिसरात हलविणेबाबतची अट वगळून सदर व्यवसायाची मुदत दि.३१/०५/२०११ पावेतोची देणेबाबत.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) नुसार विश्वस्तव्यवस्थे मध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही. अशी तरतूद आहे. श्री साई संस्थान एम्लॉईज क्रे.को.सोसायटी यांना उपरोक्त स्टॉलस् / गाळे लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरास दिलेले आहेत. चालविण्यास देण्यात आलेल्या गाळ्यांची /व्यवसायाची/स्टॉलची मुदत ५ वर्षासाठी वाढवून मिळणेबाबत सोसायटी विनंती करीत आहे. श्री साई संस्थान एम्लॉईज क्रे.को.सोसायटी ही सहकारी संस्था आहे. या सर्व बाबी विचारात घेता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर (भाडेपट्याने नव्हे), मागील वर्षाचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन, तत्वतः ५ वर्षासाठी ( ०१/०४/२०११ ते दि. ३१/०५/२०१६) संस्थान परिसरातील उपरोक्त ठिकाणी व्यवसाय चालविणेस देणेसाठी तत्वतः मान्यतेसाठी व प्रत्येक नवीन वर्षासाठीचे मुदतवाढीसाठी सोसायटी समवेत नव्याने करारनामा नुतनीकरण करणेचे विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२४० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.४१ सन २०१०-११ चा पथकर शिर्डी नगरपंचायत, शिर्डीला अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्र. न.पं. /साप्र/ कावि.०१/३०४/११ दि. ०२/०२/२०११ रोजीचे पत्राने एप्रिल २०१० ते मार्च २०११ अखेर विशेष स्वच्छता आरोग्य कर मिळणेस विनंती केली आहे.सदर पत्रात निश्चित किती रक्कम पाठवावी यांचा तपशिल त्यांनी पत्रात नमुद केला नाही. शिर्डी नगरपंचायतीस जा.क्र. एसएसएस वशी-विधी/१२०७३/२०११ दि.१२/०२/२०११ रोजीचे पत्र पाठवुन दि.०२/०२/२०११ रोजीचे पत्रात नमुद केलेले संदर्भिय पत्राची माहिती मागविण्यात आली. त्यावर शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडुन जा.क्र. न.पं./साप्र/ कावि.०१/३३५/२०११ दि. २८/०२/२०११ रोजीचे पत्रा सोबत खालील कागदपत्र जोडले आहे.

१) संस्थानचे जा.क्र. एसएसएस वशी -०२/१३२१०/२००४, दि. ३१/१२/२००४ :- सदरचे पत्र शिर्डी येथे येणारे साईभक्तांकडून पथकर वसूल करणेत येऊ नये, असे संस्थानने नगरपंचायतीस विनंती केलेबाबतचे आहे.

२) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी संस्थानला दिलेले जा.क्र. न.पं. /साप्र/ कावि.०१/३०४/११ दि. ०२/०२/२०११ रोजीचे पत्र :- स्वच्छता कर/आरोग्य कर(नाके) पोटी संदरचे पत्राने एप्रिल २०१० ते मार्च २०११ अखेर रक्कम मागणी केली आहे.

२-अ) उपरोक्त पत्रात नगरपंचायत शिर्डी यांनी संस्थानकडून किती रक्कम प्राप्त व्हावी याचा स्पष्ट

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उल्लेख केलेला नाही मात्र.

२-ब) महाराष्ट्र शासन क्रंमाक बैठक-२०१०/(प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे तत्कालीन मा.मंत्री ( विधी व न्याय ) यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी संपन्न झाली असून सभेतील विषय नं.१३ अन्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना स्वच्छता व आरोग्य पथकर ( नाकेबाबत ) प्रतिवर्षी अनुदान रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख ) ऐवजी प्रतिवर्षी रुपये- ५०,००,०००/- ( अक्षरी रुपये- पन्नास लाख ) अनुदान देणेबाबत निर्णय झालेला असून रक्कम अदाई करणेबाबत शासन मान्यता मिळालेली आहे.

२-क) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना विशेष स्वच्छता आरोग्य कराची रक्कम संस्थानने नोव्हेंबर २००५ पासून अदा केलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे

नोव्हेंबर-२००५ ते मार्च-२०१० अखेर शिर्डी नगरपंचायत यांना अदा करण्यात आलेली रक्कम

| अ.नं. | शिर्डी नगरपंचायत यांचे कडील मागणी दिनांक / महिना | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्रं. निर्णय क्रं. | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| ०१ | नोव्हेंबर-/डिसेंबर -०५ ते जानेवारी -२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०४/०२/२००६ आ.वे.वि.नं.२३, निर्णय क्रं.९८ | पा.न.५०३०३ दि.१३/०३/२००६. |
| ०२ | फेब्रुवारी /मार्च / एप्रिल-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०३/०६/२००६ आ.वे.वि.नं.३३,निर्णय क्रं.४०८ | पा.न.५१७४६ दि.२७/०६/२००६. |
| ०३ | मे-२००६ ते जुलै-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.१४/१०/२००६,आ.वे.वि. नं.४४,निर्णय क्रं.८२७ | पा.न.५३२२९ दि.१९/१०/२००६. |
| ०४ | ऑगष्ट-२००६ ते ऑक्टोबर-२००६. | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६६४ दि.२६/०१/२००७. |
| ०५ | नोव्हेंबर/ डिसेंबर-०६, ते जानेवारी-२००७ | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६७९ दि.१३/०३/२००७. |
| ०६ | फेब्रुवारी-२००७ ते डिसेंबर-२००७ | रु.३६,६६,६६६/- | दि.१०/०१/२००८ आ.वे.वि.नं.२२,निर्णय क्रं.१३३ | पा.न.५६७०७ दि.०१/०२/२००८. |
| | जानेवारी-२००८ ते जून-२००८ | रु.२०,००,०००/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.१९, निर्णय क्रं.६२४ | पा.न. २६७६ दि.१६/०७/२००८. |
| ०८ | जून -२००८ अखेर १०% वाढ | रु.९,५९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५,निर्णय क्रं.५९३ | पा.न.६३४४० दि. १८/०८/२००८. |
| ०९ | जुलै-२००८ ते ऑगष्ट-२००८ | रु.८,०६,६६६/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.४६२२५१ दि.१८/१०/२००८. |
| १० | सप्टेबर-२००८ ते डिसेंबर-२००८ | रु.१६,१३,३३२/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.६५५१० दि. १८/०२/२००९. |
| ११ | जाने.२००९ ते मार्च -२००९ | रु.१२,०९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.नं.६६८८९ दि.०४/०५/२००९ |
| १२ | एप्रिल २००९ ते मार्च २०१० | रु. ५०,००,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी | पा.नं. ७६७०२ दि. १४/०५/२०१० |
| | **एकुण रक्कम रुपये-** | **रु. २,०२,५६,६६२/--** | | |

तरी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना महाराष्ट्र शासनाची क्रं.बैठक-२०१०/(प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०७/०४/२०१० रोजीचे आदेशास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत यांना एप्रिल-२०१० ते मार्च-२०११ अखेर विशेष स्वच्छता कर /आरोग्य कर ( नाके ) अनुदान रक्कम रुपये- ५०,००,०००/- ( अक्षरी रुपये- पन्नास लाख मात्र ) अदा करणेचे मंजूरी साठी सादर.

**निर्णय क्र.२४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना महाराष्ट्र शासनाची क्रं.बैठक-२०१०/(प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०७/०४/२०१० रोजीचे आदेशास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत यांना एप्रिल-२०१० ते मार्च-२०११ अखेर विशेष स्वच्छता कर /आरोग्य कर (नाके) अनुदान रक्कम रुपये- ५०,००,०००/-अदा करणेस मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.०१** **श्री साई प्रसादालयातील स्वामीनारायण चपाती/पूरी, मोतीचूर लाडू/बफी व अन्नपाकीटे उक्ते ठेकेदारी पध्दतीने तयार करुन घेणेकरीता आलेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामधील स्वामी नारायण चपाती / पुरी,मोतीचूर लाडू / बर्फी व अन्नपाकीटे बनविणेचे काम उक्ते ठेकेदारी पध्दतीने करुन घेण्यात येत आहेत. सन २०१० ते २०११ करीता देण्यात आलेल्या टेंडर्सची मुदत दि.३१/०३/२०११ रोजी संपणार आहे. सन २०११-२०१२ या वर्षाकरीता सदर कामे उक्ते ठेकेदारी पध्दतीने करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.१३/०२/२०११ चे सभेतील निर्णय क्रं.५४,५६ ने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन जाहिर निवीदा मागविणेत याव्यात असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री साई प्रसादालयाकडील दि.२०/०२/२०११ चे मंजूर टिपणी अन्वये जाहीर निवीदा मागविणेकामी दि.०४/०३/२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१३/०२/२०११ चे सभेतील निर्णय क्रं.५४ व ५६ चे मान्यतेप्रमाणे श्री साई प्रसादालयाकडील दि.२०/०२/२०११ चे मंजूर टिपणी अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार दि.०४/०३/२०११ ते १०/०३/२०११ अखेर खालीलप्रमाणे निवीदांची विक्री झालेली आहे.

**अ) <u>स्वामी नारायण चपाती / पुरी</u> :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री तारासिंग पुरोहित,<br>कृष्णा स्विटस्,उत्तमनगर बस स्टॉप जवळ,<br>उत्तमनगर , सिडको , नाशिक | ०४. | रामज्योती केटरर्स,व्दारा संदीप औटे<br>गोवर्धन कॉम्पलेक्स, टाऊन हॉल शेजारी<br>देवळाली गांव,नाशिक रोड |
| ०२. | पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार<br>श्री साई प्रसादालय (शिरडी कॅम्प)<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर. | ५. | श्री मनोज साहेबराव गाडेकर<br>मु.पो.निमगांव, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| ०३. | सौ.रोहिणी राजेंद्र कोते<br>मु.पो.शिरडी ता.राहाता जि.अहमदनगर | | |

**ब) <u>मोतीचूर लाडू बर्फी</u> :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री शिवाजी यमाजी महाडीक<br>मु.पो.शिरडी ता.राहाता जि.अहमदनगर | ०७. | साई स्वागत केटरर्स, अहमदनगर<br>मु.पो.अहमदनगर |
| ०२. | श्री तारासिंग पुरोहित,<br>कृष्णा स्विटस्,उत्तमनगर बस स्टॉप जवळ,<br>उत्तमनगर , सिडको , नाशिक | ०८. | सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर<br>प्रो.प्रा. श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी,<br>गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक<br>अहमदनगर |
| ०३. | श्री दिपक माधव नाईकवाडी<br>मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत)<br>ता. राहाता, जि.अ.नगर | ०९. | हॉटेल सागर , श्री विजय शिवराम विधाते<br>पी.२१, आयमा हाऊस अंबड, सातपूर लिंक रोड , अंबड , नाशिक जि.नाशिक |
| ०४. | श्री भगवान काशिनाथ मिसाळ<br>मु.पो. अंदरसुल, ता. येवला, जि. नाशिक | १०. | रोकडे केटरर्स, शिवनेरी चौक , रेल्वे स्टेशन<br>अहमदनगर , जि.अहमदनगर |
| ०५. | श्री गणेश स्वीट ॲण्ड केटरर्स,<br>अहमदनगर, समाचार प्रेसजवळ<br>मु.पो.अहमदनगर | ११. | रामज्योती केटरर्स , व्दारा संदिप औटे<br>गोवर्धन कॉम्पलेक्स , टाऊन हॉल ,<br>शेजारी देवळाली गांव, नाशिक रोड |
| ०६. | शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी<br>मु.पो.शिर्डी, (साईबाबा नगर) निमगांव -शिर्डी<br>ता.राहाता जि.अहमदनगर | | --- |

**<u>क) अन्नपाकीटे</u> :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री गणपत काशिनाथ मिसाळ<br>मु.पो.अंदरसुल, ता. येवला जि. नाशिक | ०४. | काद्री ॲण्ड सन्स,<br>नाशिक रोड , नाशिक बिटको पॉईंट ,<br>आनंद बाजार बिल्डींग , नाशिक |
| ०२. | श्री साईबाबा समाज विकास संस्था<br>(शिर्डी नगरपंचायत शिर्डी )<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०५. | साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी<br>व्दारा , रोहीणी राजेंद्र कोते , श्रीकृष्णनगर,<br>नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर |
| ०३. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह.<br>संस्था, अ.नगर आनंद निवास,भवानीनगर,<br>जि.अहमदनगर | ०६. | श्री शिवाजी यमाजी महाडीक<br>मु.पो.शिरडी ता.राहाता जि.अहमदनगर |

दि.१४/०३/२०११ या निर्धारीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील निवीदाधारकांनी निवीदा भरुन (दरपत्रक) सादर केलेल्या आहेत.

**अ) <u>स्वामी नारायण चपाती / पुरी</u> :-**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | पी.एच.जोशी, चपाती ठेकेदार<br>श्री साई प्रसादालय (शिरडी कॅम्प)<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर. | ०२. | श्री मनोज साहेबराव गाडेकर<br>मु.पो.निमगांव, ता.राहाता, जि.अहमदनगर |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री शिवाजी यमाजी महाडीक<br>मु.पो.शिरडी ता.राहाता जि.अहमदनगर | ०५. | शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी<br>मु.पो.शिर्डी,(साईबाबा नगर) निमगांव-शिर्डी<br>ता.राहाता जि.अहमदनगर |
| ०२. | श्री तारासिंग पुरोहित,<br>कृष्णा स्विटस,उत्तमनगर बस स्टॉप जवळ,<br>उत्तमनगर , सिडको , नाशिक | ०६. | सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर<br>प्रो.प्रा. श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी,<br>गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक,अ.नगर |
| ०३. | श्री दिपक माधव नाईकवाडी<br>मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत)<br>ता. राहाता, जि.अ.नगर | ०७. | रोकडे केटरर्स, शिवनेरी चौक , रेल्वे स्टेशन<br>अहमदनगर , जि.अहमदनगर |
| ०४. | श्री भगवान काशिनाथ मिसाळ<br>मु.पो. अंदरसुल, ता. येवला, जि. नाशिक | | |

**क) अन्नपाकीटे :-**

| | |
|---|---|
| ०१. | श्री गणपत काशिनाथ मिसाळ<br>मु.पो.अंदरसुल, ता. येवला जि. नाशिक |
| ०२. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह.<br>संस्था, अ.नगर आनंद निवास,भवानीनगर,<br>जि.अहमदनगर |
| ०३ | साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी<br>व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता<br>जि.अ.नगर |

वरीलप्रमाणे (अ) स्वामीनारायण चपाती/पुरी (ब) मोतीचूर लाडू/बर्फी (क) अन्नपाकीट तयार करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजेचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) स्वामी नारायण चपाती / पुरी :-**

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर प्रति क्विटंल रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति क्विटंल रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | पी.एच.जोशी,शिर्डी | ९००/- | ९००/- |
| ०२. | श्री मनोज साहेबराव गाडेकर,निमगाव | ११५०/- | ११५०/- |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | | चर्चेअंती देऊ केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाडू हजारी | बर्फी प्र.क्वि. | लाडू हजारी | बर्फी प्र.क्वि. |
| ०१. | श्री शिवाजी यमाजी महाडीक,शिर्डी | ३५०/- | २७५/- | ३५०/- | २७५/- |
| ०२. | श्री तारासिंग पुरोहित,नाशिक | २६०/- | १०००/- | २६०/- | १०००/- |
| ०३. | श्री दिपक माधव नाईकवाडी ,साकुरी | ४७९.८० | ४७९.८० | १७५/- | १५०/- |
| ०४. | श्री भगवान काशिनाथ मिसाळ,अंदरसुल | ४७५/- | ७००/- | ४७५/- | ७००/- |
| ०५. | शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी | १६६/- | १५०/- | १७५/- | १५०/- |
| ०६. | सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर | २५१/- | २२५/- | २५१/- | २२५/- |
| ०७. | रोकडे केटरर्स, अहमदनगर | २१०/- | १२००/- | २१०/- | १२००/- |

**क) अन्नपाकीटे :-**

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर प्रति नग रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति नग रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री गणपत काशिनाथ मिसाळ, मु.पो.अंदरसुल, | २.५० | २.५० |
| ०२. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह. संस्था, अ.नगर | १.२० | १.२० |
| ०३ | साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी | २.५० | १.२० |

**निर्णय क्र.२४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,खालीलप्रमाणे निम्नतम दराच्या निविदा मान्य करण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.**

**अ) स्वामी नारायण चपाती / पुरी :-**

**०१. पी.एच.जोशी,शिर्डी** — **रुपये ९००/- प्रति क्विंटल आटा+मैदा**

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

**०१ श्री.दिपक माधव नाईकवाडी,साकुरी-** — **लाडू- रुपये १७५/- प्रति हजारी**
**बर्फी १५०/- प्र.क्विं साखर**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०२ शिवसाई केटरर्स, निमगाव-शिर्डी** **लाडू- रुपये १७५/- प्रति हजारी**
**बर्फी १५०/- प्र.क्विं साखर**

**क) अन्नपाकीटे :-**
**०१. साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी** **अन्नपाकिटे रुपये १.२० प्रति नग**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय मधील ए.सी. यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीड उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-२०१२ या वर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय मधील ए.सी.यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता टेंडर्स मागविण्यात आली होती. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक १८-०३-२०११ अखेर होती. त्यानुसार खालीलप्रमाणे चार टेंडर्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई. |
| ०२ | मे. गिल एअर कंडीशनिंग अॅण्ड रेफ्रीजरेशन सर्व्हिसेस,ठाणे. |
| ०३ | मे. श्री विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग (इंडिया) प्रा.लि. मुंबई. |
| ०४ | मे. शुभम एन्टरप्राईझेस,मुंबई |

प्राप्त झालेली चार टेंडर्सचे टेक्नीकल बीड मा.कार्यकारी अधिकारीसाहेब यांचेसमोर ऊघडून ही टेक्नीकल बीडस् तज्ञ अभिप्राय घेणेकामी मे.डिझाईन इंजिनिअरींग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आली होती. त्यांनी अहवाल सादर केला असून त्यानुसार चारही टेंडरधारकांना मा.व्यवस्थापन समितीपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आलेले आहे.

याकामी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयांमधील ए.सी.यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीडस् आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन टेंडरधारकांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **पार्टीचे नाव** | **टेंडरमधील दर रुपये** | **चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, मुंबई. | १६,९४,३४०/- | १६,९४,३४०/- |
| ०२ | मे. गिल एअर कंडीशनिंग अॅण्ड रेफ्रीजरेशन सर्व्हिसेस,ठाणे. | १७,१९,४५०/- | १६,८५,०००/- |
| ०३ | मे. श्री विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग (इंडिया) प्रा.लि. मुंबई. | १७,७०,८४०/- | १७,७०,८४०/- |
| ०४ | मे. शुभम एन्टरप्राईझेस,मुंबई | १७,३४,१२०/- | १६,९९,४३८/- |

**निर्णय क्र.२४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. गिल एअर कंडीशनिंग अॅण्ड रेफ्रीजरेशन सर्व्हिसेस,ठाणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **नगर-मनमाड रोडवरील हायमास्ट पोल शिफ्ट करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८-०४-२०१० चे सभेतील विषय क्र.०३ निर्णय क्र.३५८ (१९) नगर-मनमाड रोडवरील हायमास्ट पोल शिफ्ट करणेकामी रक्कम रुपये १,००,०००/- इतक्या खर्चास व कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.ऋषिकेश इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०२) | मे.विजय इलेक्ट्रीकल्स, शिर्डी. | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०३) | मे.सुरभी इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०१ कोटेशन बंद पाकीट. |

उपरोक्तप्रमाणे नगर-मनमाड रोडवरील हायमास्ट पोल शिफ्ट करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | **कोटेशनमधील दर रुपये** | **चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१) | मे.ऋषिकेश इलेक्ट्रीकल्स, नाशिक | १,९१,०००/- | अनुपस्थित |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०२) | मे.विजय इलेक्ट्रीकल्स, शिर्डी. | १,३०,०००/- | १,३०,०००/- |
| ०३) | मे.सुरभी इलेक्ट्रीकल्स, नाशिक | १,५४,९००/- | १,४४,९००/- |

**निर्णय क्र.२४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.विजय इलेक्ट्रीकल्स, शिर्डी.यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणेबाबत.**
**प्रस्ताव-** माहे एप्रिल- २०११ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे एप्रिल २०११ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | १०,००,००,०००.०० |
| | **एकुण रक्कम -** | **१०,००,००,०००.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. १० कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते १० या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१०.०० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १० बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे रक्कम रु. १०.०० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५ युको बँक, शाखा शिर्डी यांचेकडे संस्थानचे बचत खाते उघडणे बाबत**
**प्रस्ताव-** युको बॅक यांची शाखा शिरडी येथे दि.१९ मार्च, २०११ रोजी सुरु होत असून, सदर बँकेत संस्थानचे बचतखाते उघडणेबाबत बँकेने विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बॅकेतच ठेवण्याचे बंधन आहे, व युको बँक ही राष्ट्रीयकृत आहे.

सदर बँकेस जा.नं.एसएसएस/वशी/लेखा/२८/२०११ दि.१८ मार्च, २०११ रोजीच्या पत्रान्वये, संस्थानला आवश्यक असणा-या बँक सेवा पुरविणेबाबतचे कळविले असून, त्यांनी त्यांचे पत्र क्र.अन्य/०२/२०१०-११ दि.१८ मार्च, २०११ अन्वये संस्थानला आवश्यक त्या सेवा विनामुल्य देणेबाबत संमती दर्शविली आहे.

दि.१९ मार्च, २०११ रोजी सदर बँकेचे उदघाटन मा.अध्यक्ष साहेब यांचे शुभहस्ते झालेले असून संस्थानचे नांवे तेथे बचत खाते उघडण्यात आले आहे, त्यास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.२४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच त्यांच्याकडून इतर राष्ट्रीयकृत बँकाप्रमाणेच संस्थानला आवश्यक असणाऱ्या सेवा घेण्यात याव्यात,**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**व गुंतवणूकीसाठीही स्पर्धात्मक व्याजदर मागवून प्रचलित पध्दतीने पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **संस्थानला माहे ३० जून २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीत प्राप्त झालेल्या खड्यांचे मुल्यांकन व इतर कामासाठीचे मे हिरो कालरा जेम्स, पुणे यांचे बिल आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांकडून देणगी रुपाने स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार वस्तुसह मौल्यवान खडे प्राप्त होत असतात. या साठलेल्या खड्यांचे मुल्यांकन करणेकामी शासन मान्यताप्राप्त असलेले तज्ञ मुल्यांकनकार नेमावेत असे मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. १४२ नुसार ठरविण्यात आले होते.

साईभक्तांकडून देणगीरुपात स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार वस्तुसह आलेले मौल्यवान खडे काढुन ठेवले असुन अशा साठलेल्या खडयांचे मुल्यांकन करुन घेणेसाठी मे.हिरो कालरा जेम्स, पुणे, या शासनमान्य मुल्यांकनकारांची मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. ८३८ अन्वये नेमणूक करण्यात आलेली आहे.

मे. हिरो कालरा जेम्स, पुणे यांनी या कामासाठीचे दिलेले दर हे अतिशय माफक असून प्रती नग रुपये १००/- प्रमाणे मागणी केलेली असून, या कामाचे सरकारी दर रुपये ४००/- मात्र आहेत.

माहे एप्रिल, २००८ ते जून, २००९ अखेरपर्यत साठलेल्या सर्व मौल्यवान खडयांचे मुल्यांकन टप्प्या-टप्प्याने मे हिरो जेम्स कालरा, पुणे यांचे कडून करुन घेण्यात आलेले असून तपासणी केलेल्या सर्व खडयांना पॉलीशींग, तपासणी, पॅकींग (आकर्षक डब्बीसह) व प्रमाणपत्रे तयार करुन घेण्यात आलेले असून काही दुर्मिळ तथा उत्कष्ट खडयांचे फोटाग्राफ्स करुन घेण्यात आलेले आहेत. आत्तापर्यत मौल्यवान खड्यांचे रुपये ४५,२०,०१४/- चे मूल्यांकन करण्यात आले असून त्या कामाचे मे. हिरो कालरा जेम्स, पुणे यांना मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९ सप्टेंबर, २००९ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. ७३१ अन्वये बील रुपये ६,२२,०५०/- अदा केलेले आहे.

उपरोक्त कालावधीनंतर दिनांक ३० जून २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील मौल्यवान खड्यांचे मुल्यांकन मे हिरो कालरा जेम्स, पुणे यांचे कडून दिनांक १९/०३/२०१० ते २२/०३/२०१० व ०५/०५/२०१० ते ०९/०५/२०१० या दिवशी करण्यात आले आहे. तपासणी केलेल्या सर्व खडयांना पॉलीशींग, तपासणी, पॅकींग (आकर्षक डब्बीसह) व प्रमाणपत्रे तयार करुन घेण्यात आलेले असून काही दुर्मिळ तथा उत्कष्ट खडयांचे फोटाग्राफ्स करुन घेण्यात आलेले आहेत. या कालावधीतील खड्यांचे एकूण मुल्य रुपये १,३०,२५,६२५/- झालेले असून, या मुल्यांकन कामाचे प्रती नग रुपये १००/- प्रमाणे एकूण बिल रुपये १०,९०,७००/- त्यांनी कळविले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे-

| अ.नं. | बिल नंबर | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | १२६ ते १२९ | तपासणी व पॅकींग २३/०८/२०१० | १०,९०,७००/- |
| | | | १०,९०,७००/- |

उपरोक्त रकमेच्या मे. हिरो कालरा जेम्स, पुणे यांच्या बीलांची लेखाशाखा व पूर्व लेखापरिक्षकांकडून तपासणी करुन घेऊन एकूण रक्कम रुपये ६,९१,०००/- एवढी देण्यात यावी असे ठरविले होते त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीची दि. ०५ डिसेंबर, २०१० रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. ९८४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मात्र सदरील बीलाची रक्कम रुपये ६,९१,०००/- मे. हिरो कालरा जेम्स्, पुणे यांनी स्विकारणेस त्यांचे दिनांक ०४/०३/२०११ चे पत्राने असहमती दर्शविली आहे. त्यांनी त्यांचे पत्रात संपूर्ण रक्कम रुपये १०,९०,७००/- ची मागणी केलेली आहे.

तरी मे. हिरो कालरा जेम्स्, पुणे यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेनुसार बिलाप्रमाणे संपुर्ण रक्कम रुपये १०,९०,७००/- आदा करणेबाबत फेर निर्णय होणेस्तव, सविनय सादर.

**निर्णय क्र.२४७** **आजचे सभेत मे.हिरो कालरा जेम्स,पुणे हे समक्ष उपस्थित होते. त्यांचेशी सविस्तर चर्चा केली असता संस्थानला माहे ३० जून २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीत प्राप्त झालेल्या खड्यांचे मुल्यांकन व इतर कामासाठी त्यांनी मागणी केलेले रक्कम रुपये १०,९०,७००/- ऐवजी त्यांना एकत्रित रक्कम रुपये ८,००,०००/- आदा करण्यात यावे, असें ठरलें.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** **(अ) अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबतच्या सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१०-११ | अंदाजपत्रक २०११-१२ | | वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम |
| ०१ | प्रारंभीची शिल्लक | ३,५४,५०,००० | ५,५५,००,००० | १% | २,००,५०,००० |
| ०२ | अपेक्षित अनावर्ती जमा | २४८,४०,१५,००० | २८१,०१,३५,००० | ६४% | ३२,६१,२०,००० |
| ०३ | अपेक्षित आवर्ती जमा | ९०,२५,५०,००० | ९९,८४,८०,००० | २३% | ९,५९,३०,००० |
| | एकुण जमा (२+३) | ३३८,६५,६५,००० | ३८०,८६,१५,००० | | १२% वाढ |
| ०४ | अपेक्षित निर्गुंतवणुक | ६९,२६,४४,००० | ५५,२२,०५,००० | १२% | -१४,०४,३९,००० |
| एकुण अपेक्षित जमा :- | | ४११,४६,५९,००० | ४४१,६३,२०,००० | १००% | ३०,१६,६१,००० |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१०-११ | अंदाजपत्रक २०११-१२ | | वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम |
| ०१ | अपेक्षित अनावर्ती खर्च | १०१,१८,६१,००० | १०४,०२,८९,००० | २४% | २,८४,२८,००० |
| ०२ | अपेक्षित आवर्ती खर्च | ४६९०२३,००० | ४६०९८४,००० | १०% | -१,०९,१९,००० |
| ०३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ३,३९,१५,००० | ३,४५,६६,००० | १% | ६,५१,००० |
| ०४ | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | २२३,५८,१६,००० | २५२,०७,४८,००० | ५७% | २८,४९,३२,००० |
| ०५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ३०८,५४४,००० | २९४,२८३,००० | ७% | -१४,२६१,००० |
| | एकुण खर्च (१ ते ५) | ४०५,९१,५९,००० | ४३५,०८,७०,००० | | ७% वाढ |
| ०६ | अंतिम शिल्लक | ५,५५,००,००० | ६,५४,५०,००० | १% | ९९,५०,००० |
| एकुण अपेक्षित खर्च :- | | ४११,४६,५९,००० | ४४१,६३,२०,००० | १०० % | ३०,१६,६१,००० |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०११-१२ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च भागविण्यासाठी अधिनियमातील १० टक्के तरतुद कमी पडणार आहे.

सन २००४-०५ ते २००८-०९ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले होते. त्यास शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/५४७/(५७/०९)-का.सोळा. दिनांक २१ ऑगस्ट, २०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागांनी साईभक्तांना पुरविण्यात येणा-या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छानणी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधाकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रुपये २६९ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील तीन वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

तथापी चालु वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% खर्च व अखर्चित उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होउन तो भरणे क्रमप्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट अ व ब म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विंनती.

**(ब) अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे. (समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबतच्या सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

**रुग्णालये विभागाचे जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१०-११ | अंदाजपत्रक २०११-१२ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | वाढ टक्के |
| १ | प्रारंभीची शिल्लक | ७,००,००० | ८,००,००० | | १,००,००० | |
| २ | अपेक्षित अनावर्ती जमा | Nil | Nil | | Nil | |
| ३ | अपेक्षित आवर्ती जमा | ४९,१६,००,००० | ५५,०१,५०,००० | ६२ % | ५,८५,५०,००० | १२ % |
| ४ | संस्थानकडून वर्ग (तुट) | ३०,११,७०,००० | ३३,२७,५०,००० | ३८ % | ३,१५,८०,००० | ११ % |
| | **एकुण अपेक्षित जमा :-** | **७९,३४,७०,०००** | **८८,३७,००,०००** | | **८,९९,३०,०००** | |

**रुग्णालये विभागाचे खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१०-११ | अंदाजपत्रक २०११-१२ | | वाढ / घट R/o | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | वाढ टक्के |
| १ | अपेक्षित अनावर्ती खर्च | ८,४५,००,००० | १०,८५,००,००० | १२ % | २,४०,००,००० | २८ % |
| २ | अपेक्षित आवर्ती खर्च | ९,५०,५०,००० | १०,५९,००,००० | १२ % | १,०८,५०,००० | ११ % |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | २०,४०,००० | ४२,००,००० | ०.५ % | २१,६०,००० | ६ % |
| ४ | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | ३१,९३,८०,००० | ३५,५३,००,००० | ४०% | ३,५९,२०,००० | १२% |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | २९,१७,००,००० | ३०,८८,००,००० | ३५% | १,७१,००,००० | ६ % |
| ६ | अंतिम शिल्लक | ८,००,००० | १०,००,००० | ०.१ % | २,००,००० | २५ % |
| | **एकुण अपेक्षित खर्च :-** | **७९,३४,७०,०००** | **८८,३७,००,०००** | | **९,०२,३०,०००** | |

**ब)** रुग्णालयाच्या विविध विभागांनी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखाली तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**क)** सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार खालील नमुद बाबींवरही विचार करण्यात आला आहे. १) ६ व्या वेतन आयोगानूसार देय फरक रक्कम गृहीत धरला आहे. २) नियोजीत नविन सुपर व जनरल स्पेशालिटी रुग्णालयाचा खर्च यामध्ये गृहीत धरलेला नाही. तथापी या बाबींसाठी कोणत्याही विभागाने निश्चित तरतुद दर्शविलेली नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे रुग्णालये विभागाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विंनती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.२४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे रुग्णालय विभागासह प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. सदरचे अंदाजपत्रक राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविण्यात यावे, असें ठरलें.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **डॉ.मिलींद एम.नवलाखे, मानद वैद्यकीय अधिकारी ई.एन.टी मुदत वाढविणे व मानधनात वाढ करणे बाबत.**

**प्रस्ताव-** जा. नं. एसएसएस/वशी-०१/१५१६/०९ दि. ०३/०२/२००९ नुसार डॉ मिलींद एम नवलाखे मुंबई यांची श्री साईनाथ रुग्णालयात मानद वैद्यकीय अधिकारी (ईएनटी) या पदावर दोन महिन्यातून एक व्हीजीट व सदर व्हीजीटसाठी त्यांना प्रवास खर्चासहीत प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता एकत्रित रु. १,०००/- या मानधनावर एक वर्षाकरिता (दि. ०१/०२/२०१० ते दि. ३१/०१/२०१०) नेमणूक करण्यात आली होती. सदर मुदत संपुष्टात आल्यानंतर त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार पूर्वीचे नेमणूक पत्रातील अटी-शर्तीस अधिन राहून दि. ०१/०२/२०१० ते दि. ३१/०१/२०११ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

डॉ मिलींद नवलाखे यांना दोन महिन्यातुन एक व्हिजिटसाठी बोलविले जात असे व त्यासाठी त्यांना प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता एकत्रित रु १,०००/- (रुपये एक हजार) मात्र याप्रमाणे मानधन देण्यात येत आहे. मुदतवाढीचे कालावधीमध्ये डॉ नवलाखे यांना रुग्णालयातील रुग्णांच्या आवश्यकतेनुसार बोलविणेत आलेले असून, यांनी सदर कालावधीत २३ शस्त्रक्रिया केलेल्या आहे.

डॉ. नवलाखे यांना देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि. ३१/०१/२०११ अखेर संपुष्टात आल्याने त्यांनी दोन-तीन वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत दि. ३१/०१/२०११ रोजीचे अर्जान्वये विनंती केली आहे. सदर अर्जावर त्यांचे मानधनात वाढ करण्यात यावी, असा अभिप्राय डॉ. आर. के. कुलकर्णी, वैद्यकिय अधिकारी (ई.एन.टी.)श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिलेला आहे.

रुग्णालयातील कामाचा आवाका पाहता डॉ. मिलींद एम. नवलाखे यांना एक वर्षाची (०१/०२/२०११ ते दि. ३१/०१/२०१२ अखेर) मुदतवाढ देण्यात यावी व त्यांचे मानधन प्रवास खर्चासहीत प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता रु. १,०००/- ऐवजी रु. २,०००/- करण्यात यावे, असे मत आहे.

तरी, डॉ. मिलींद एम. नवलाखे यांना एक वर्षाची (०१/०२/२०११ ते दि. ३१/०१/२०१२ अखेर) मुदतवाढ देऊन, त्यांचे मानधन प्रवास खर्चासहीत प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता रु. १,०००/- ऐवजी रु. २,०००/- देणेबाबतचे निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन डॉ. मिलींद एम. नवलाखे यांना एक वर्षाची (०१/०२/२०११ ते दि. ३१/०१/२०१२ अखेर) मुदतवाढ देऊन, त्यांचे मानधन प्रवास खर्चासहीत प्रत्येक शस्त्रक्रियेकरीता रु. १,०००/- ऐवजी रु. १,५००/- देण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता पॅरामेडिकल कर्मचारी भरणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमार्फत रुग्णांना विविध वैद्यकिय सेवा पुरविण्यात येत असून, चांगली सेवा रुग्णांना मिळत आहे. त्यामुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वैद्यकिय सेवा पुरवितांना विविध तपासण्या व उपचाराकरिता श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी पॅरामेडिकल स्टाफची आवश्यकता असून, रुग्णालयातील संबंधीत विभागांनी उपरोक्त संदर्भान्वये खालील पदांवर कर्मचाऱ्यांची मागणी केलेली आहे. सदर पदे भरणेकामी मान्यतेसाठी दि. ०७/०२/२०११ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर हॉस्पीटलकडे सर्व विभागांचा वाढता व्याप पाहता आढावा घेऊन सादर करावे असा मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहे. त्यानुसार प्र. वैद्यकिय संचालक यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पॅरामेडिकल पदांचा आढावा घेतलेला असून, खालील पदे भरणे आवश्यक आहेत.

शासनाचे मंजुर आकृतीबंधानुसार पदसंख्या, वेतनश्रेणी, भरलेली पदे, रिक्त पदे व जाहीरात द्यावयाचे पदांचा तपशील खालीलप्रमाणे-

**परिशिष्ठ अ-**

| अ नं | पद | शैक्षणिक पात्रता व अनुभव | सुधारित वेतनश्रेणी | आकृती बंधानुसार मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | जाहिरात करणे प्रर्वग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MRI TECHNICIAN एम आर आय तंत्रज्ञ | 1) B.Sc.+ Diploma in relevent Subject from any recognized University / Institute 2) Experience of 5 yrs 3) Age ≠ for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | 9300-34800 ग्रेडवेतन 4200 | 3 | खुला - 2 | 1 | 1 (अ.जा.) |
| 2 | DIALYSIS TECHNICIAN डायलेसिस तंत्रज्ञ | 1) B.Sc. + Diploma in relevent Subject from any recognized University / Institute 2) Experience of 5 yrs 3) Age ≠ for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | 9300-34800 ग्रेडवेतन 4200 | 5 | खुला- 1 अ.जा. -1 | 3 | 2 (खुला ) |
| 3 | JR.BIOMEDICAL EQUIPMENT ENGINEER सहा. जीव वैद्यकिय यंत्र अभियंता | 1) B.E./ Diploma in Biomedical / Electronics from any Govt. recognized University. 2) Eperience min.3 yrs. in similar capacity 3) Age ≠ for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | 9300-34800 ग्रेडवेतन 4200 | 3 | खुला- 2 | 1 | 1 (अ.जा.) |
| 4 | SR. STRESS / ECHO TECHNICIAN वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ | 1) B.Sc.+ Diploma in relevent Subject from any recognized University / Institute 2) Experience of 3 yrs. 3) Age ≠ for open category upto 33 yrs. | 9300-34800 ग्रेडवेतन 4200 | 1 | - | 1 | 1 (खुला) |
| 5 | JR. STRESS / ECHO TECHNICIAN वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ | 1) H.S.C. + Diploma in relevent Subject from any recognized University / Institute 2) Experience of 3 yrs. 3) Age ≠ for open category upto 33 yrs | 5200-20200 ग्रेडवेतन 2400 | 1 | - | 1 | 1 (खुला) |
| 6 | DENTAL TECHNICIAN डेंटल टेक्निशियन श्री साईनाथ रुग्णालयाकरीता | 1) B.Sc.or Dental Technician Diploma recognized by the government 2) Experience of 5 yrs. 3) Age ≠ for open category upto 33 yrs | 9300-34800 ग्रेडवेतन 4200 | 1 | - | 1 | 1 खुला |
| 7 | JR. P.F.T. TECHNICIAN कनिष्ठ श्वासोश्वास तपासणी तंत्रज्ञ | 1) H.S.C (Science) + Diploma in relevent Subject from any recognized University / Institute 2) Experience of 3 yrs. 3) Age ≠ for open category upto 33 yrs | 5200-20200 ग्रेडवेतन 2400 | 1 | - | 1 | 1 खुला |

उपरोक्त प्रमाणे स्तंभ क्र. ८ चे रिक्त जागांवर पॅरामेडिकल स्टाफची आवश्यकता आहे.

उपरोक्त परिशिष्ट अ चे स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता ह्या मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आकृतीबंध मंजूरीच्या वेळी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या आहे. परंतु, एम आर आय तंत्रज्ञ, डायलेसिस तंत्रज्ञ, वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ, वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ डेंटल टेक्निशियन, कनिष्ठ श्वासोश्वास तपासणी तंत्रज्ञ या पदांकरीता उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार मिळत नसल्याने या पदांची शैक्षणिक पात्रता पुढीलप्रमाणे ( परिशिष्ट ब चे स्तंभ क्र.४ प्रमाणे ) करण्यात यावी, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

**परिशिष्ट ब-**

| अ नं | पद | प्रस्तावित शैक्षणिक पात्रता व अनुभव | वैद्यकिय संचालक यांनी सुचविलेली शैक्षणिक | सुधारित वेतनश्रेणी व ग्रेड पे | मंजूर पदे | जाहिरात करावयाची पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | पात्रता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | MRI TECHNICIAN एम आर आय तंत्रज्ञ | **1) B.Sc.+ Diploma in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | **1) B.Sc.+ Diploma / Certificate course in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs | **९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००** | ३ | **१ (अ.जा.)** | सध्या दोन कायम व एक कंत्राटी एमआरआय टेक्नि. दोन शिफ्टमध्ये कार्यरत आहे. रात्री अपरात्री अत्यवस्थ अवस्थेतील रुग्णांचे एमआरआय करणेसाठी व सदर टेक्निशियन यांच्या रजा सुट्या सोडविणे यासाठी आणखी एक एमआरआय भरणे आवश्यक आहे. |
| २ | DIALYSIS TECHNICIAN डायलेसिस तंत्रज्ञ | **1) B.Sc. + Diploma in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | **1) H.S.C (Sci).+ Diploma / Certificate course in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs | **९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००** | ५ | **२ (खुला)** | सध्या हॉस्पीटलमध्ये ४ डायलेसिस मशीन उपलब्ध असून दोनच डायलेसिस तंत्रज्ञ कार्यरत आहे. एका मशीनसाठी एक याप्रमाणे तत्रज्ञाची आवश्यकता असल्याने आणखी दोन तंत्रज्ञ भरणे आवश्यक आहे. |
| ३ | JR.BIOMEDICAL EQUIPMENT ENGINEER सहा. जीव वैद्यकिय यंत्र अभियंता | 1) B.E./ Diploma in Biomedical / Electronics from any Govt. recognized University. **2)** Eperience min.3 yrs. in similar capacity **3)** Age – for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | 1) B.E./ Diploma in Biomedical / Electronics from any Govt. recognized University. **2)** Eperience min.3 yrs. in similar capacity **3)** Age – for open category upto 33 yrs & for reserved category upto 38 yrs. | **९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००** | ३ | **१ (अ.जा.)** | रुग्णालयांमध्ये बायोमेडिकल साहित्य मोठ्या प्रमाणात असून, सदर साहित्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यांचे दुरुस्ती व देखभालीसाठी श्री वैभव पंडीत यांचे जागेवर एक इंजिनिअरची आवश्यकता आहे. |
| ४ | SR. STRESS / ECHO TECHNICIAN वरिष्ठ स्ट्रेस / इको तंत्रज्ञ | **1) B.Sc.+ Diploma in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 3 yrs. **3)** Age – for open category upto 33 yrs. | **1) B.Sc.+ Diploma / Certificate course in relevent Subject from any recognized University / Institute** **2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs | **९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००** | १ | **१ (खुला)** | श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये हृदय रोगाचे उपचारासाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असतात. बऱ्याच रुग्णांना हृदय रोगाच्या तपासण्या करतांना Stress Echo टेस्ट करणे आवश्यक असते. रुग्णालयात Stress Echo मशीन उपलब्ध आहे. परंतु, टेक्निशियन नसल्याने |
| ५ | JR. STRESS / ECHO TECHNICIAN वरिष्ठ स्ट्रेस / | 1) H.S.C. + Diploma in relevent Subject from any recognized | **1) H.S.C. (Sci)+ Diploma / Certificate course in relevent** | **५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००** | १ | **१ (खुला)** | सदर मशीनचा पूर्णपणे वापर करता येत नाही. यासाठी एक सिनिअर व एक ज्यूनिअर स्ट्रेस इको टेक्निशियन |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | इको तंत्रज्ञ | University / Institute **2)** Experience of 3 yrs. **3)** Age – for open category upto 33 yrs | **Subject from any recognized University / Institute 2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs | | | | आवश्यक आहे. |
| ६ | DENTAL TECHNICIAN डेंटल टेक्निशियन श्री साईनाथ रुग्णालयाकरीता | **1)** B.Sc.or Dental Technician Diploma recognized by the government **2)** Experience of 5 yrs. **3)** Age – for open category upto 33 yrs | **1) Dental Mechanic Course Approved by the Dental Council of India 2)** Experience of 5 yrs. **3)** Age – for open category upto 33 yrs | **९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००** | १ | **१ (खुला)** | फक्त बीएस्सी ही शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार सदर पदाचे कामकाज करु शकत नाही. सध्या कंत्राटी पध्दतीने एक डेटल टेक्निशियन काम करत आहेत. कायम डेंटल टेक्निशियन घेणे आवश्यक आहे. |
| ७ | JR. P.F.T. TECHNICIAN कनिष्ठ श्वासोश्वास तपासणी तंत्रज्ञ | **1)** H.S.C (Science) + Diploma in relevent Subject from any recognized University / Institute **2)** Experience of 3 yrs. **3)** Age – for open category upto 33 yrs | **1) H.S.C. (Sci)+ Diploma / Certificate course in relevent Subject from any recognized University / Institute 2)** Experience of 5 yrs **3)** Age – for open category upto 33 yrs | **५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००** | १ | **१ (खुला)** | श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये P.F.T. मशीन उपलब्ध आहे. परंतु, टेक्निशियन नसल्याने सदर मशीन बद आहे. टेक्निशियन उपलब्ध झाल्यास सदर मशीनचा वापर करुन रुग्णांना आवश्यक त्या सुविधा पुरविता येईल. |

उपरोक्त तक्त्यातील पदावर स्थायी कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्यास व्यवस्थापन निधीवर प्रतिवर्षी रुपये १५,३०,१६०/- इतका अर्थिक भार पडेल.

उपरोक्त परिशिष्ठ ब चे स्तंभ क्र. ०४ मध्ये प्र. वैद्यकिय संचालक यांनी सुचविलेप्रमाणे शैक्षणिक पात्रतेत बदल करुन मंजूर आकृतीबंधानुसार उपरोक्त पदे भरणे व त्याकामी जाहिरात देणेसाठी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.२५० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता पॅरामेडिकल कर्मचारी भरणे बाबत उपरोक्त परिशिष्ठ ब चे स्तंभ क्र. ०४ मध्ये प्र. वैद्यकिय संचालक यांनी सुचविलेप्रमाणे शैक्षणिक पात्रतेत बदल करुन दोन्ही रुग्णालयांकरिता मंजूर आकृतीबंधानुसार एकत्रित आरक्षण व पदांची आवश्यकता तपासून उपरोक्त पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **कु.पंडित वेरोनिका काशिनाथ, परिचारिका श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत**

**प्रस्ताव-** कु. पंडीत वेरोनिका काशिनाथ या दि. ०६/०९/२०१० पासुन सतत, सलग, विनापरवानगी, मंजूर रजेशिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्यामुळे रुग्णालयातील दैनंदीन कामकाजात अडचणी येतात. तसेच इतर स्टाफवर कामाचा अतिरिक्त बोजा पडतो. याबद्दल इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/३६६७/२०१० दि. ०१/१०/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर होणेबाबत त्यांना सुचविले आहे. कु. पंडीत यांनी दि. ०९/१०/२०१० रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी M Sc नर्सिंग साठी पूणे येथे नर्सिंग कॉलेजला प्रवेश घेतलेला आहे. सदरच्या शिक्षणाचा कालावधी दोन वर्षाचा आहे. त्यांनी उच्च शिक्षणासाठी दोन वर्षाच्या कालावधीसाठी रजा मागणी केलेली आहे.

परंतू कामाची व्यवस्था होत नसल्यामुळे व स्टाफची कमतरता असल्याने सहाय्यक अधिसेविका यांनी असा अभिप्राय दिला आहे की, सध्या परिचारीकेंची संख्या अपूरी आहे. यापूर्वी अध्ययन रजेवर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



असलेल्या परिचारीका कामावर हजर झालेनंतर नविन परिचारीकांस अध्ययन रजेसाठी सेवाजेष्ठतेनुसार प्राधान्य देता येईल. त्यामुळे कु. पंडीत यांची दोन वर्षे प्रदीर्घ कालावधीची रजा मंजूर करता येत नाही. याबाबत इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/ ४२०३/२०१० दि. २२/१०/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कु. पंडीत यांना कळविले आहे की, त्यांची रजा मंजूर करणे प्रशासनास शक्य होणार नाही. त्यांनी आठ दिवसात कामावर हजर व्हावे. सदरचे पत्र प्राप्त होवून देखील कु. पंडीत अदयापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत.

त्यानंतर इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/४८८१/२०१० दि. १५/११/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कु. पंडीत यांना कळविण्यात आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे. अन्यथा, तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. तरी देखील कु. पंडीत अदयापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत.

अशा परिस्थितीत कु. पंडीत यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून त्यांचे नाव संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करता येईल.

**निर्णय क्र.२५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कु. पंडित वेरोनिका काशिनाथ, परिचारिका श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीची परिस्थिती पहाता त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून त्यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **कु.सायली शिवाजी तूपे या रुग्णास संस्थानतर्फे ग्रोथ हार्मोन्सचे इंजेक्शन खरेदी करुन देणे बाबत**

**प्रस्ताव-** कु. सायली शिवाजी तुपे रा. कासार पिंपळगाव, ता. - पाथर्डी, जिल्हा - अहमदनगर ही इयत्ता ६ वी मध्ये शिकत आहे. तिला थाईराइड ग्रंथीचा विकार असून डॉ. वैशाली देशमुख (पुणे) यांचे मार्गदर्शनाखाली उपचार चालू आहे. डॉक्टर देशमुख यांनी तिला दररोज एक ग्रोथ हार्मोन्सचे (Headon) इंजेक्शन सहा वर्षापर्यंत घेण्याचे सांगितले आहे.

सदर एका इंजेक्शनची किंमत रु.१८०/- इतकी आहे. त्यानूसार प्रती दिन रु.१८०/- याप्रमाणे प्रत्येक महिन्यासाठी रु.५,४००/- इतका खर्च असून एक वर्षासाठी रु.६४,८००/- तर सहा वर्षासाठी रु.३,८८,८००/- (अक्षरी रु. तीन लाख आठ्याऐंशी हजार आठशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. माझे आर्थिक परिस्थितीमुळे मी सदरचा खर्च करु शकत नाही. असे तिचे वडील श्री शिवाजी चांगदेव तुपे यांनी संस्थानकडे दि.२५/०२/२०११ चे अर्जान्वये आर्थिक मदत मिळणेकामी विनंती केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे संस्थान तर्फे इंजेक्शन खरेदी करुन द्यावयाची झाल्यास सहा वर्षांकरीता एकूण रु.३,८८,८००/- (अक्षरी रु. तीन लाख आठ्याऐंशी हजार आठशे मात्र) इतका खर्च येईल. अशा प्रकारे प्रदीर्घ उपचारासाठी यापूर्वी संस्थानकडून वैद्यकिय आर्थिक मदत देण्यात आलेली नाही किंवा याबाबतची अशी धोरणात्मक नियमावली देखील नाही.

तेंव्हा सदरचे इंजेक्शन सदर रुग्णास खरेदी करुन द्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कु.सायली शिवाजी तुपे रा. कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना ४ महिने कालावधीसाठी ग्रोथ हार्मोन्सचे इंजेक्शन एक विशेष बाब म्हणून खरेदी करुन देण्यात यावेत,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी Fully Automatic Biochemistry Analyser मशिन खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.०४/०२/२०११ चे मागणी पत्रान्वये १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिनची मागणी केलेली आहे. कारण सध्या सदर विभागाकडे Biochemistry Analyser साठी एक मशिन उपलब्ध असून ते तीन वर्ष इतके जूने आहे. त्यावर दररोज सरासरी ३५० ते ४०० तपासण्या कराव्या लागतात त्यामुळे सदर मशिनवर जास्त प्रमाणात बोजा पडत आहे तसेच सदर मशिन मध्ये काही कारणास्तव अचानक बिघाड झाल्यास सर्व तपासण्याचे काम बंद पडते व कामाची गैरसोय होते. त्यामुळे अजून एक मशिन घेतल्यास तपासण्या विभागून जातील व दैनंदिन तपासण्यांना वेळ लागणार नाही तसेच जुन्या मशिनवर कामाचा बोजा देखील पडणार नाही. नविन मशिन जर Fully Automatic घेतले तर तपासणीचे Reading Print Out लगेच मिळेल हा त्याचा फायदा आहे.

उपरोक्त मशिनचे अंदाजे खर्चासाठी दर पत्रक मे. ट्रान्साशिया बायो मेडीकल लि., मुंबई यांचेकडून मागविले असता त्यांनी त्यांचे दि.२४/०२/२०११ चे ई-मेल पत्राद्वारे अंदाजे रु.१०,००,०००/- इतका खर्च कळविला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानूसार श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता तातडीने औषधे खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, विविध वॉर्ड, बाह्यरुग्ण विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे इत्यादीची तातडीने आवश्यकता भासल्यास ती औषधे वैद्यकिय अधिक्षक यांना असलेल्या दरमहा रु. १०,०००/- चे तरतुदीतून करण्यात येत असते.

तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा, ऑपरेशन थिएटर विभाग व बाह्यरुग्ण विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे इत्यादीची तातडीने आवश्यकता अशी औषधे / सर्जिकल साहित्य प्रशासन शाखा जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१९४४/२००६ दिनांक १७/०७/२००६ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु.२५,०००/- पर्यंतच्या दिलेल्या औषधे खरेदीचे अधिकारात करण्यात येत असते.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०३/०६/२००६ निर्णय क्र. ३४८ नुसार वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु. १,००,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र.७५९(२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात तातडीची खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार दरमहा तातडीची औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येते.

प्रत्येक खरेदीच्या वेगवेगळया मंजुरी घेणे, त्याचे रेकॉर्ड ठेवणे, तसेच तपासणी करणे इत्यादीकामी अवघड होते, त्यामुळे अशा प्रकारच्या तातडीच्या खरेदीकामी कुठल्याही एकाच अधिकाराचा वापर करणे योग्य राहील असे अंतर्गत लेखापरीक्षक यांनी दि. ०८/०२/२०११ रोजी औषध भांडारात तपासणीच्या वेळी सुचना केलेल्या आहेत.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयात वेगवेगळया प्रकारची औषधे लागत असतात, त्यामध्ये श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक / कॅथलॅब / न्युरो / आय.सी.सी.यु. इत्यादी विभागासाठी महागडी साहित्य लागत असतात.

आतापर्यंतच्या अनुभवानुसार महिन्यात पुर्णतः तिनही प्रकारचे मंजुरी मिळून होणारी एकुण रक्कम रु. १,३५,०००/- पेक्षा कमी होते, तर कधी रु. १,३५,०००/- पेक्षा जास्त होते. त्यामुळे वैद्यकिय संचालक यांना एकाच प्रकारचे सध्याचे रु.१,००,०००/- ऐवजी रु. १,५०,०००/- (अक्षरी रु. एक लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचे अधिकार दिल्यास नियमीत खरेदी करुन बीले अदा करता येईल व हिशोब ठेवणे देखील सोईचे होईल तर रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याची खरेदी करुन व बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी ठेवता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५४ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांनी त्यांच्या हयातीत सुरु केलेल्या श्री रामनवमी उत्सवास १०० वर्षे पुर्ण होत असल्याचे औचित्य साधुन, श्री साईनाथ रुग्णालयात दि.१९.०४.२०११ ते दि.२१.०४.२०११ या कालावधीत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणेत आलेले आहे. या निमित्ताने श्री साईबाबांनी सुरु केलेल्या रुग्णसेवेच्या कार्याला उजळणी मिळणार आहे.

सदर मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरात येणाऱ्या रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयातील नेत्र विभागाचे डॉ.सुनिल सोनटक्के व इतर नेत्रतज्ञ करणार आहेत.

या शिबीरात दाखल होणाऱ्या रुग्णांना कराव्या लागणाऱ्या विविध तपासण्या व ऑपरेशन इत्यादीवर होणारा एकूण खर्च खालीप्रमाणे अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | Lab Investigation | Rs 202/- |
| 2. | E.C.G. | Rs 30/- |
| 3. | Visco | Rs 110/- |
| 4. | Operation, Goggal, Hosp. Accommodation charges etc. | Rs 580/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



5. Other (Lunch, Dinner, Tea) Rs 25/-

Per Pts. Expenditure – Rs 947/- (Round off Rs 950/-)

उपरोक्त प्रमाणे प्रती रुग्ण रु.९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे अंदाजे १०० रुग्णांकरीता १०० x रु.९५०/- याप्रमाणे रु.९५,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे व हा सर्व खर्च शिरडीचे नगरसेवक, श्री.शिवाजी अमृतराव गोंदकर हे त्यांच्या मातोत्री स्व. लहानुबाई अमृतराव गोंदकर, यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त उचलण्यास तयार असून, याबाबत त्यांनी दि.०१.०३.२०११ रोजीचे पत्रान्वये अंदाजे १०० रुग्णांवर होणारा खर्च रु.१,००,०००/- देणेस तयारी दर्शविलेली आहे.

तसेच शिबीर आयोजनाबाबत मा.वैद्यकिय संचालक यांनी मा.विश्वस्त डॉ. गोंदकर यांचेशीही चर्चा केली असून, त्यांनी सदर शिबीर आयोजनास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

तरी दि.१९.०४.२०११ ते २१.०४.२०११ या कालावधीत मोफत मोतीबिंदू शिबीराचे आयोजन करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास तसेच सदरचा खर्च नगरसेवक, श्री.गोंदकर यांचेकडून स्विकारणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१९.०४.२०११ ते २१.०४.२०११ या कालावधीत मोफत मोतीबिंदू शिबीराचे आयोजन करणेस व याकामी येणारा खर्च नगरसेवक, श्री.गोंदकर यांचेकडून स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळेस संस्थानमार्फत प्रत्येक महिन्यात वेगवेगळया शस्त्रक्रिया/उपचारांबाबत शिबिरे आर्योजित करण्यात यावीत. सदर शिबीरांसाठी उपस्थित राहणारे रुग्ण व नातेवाईकांची जेवण व निवास व्यवस्था संस्थानमार्फत विनामूल्य करण्यात यावी,असें ठरलें.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.बाळासाहेब पवार, अध्यक्ष शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी नर्सिंग महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थ्यांना संस्थानच्या रुग्णालयामध्ये प्रॅक्टीस करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर पत्रामध्ये शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी वर्ष २०११-१२ पासुन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत श्रीरामपूर येथे नर्सिंग कॉलेजचा प्रस्ताव भरला आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक अनुभवाकरिता त्यांनी संस्थान अंतर्गत असलेल्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे व याकरिता मा.कार्यकारी अधिकारी सो. व मुख्य वैद्यकिय अधिकारी, यांना शिफारस करावी असे मा.अध्यक्ष महोदय, यांनाया पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच सदर प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांसोबत विद्यालयाचे शिक्षक वर्ग उपस्थित राहतील व संस्थेचे सर्व नियम व अटीचे पालन करणेबाबत त्यांनी ग्वाही दिली आहे. सदर महाविद्यालयामध्ये ४० प्रशिक्षणार्थींची क्षमता असणार आहे.

मा.अध्यक्ष सो. यांनीसदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दुरध्वनीद्वारे आदेश दिले आहेत. यापुर्वी दि.०५.१२.२०१० रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये विषय क्र.०४ अन्वये विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण व साई उदय, शिक्षण प्रसारक मंडळ, शेवगाव यांनी नर्सिंग महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थींना संस्थानचे रुग्णालयामध्ये प्रॅक्टीस करणेस परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दाखल करणेत आला होता, यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ९७८ अन्वये सदरचा प्रस्ताव अमान्य करणेत आला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या १४६ परिचारीका कार्यरत आहेत. त्यातील २७ परिचारीका प्रत्यक्षात श्री साईनाथ रुग्णालयामध्ये काम करत आहेत. तसेच ०३ परिचारीका विना परवानगी गैरहजर असून ०१ परिचारीकेचा राजीनामा मंजुर झाला आहे. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फक्त ११५ परिचारीका कार्यरत असल्याने बॉम्बे इन्टेलिजिअन्स सिक्युरिटी इंडिया लि., कॅम्प- शिरडी यांचेकडून १४ कुशल कंत्राटी परिचारीकांमार्फत काम केले जात आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल हे पुर्ण क्षमतेने कार्यरत असल्याने व रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने परिचारीकांची कमतरता भासत आहे.

१) सदर विद्यार्थ्यांचा हॉस्पिटल नर्सिंग सर्व्हिसेसमध्ये सुधारणा करणेस मदत होईल.

२) सदर परवानगी कन्डीशनल असावी.

३) परवानगी मिळाल्यास संबंधीत संस्थेशी हॉस्पिटलच्या सहा. अधिसेविकेमार्फत करारनामा करता येईल. असे मा.वैद्यकिय संचालक यांचे मत आहे.

तरी उपरोक्त पत्रान्वये शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी नर्सिंग कोर्स करिता श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्याक्षिक अनुभवाकरिता परवानगी मिळणेबाबत विनंती केली असल्याने सदरच्या प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.२५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी नर्सिंग कोर्स करिता श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्याक्षिक अनुभवाकरिता परवानगी मिळणेबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



याचवेळी संस्थानमार्फत नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी तात्काळ पाठविण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालयासाठी ॲल्यूमिनियम पार्टीशन तयार करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालय हे जिल्हा परिषद शाळेसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये काही भागात माहे एप्रिल २००८ पासून सुरु आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालय हे जिल्हा परिषद शाळेच्या मुख्यध्यापाकांसाठी बांधलेल्या निवासस्थानात तयार करण्यात आले आहे. जि.प. शाळेच्या मुख्यध्यापकांना सदरचे निवासस्थान निवासाकरीता उपलब्ध करुन दयावयाचे आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे दि.१०/०३/२०११ रोजीचे पत्रान्वये कनिष्ठ महाविद्लयाने कळविले की, सदरचे कार्यालय हे मुख्य इमारतीमध्ये शिफ्ट करावयाचे आहे. तरी सदर ठिकाणी ॲल्युमिनीअम पार्टीशन मध्ये कॅबीन तयार करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार सदर ठिकाणचे मोजमापे घेण्यात आली. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Size | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing and fixing in position single shuttered extruded powder coated door of overall size 0.90 m X 2.40 m with aluminum door frame of powder coated section 101.60 x 44.75 mm, 3.18 mm thick and shutter comprising of powder coated section having bottom and lock rail of size 150 mm x 44.45 mm, 2.90 mm thick, top rails 47.62 X 44.45 mm, 2.00 mm thick vertical styles 47.62 mm x 44.45 mm, 3.00mm thick and glass panes 5 mm thick for the fanlight portion and 12 mm thick both side laminated phenol bounded particle board panels for shutters, Tubular door closer of heavy duty having I S I mark heavy duty concealed lock, necessary glazing clips, PVC gaskets tower bolts etc. as per detailed design and drawing or as directed by Engineer-In-charge including all material, labour and equipment etc. complete. | 0.9 x 2.1 x 2 Nos | 3.78 | $M^2$ | 4813.00 | 18,193,.14 |
| 02 | Providing, Supplying and fixing in position Colour anodised extruded aluminum partitions. Partly glazed and partly laminated having frame made out of extruded tubular section of size 40 mm x 60 mm with 12mm thick three layered flat pressed teak wood particle board bonded with BWP type exterior grade phenol formaldehyde synthetic resin conforming to IS 12823-1990, laminated on both sides, Novateak or equivaent and 5 mm thick selected quality float glass pannels fixed with alluminium glass clips 12 mm x 12mm and rubber cushioning beading to glass partition as per approved drawing etc. complete. | 6.55x3.0Mx1.0 No<br>3.70x3.0M x1.0 No | 19.65<br>11.10 | $M^2$<br>$M^2$ | 1997.00<br>1997.00 | 39,241.05<br>22,166.70 |
| | | Total Amount Rs. | | | | 79,600.89 |
| | | **Say R/O. Rs.** | | | | **79,601.00** |

**ब)** जि.प. शाळा, शिर्डी येथील संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालयासाठी ॲल्यु. पार्टीशन तयार करणेकामी रक्कम रु. ७९,६०१/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी या कामी येणारे रक्कम रु.७९,६०१/- मात्र खर्चास व दरपत्रके मागवून काम पुर्ण करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालयासाठी ॲल्यूमिनियम पार्टीशन तयार करणेकामी दरपत्रके मागविण्यात यावीत. याकामी येणारे रक्कम रु.७९,६०१/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **शिर्डी एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत व्दितीय प्राधान्य गटातील रस्त्यांपैकी ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत विकसीत करावयाचे २५ रस्त्यांपैकी प्रथम प्राधान्यगटातील एकूण ११ रस्ते विकसित करणेसाठी शासन मान्यतेनुसार रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत विकसीत करावयाचे पाच रस्त्यांसाठी ठेकेदार

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मे.अशोका बिल्डकॉन लि.,नाशिक यांची रु.९,३८,८०,५६०/-रकमेची तसेच संस्थान मार्फत विकसीत करावयाचे ०६ रस्त्यांसाठी ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., नवि मुंबई यांची रु.३३,८३,२६,१९९/-रकमेची निविदा स्विकारणेत आली असून त्यानुसार सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

दि.३०/१२/२०१० रोजी रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील चर्चेनुसार शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे मागणीनुसार करावयाचे रस्त्यांचे प्राधान्यक्रम संस्थानने निश्चित करून संस्थानमार्फत कामे करावीत असे ठरले.शिर्डी नगरपंचायतीने त्यांचे दि.१०/०१/२०११चे पत्रान्वये व्दितीय प्राधान्य गटातील रस्ते निश्चित करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. सध्याची तसेच भविष्यातील रहदारी, साईभक्त व स्थानिक नागरिकांची सोय लक्षात घेता व्दितीय प्राधान्य गटात खालील रस्ते विकसित करता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | साईआश्रम प्रकल्पाचे दक्षिणेकडील २४ मी. रस्ता ते हॉटेल सन-एन-सँड जवळून नगर मनमाड रस्त्यास जोडणारा रस्ता | ०२ | साईआश्रम प्रकल्पाचे पश्चिमेकडील नगर मनमाड रस्ता ते निमगाव कोऱ्हाळे शिवारातील शासकिय विश्रामगृहाजवळ नगर मनमाड रस्त्यास जोडणारा ४५ मी. रस्ता |
| ०३ | नविन प्रसादालयासमोरील शिर्डी निमगाव शिव रस्ता | ०४ | कनकुरीकडे जाणारा नाला रस्ता (रिंगरोड ते कल्वर्ट नं.६१) |
| ०५ | नगर मनमाड रस्ता (पिंपळवाडी रस्ता)ते १८ मी.रिंग रस्ता (पश्चिम बाजू) | ०६ | नांदुर्खी रस्ता ते कनकुरी रस्ता (नगरपंचायतीचे पश्चिम बाजूस) |
| ०७ | आ.क्र.८ मधील नविन जि.प.शाळेस जोडणारे १२ मी. रुंदीचे दोन रस्ते | ०८ | शिर्डी बिरेगाव रस्ता (बिरोबा मंदिरा पर्यंत) |
| ०९ | शिर्डी बिरेगाव रस्ता (बाजारतळाचे दक्षिणेस) | १० | श्री साईउद्यान (पिंपळवाडी रस्ता) ते निमगाव शिव रस्ता |
| ११ | हॉटेल एम.टी.डी.सी. समोरील रस्ता | १२ | नविन जि.प.शाळेस जोडणारे १२ मी. रुंदीचे दोन रस्ते |

उपरोक्त रस्त्यांपैकी खालील रस्ते साईभक्त व स्थानिक नागरिकांची सोय तातडीने करता येण्यासारखे असून उर्वरीत रस्ते यथावकाश भुसंपादनविषयक कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर करता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | नविन प्रसादालयासमोरील शिर्डी निमगाव शिव रस्ता | ०२ | आ.क्र.८ मधील नविन जि.प.शाळेस जोडणारे १२ मी. रुंदीचे दोन रस्ते |
| ०३ | शिर्डी बिरेगाव रस्ता (बाजारतळाचे दक्षिण बाजूस) | ०४ | नांदुर्खी रस्ता ते कनकुरी रस्ता (नगरपंचायतीचे पश्चिम बाजूस) |
| ०५ | श्री साई उद्यान (पिंपळवाडी रस्ता) ते शिर्डी निमगाव शिव रस्ता | ०६ | नविन जि.प.शाळा-लेआउट मधील दोन रस्ते |

वरील सर्व रस्त्यांबाबत शिर्डी नगरपंचायतीकडून खालीलप्रमाणे माहिती मागविता येईल.

| | |
|---|---|
| अ. | विकसित करावयाचे रस्त्यांची लांबी, अस्तित्वातील व विकास योजनेत दर्शविलेली रुंदी तसेच विकसित करावयाची रुंदी, |
| ब. | रस्ते विकसित करतांना स्थलांतरित करावे लागणारे विद्युत पोल, वाहिन्या, रोहित्रे इत्यादि |
| क. | रस्त्यावर असलेले अतिक्रमणांची माहिती, भुसंपादनविषयक सद्यस्थिती, |
| ड. | रस्त्यातून जाणाऱ्या जलवाहिन्या, ड्रेनेजलाईन इत्यादि |

तसेच इतर तदनुषंगिक माहिती शिर्डी नगरपंचायतीकडून घेवून तपशीलवार आराखडे व अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करता येतील.

तरी उपरोक्त रस्ते व्दितीय प्राधान्य गटात विकसित करणेकामी शिर्डी नगरपंचायतीकडून सविस्तर माहिती प्राप्त झालेनंतर सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेणेस व त्या अनुषंगाने येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५८ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **श्री साईबाबांचे पेन्सील चित्राचे सादरीकरणाबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** चित्रकार श्री. अशोक र. नागपुरे, नाशिक यांनी त्यांचेकडील दि. १३.०२.२०११ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

" चित्रकार, श्री. नागपुरे हे पाटबंधारे विभागात स्थापत्य अभियांत्रिकी या पदावर कार्यरत असून, त्यांनी पेन्सिल चित्राव्दारे व्यक्तिचित्र (पोर्ट्रेट) रेखाटण्याचा छंद आहे. अनेक मान्यवरांचे व्यक्तिचित्रे रेखाटण्यात आलेली आहेत.

भारताच्या महामहिम राष्ट्रपती मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील ज्यावेळी शिर्डी येथे भेट देण्यास आल्या होत्या त्याच दिवशी नाशिक येथे त्यांना त्यांचे पोट्रेट सादर करण्यात आले. त्यांच्या शुभशिर्वादाने व प्रोत्साहनामुळे दि. ०३ ऑक्टोबर, २००९ रोजी जगातील सर्वात मोठे ८' उंच व ३२४' लांबीचे पेन्सिल चित्र चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांचा जीवणपट गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मोडीत काढण्यासाठी ह्या चित्राची निर्मिती करुन त्यासंबधी सविस्तर माहिती लंडन येथे सादर करण्यात आलेली आहे.

शिर्डीतील अनेक ठिकाणांपैकी एक म्हणजे व्दारकामाई ह्याच नावाचे साधर्म्य असलेल्या व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या दोन्ही प्रवेशव्दारावरील ५'-६" उंच व १८' लांबीच्या मोकळ्या भिंतीवर साई चरित्र किंवा भावमुद्रा तसेच साईबाबांचे तिर्थस्थान (चावडी + व्दारकामाई + मुळ मंदिर) अशा विविध संकल्पनांपैकी एक दृष्याचे खास पेन्सिल शैलीतून सादर करण्याचा मानस आहे. संत साईबाबांचा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कालावधी हा स्वातंत्र्यपूर्वीचा असल्यामुळे कृष्णधवल (ब्लॅक ॲण्ड व्हाईट) मध्ये काम करण्याचा हेतू आहे.

सदर उपक्रमास लागणारी सामग्री व इतर जोडणीस येणाऱ्या खर्चापैकी ८०% पर्यंत चा खर्च शिर्डी संस्थानकडून उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा. संबधीत काम हे अभ्यास, सहवास, देखरेख ह्या दृष्टीने करण्यात येईल. त्याकामासाठी योग्य ती जागा (खोली / हॉल) उपलब्ध करुन देण्यात यावी ही विनंती. "

**(ब)** चित्रकार, श्री. अशोक र. नागपुरे, नाशिक यांनी, व्दारावती इमारतीचे दोन्ही प्रवेशव्दाराचेवर रिकाम्या जागेत श्री साईंचे जीवनावरील / संबधीत चित्रे पेन्सिलने रेखांकन करुन / चित्रे तयार करणे संबधी मान्यता व त्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ८०% रक्कम (रु. ५३,६००/- मात्र) मोबदला म्हणून मागितली आहे.

श्री. नागपुरे हे चित्रे रेखांकने तयार करुन ती लॅमिनेशन सह / फोटोफ्रेमसह तयार करुन देणार आहेत. श्री. नागपुरे यांनी जी जागा सुचविली आहे, ती प्रवेशव्दाराचे व इमारतीचे प्रथमदर्शनी भागात असून, त्यामुळें प्रवेशव्दार इमारतीस देखणेपणा प्राप्त होणार आहे. करीता सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५९ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा,असें ठरलें .**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९ संस्थान वाढीव पाणीपुरवठा योजनेकरीता नविन स्वयंचलीत जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक (ESR), जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेता नविन वाढीव मोठ्या क्षेमतेच्या स्वयंचलीत जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ. कामे प्रस्तावीत आहेत. दि.०५/०९/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत या कामांसाठी येणारे रु.२८.१६ कोटी मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्यास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार दि.११/१०/२०१० रोजीचे वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे कोऱ्या निविदा विक्री करणेसाठी दि.११/१०/२०१० ते दि.३०/१०/२०१० अखेर कालावधी ठेवण्यात आला होता. सदरहू मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur.
२. Pratibha Industries Ltd; Mumbai.
३. IVRCL Infrastructure & Projects Ltd; Pune.
४. Kirloskar Brothers Ltd; Pune.
५. K J Infrastructure Projects (I) Pvt. Ltd; Pune.
६. Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad.

याकामी इच्छुक निविदाधारकांची निविदापूर्व बैठक दि.१०/११/२०१० रोजी शिर्डी येथे घेण्यात आली. सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.२७/११/२०१० अखेर मुदत देणेत आली होती. तथापी वरील निविदाधारकांपैकी IVRCL Infrastructure & Projects Ltd; Pune, Kirloskar Brothers Ltd; Pune, Laxmi Civil Engineering Services Pvt., Ltd., Kolhapur व Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad या निविदाधारकांनी फॅक्स व इ-मेलव्दारे सिलबंद निविदा सादर करणेसाठी सुमारे १५ दिवसांची मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली. याबाबत सल्लागार यांचे शिफारशीनुसार सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.०९/१२/२०१० अखेर मूदतवाढ देणेत आली.

निविदापूर्व बैठकीतील चर्चेस अनुसरुन सर्व निविदाधारकांना प्रकल्पाचे Common set of Deviations इकडील विभागाचे जा.क्र.एसएसएसटी/बांध/१०४७२/२०१०, दि.१६/११/२०१० रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आले. त्यानंतर काही ठेकेदारांनी दि.२२ व २३/११/२०१० रोजीचे ई मेलव्दारे सल्लागार Infraplan Engg. Services Pvt. Ltd; Pune यांचेकडे निविदेसंदर्भात काही वाढीव मुद्दयांचे स्पष्टीकरण मागितले. त्याबाबत सल्लागार यांचे शिफारशीनुसार ठेकेदारांना इकडील जा.क्रं. एसएसएसटी/ बांध/ १०७१७/२०१०, दि.२९/११/२०१० रोजीचे पत्राव्दारे वाढीव Common set of Deviations पाठविण्यात आले. त्यानंतर विद्युत विभागाने त्यांचे दि.२४/११/२०१० व दि.०३/१२/२०१० रोजीचे पत्रान्वये सदर योजनेचे विद्युत कामाबाबत निविदेत समाविष्ट करावयाची माहिती कळविली. त्यानुसार सल्लागार यांचा अभिप्राय घेऊन दि.०४/१२/२०१० रोजीचे ई-मेल व्दारे ठेकेदारांना सदर विद्युत संदर्भातील बाबींचे स्पष्टीकरण पाठविण्यात आले.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ०३ ठेकेदारांनी विहित मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| S.No | Name of Contractor |
|---|---|
| ०१ | Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad. |
| ०२ | Pratibha Industries Ltd; Mumbai. |
| ०३ | Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur. |

उपरोक्त निविदा सादरकर्त्यांचे तांत्रिक माहितीचे लिफाफे (क्र.०१) उघडणेकामी इकडील दि.११/१२/२०१० चे टिपणीअन्वये मान्यता घेणेत येऊन सदर लिफाफे क्र.०१ मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे समोर दि.२३/१२/२०१० रोजी उघडण्यात आले.

निविदा सादरकर्त्यांनी उपरोक्त लिफाफा क्र.१ मधुन सादर केलेली कागदपत्रे सल्लागार Infraplan Engg. Services Pvt. Ltd; Pune यांचेकडे तपासणीकरीता पाठविणेत आली. सदर कागदपत्रांची छाननी करून सल्लागार यांनी त्यांचे दि.११/०२/२०११ रोजीचे इ-मेल द्वारे तांत्रिक मुल्यमापन अहवाल सादर केला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. त्यानुसार उपरोक्त तिनही निवीदा सादरकर्ते हे विषयांकीत प्रकल्पाचे बांधकाम करण्यास पुरेसे अनुभवी, तांत्रिकदृष्ट्या पात्र व सक्षम आहेत, तथापी स्वयंचलीत पाणीपुरवठा प्रकल्पाच्या देखभालीचा अनुभव फक्त Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur यांनाच आहे, असा अभिप्राय दिला आहे.

उपरोक्तप्रमाणे तिनही पुर्वपात्रता धारण करणाऱ्या निविदा सादरकर्त्यांचे वित्तीय देकार असलेले लिफाफे (क्र.०२) उघडून त्यावर चर्चा/वाटाघाटीने निर्णय होणेसाठी दि.१३/०२/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे हा विषय ठेवणेत आलेला होता. तथापी सदरहु सभेमध्ये उपरोक्त निविदा सादरकर्त्यांचे वित्तीय देकार असलेले लिफाफे (क्र.०२) उघडण्यात आलेले नाहीत. वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांची Validity ही निविदा शर्तीनुसार १२० दिवस इतकी असून ती दि.०९/०४/२०११रोजी संपुष्टात येणार आहे. सदर Validity ची मूदत वाढवायची झाल्यास त्यासाठी निविदासादरकर्त्यांची संमती घ्यावी लागेल. अथवा सदर निविदा रद्द करुन त्या निविदासादरकर्त्यांना त्यांनी भरलेल्या EMD रकमेसह परत करता येतिल.

उपरोक्त पाणीपुरवठा योजनेकरीता शासनाचे अनुदान मंजूर व्हावे याकरीता मा. अध्यक्ष श्री.जयंतराव ससाणे सो. व मा. उपाध्यक्ष श्री.शंकरराव कोल्हे सो.यांनी मा.नामदार प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य, यांची समक्ष भेट घेवून पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत मा. मंत्री महोदयांना दि.०१/०३/२०११ रोजीचे पत्राव्दारे विनंती केली आहे. मा. मंत्री महोदय यांचे समवेत झालेल्या चर्चेत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव या गावांचा समावेश करुन संयुक्त पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करता येईल. याकामी संबधीत ग्रामपंचायतीचा ठराव घेण्यात यावा तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सत्वर सर्व्हे करुन अहवाल सादर करावा अशा सूचना मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे यांनी प्रधान सचीव यांना दिल्या आहेत.

तरी उपरोक्त निविदांबाबत निर्णय होणेस तसेच संयुक्त पाणीपुरवठा योजना राबविणेस व योजना मंजूर झालेनंतर आवश्यक १०% लोकवर्गणी संस्थान मार्फत भरण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी भरलेल्या अनामत रकमा परत करण्यात येऊन, विषय स्थगित ठेवण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकरीता केलेल्या मंडप व्यवस्थेच्या बिलाबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडील खिडकीतून श्रीसाईबाबांचे मुर्तीचे दर्शन होते. बरेचसे साईभक्त सदर खिडकीतून दर्शन घेतात. तसेच उत्तर बाजूकडील सभाकुंडाचे ठिकाणी श्रीं चे आरतीचे वेळेस साईभक्त बसत असतात. साईभक्तांचे उन्हापासून रक्षण होणेकरीता सभाकुंड येथे दि. ०३.०१.२०११ ते दि. ०४.०३.२०११ पर्यंत ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात बिछायतीसह उभारणी करण्यात आलेली होती.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट | दर प्रति दिवस प्रति चौ. फुट | कालावधी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सभाकुंडामध्ये ताडपत्रीचे छत असलेला कापडी मंडप उभारणी करणे. | ६०'x ६५' | ३९००.०० | ०.१८ | ०३.०१.२०११ ते दि. ०४.०३.२०११ अखेर ६१ दिवस | ४२,८२२.०० |
| ०२ | उपरोक्त प्रमाणे मंडपाचे तीन साईडला कनात बांधने व मॅटीन टाकणे. | ६०'x ६५' | ३९००.०० | ०.०७ | ०३.०१.२०११ ते दि. ०४.०३.२०११ अखेर ६१ दिवस | १६,६५३.०० |
| | | | | | एकुण रुपये.. | ५९,४७५.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त प्रमाणे मंडप व्यवस्था ठेकेदार बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचेकडून करुन घेणेत आली आहे.

सदरची व्यवस्था करणेकरीता जा. नं. ४८७० दि. १८.०३.२०१० चे उन्हाळी मंडप व्यवस्था २०१० चे कार्यादेशातील मंजूर दराने रु. ५९,४७५/- मात्र खर्च आलेला आहे.

तरी याकामी आलेला रु. ५९,४७५/- मात्रचे खर्चास व सदरचे बिल ठेकेदार बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांना करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकरीता मे.बाबला टेंड हाऊस, श्रीरामपूर यांना उन्हाळी मंडप व्यवस्था २०१० चे कार्यादेशातील मंजूर दराने टाकण्यात आलेल्या मंडपाचे रुपये ५९,४७५/- चे बील आदा करण्यास मंजुरी देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बसविणेकामी वॉल फॅन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील सर्व खोल्या निवासासाठी दिल्यानंतर गर्दीच्या कालावधीत तात्पुरती निवासव्यवस्था रात्रीच्या वेळी गादी,चादर देऊन करण्यात येते. साईभक्त इमारतीतील मोकळा पॅसेज, हॉलमध्ये गादी चादर घेऊन झोपतात. तरी मोकळा पॅसेज व हॉलमध्ये फॅनची व्यवस्था करुन मिळावी असे संदर्भीय पत्रान्वये साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने कळविले आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग प्रमुख यांनी प्रत्यक्ष दाखवून फॅन बसविण्याची जागा सुचविलेली आहे त्याप्रमाणे A,B,C,D तसेच AB,B,C तळमजला जिन्यासमोरील मोकळा हॉल तसेच प्रत्येक मजल्यावरील जिन्यासमोरील मोकळा हॉल व पॅसेज तसेच DA दुसरा मजला हॉल इत्यादी ठिकाणी फॅन बसविण्याची जागा दाखवून दिलेली आहे.

प्रत्येक मजल्यावरील जिन्या समोरील मोकळा हॉल व पॅसेज मध्ये सिलींग फॅन बसविता येईल. तसेच A, B, C, D, AB, BC तळमजला जिन्यासमोरील मोकळा हॉल व DA दुसरा मजला हॉल व CD दुसरा मजला हॉल येथे छताची उंची जास्त असल्याने तेथे सिलींग फॅन बसविता येणार नाही त्या ऐवजी वॉल माऊंटींग फॅन बसवावे लागणार आहे.

विद्युत विभागाकडे शिल्लक असलेले सिलींग फॅन बांधकाम विभागाकडून सिलींगला हूक तयार करुन झाल्यानंतर तातडीने बसविता येईल. वॉल माऊंटींग फॅन मुख्य भांडार व विद्युत विभागाकडे शिल्लक नसल्याने खरेदी करुन बसवावे लागणार आहे. शासनमान्य C.S.R. सन २००९-२०१० नुसार खरेदी कराव्या लागणा-या वॉल फॅन व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty | Rate. | Amount. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 2.6.7 | Supplying air circulator 600 mm. sweep oscillating type, wall mounting 1440 RPM without speed regulator, overheat protection unit, totally enclosed, flame proof motor suitable for 230/250 Volts single phase, 50 cycles A.C. supply, with one metre of 3 core lead wire and with moisture proof treatment to winding and with 'E' class insulation, marking Sr.No.and date of erection. (Almonard / Crompton) | 25 No. | Rs.5,654.25 | Rs. 1,41,356.25 |
| | | | **Total Amount :-** | | **Rs.1,41,356.25** |
| | | | **Round up :-** | | **Rs.1,41,356.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बसविणेकामी वॉल फॅनची खरेदी कोटेशन मागवून करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,४१,३५६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे प्रस्तावास मान्यता मिळणेस व कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती

**निर्णय क्र.२६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बसविणेकामी वॉल फॅनची खरेदी कोटेशन मागवून करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४१,३५६/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **मंदिर परिसर, नवीन भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईनगर,साईनाथ रुग्णालय, नवीन धर्मशाळा, नवीन प्रसादालय, पाणीपुरवठा साठवण तलाव या परिसराकरीता पॉवरींग स्टँण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०११-१२ साठी देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेला आहे. हे जनसेट नेहमी कार्यदक्ष असावेत म्हणून त्यांचे रेगुलर मेन्टेनन्स करणे गरजेचे आहे. यासाठी वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यास आपणाला

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



वेळोवेळी येणा-या अडी-अडचणींबाबत मार्गदर्शन व मदत मिळू शकते. त्यामुळे जनरेटरसेट कायम कार्यक्षम ठेवणे शक्य होणार आहे.

कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर, (१) कंपनीची आपणाला २४ x ७ सर्व्हिस मिळेल. (२) शिरडीत कायम स्वरूपी एक रेसिडेण्ट इंजिनिअर उपलब्ध राहणार आहे. (३) वर्षभरात सर्व्हिसिंगसाठी कोणतेही मटेरीअल लागले तर त्याचा वेगळा खर्च देण्याची (आदा करण्याची) गरज नाही. (४) जनसेट चालल्याच्या कालावधीत दर ३०० तासानी बी चेक कंपनी मार्फत केला जाईल. यात लागणारे नविन फिल्टर्स , नविन ऑईल, नविन ओ रिंग वगैरे कंपनीमार्फत पुरविले जाणार असून याचे वेगळे चार्जेस देण्याची गरज राहणार नाही. (५) जनसेट सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीवर राहील.

एका वेळच्या सर्विसिंगची बी चेक कीटची ऑईलसह किंमत जनसेट क्षमतेनुसार नुसार रु. २५,००० ते रु. ४५,०००.०० च्या आसपास आहे. आपणाकडे एकुण १० जनसेट असून सरासरी ४ (दर तीन महिन्यास एक सर्व्हिसिंग याप्रमाणे) गृहीत धरल्या तर ४० सर्व्हिसिंग होतात. व एका सर्व्हिसिंगचा खर्च रु. ३५,०००/- धरला तर रु. १४,००,०००/- इतका खर्च बी चेक कीटचा होतो. शिवाय आपत्कालीन लागणारे इतर स्पेअर्स जसे इंजिन बेल्ट, होज पाईप, क्लॅप वगैरे कंपनी कोणताही वेगळा चार्ज न घेता पुरविणार आहे. या स्पेअर्सची यादी कंपनीने पत्रासोबत दिलेली आहे. कमिन्स कपनीकडे विचारणा केली असता त्यांनी अहमदनगर, नासिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता एकमेव मान्यताप्राप्त अधिकृत सेल्स ॲण्ड सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद हे असल्याचे लेखी कळविलेले आहे.

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्य.समितीच्या सभेतील विषय.३३ निर्णय क्र.३८६ अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (उदा.प्रसादालयामधील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, एअर कंडीशनिंग वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या मशिनरींच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या डिलरला देण्यात यावे असे ठरलेले आहे.

मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दि. १८-०४-२०१० चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.१४ निर्णय क्र.४२८ अन्वये जनसेटच्या इंजिनचे सन २०१०-२०११ या वर्षाकरीता कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१०-२०११ दिनांक ०१-०४-२०१० ते दिनांक ३१-०३-२०११ या कालावधीसाठी रु. १८,५०,०००.०० ( सर्व टॅक्सेस समाविष्ट) इतक्या रकमेस देणेस मान्यता मिळाली होती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था सर्व जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०११-२०१२ या वर्षाकरीता दिनांक ०१-०४-२०११ ते दिनांक ३१-०३-२०१२ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटरसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या | कॉन्ट्रॅक्टची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) मागील वर्षाच्या एएमसीमधील जनसेट | | | | | | |
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०३) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०४) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. | १,००,०००.०० |
| ०५) | धर्मशाळा/ श्री साईनाथ रुग्णालय जनसेट क्र.०१ | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०६) | धर्मशाळा/ श्री साईनाथ रुग्णालय जनसेट क्र.०२ | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०७) | श्री साईबाबा हॉस्पिटल / साईनगर | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए - १९-जी -९ | ०१ नग. | २,२५,०००.०० |
| ०८) | श्री साईबाबा हॉस्पिटल / साईनगर | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. | २,२५,०००.०० |
| १०) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटी -४९५-जी. | ०१ नग. | १,००,०००.०० |
| | | | एकुण (सर्व टॅक्स समाविष्ट ) :- | | | १८,५०,०००.०० |
| | | | | | वजा १० टक्के डिस्काऊंट | १,८५,०००.०० |
| | | | | | एमसीची रक्कम | १६,६५,०००.०० |
| (ब ) या वर्षी नवीन आलेला जनसेट | | | | | | |
| ११) | रथ पालखी | २५ केव्हीए | | | ०१ नग | ३५,०००.०० |
| | | एकूण (अ) + (ब ) | | | | १७,००.०००.०० |

या व्यतिरीक्त येत्या आर्थिक वर्षात ( सन २०११ -१२ ) साईआश्रम येथे ५०० केव्हिएचे ४ जनसेट, श्री साईबाबा हॉस्पिटल,साईनगर येथे १०१० केव्हीएचा १ जनसेट, साठवण तलाव येथे २५० केव्हीएचा १ जनसेट, व कनिष्ठ महाविद्यालय येथे १० केव्हीएचा १ जनसेट कार्यान्वित होणार आहेत. या जनसेटला कंपनीच्या मापदंडानुसार प्रथम वर्षी कंपनीमार्फत मोफत सर्व्हिस मिळणार असून या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सर्व्हिसींगमध्ये लागणारे बी चेक कीट ( फिल्टर्स, ऑईल वगैरे) व इतर स्पेअर्सचा खर्च संस्थानला करावा लागणार आहे. त्याची प्रत्यक्ष होणारी रक्कम (बीलानुसार होणारी रक्कम आपणाला त्यांना वेगळी आदा करावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या जनसेटच्या इंजिनचे वार्षिक कौंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना देणेस तसेच येत्या आर्थिक वर्षात ( सन २०११ -१२ ) कार्यान्वित होणारे साईआश्रम, श्री साईबाबा हॉस्पिटल व साठवण तलाव येथील नविन जनसेट्च्या सर्व्हिसींगमध्ये लागणारे बी चेक कीट ( फिल्टर्स, ऑईल वगैरे ) व इतर स्पेअर्सच्या खर्चाची प्रत्यक्ष होणारी रक्कम ( बीलानुसार होणारी रक्कम ) मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना आदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या जनसेटच्या इंजिनचे वार्षिक कौंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट, कमिन्स कंपनीचे अहमदनगर जिल्हयाकरिता अधिकृत एकमेव सर्व्हिस डिलर असलेले मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना यापुढे दरवर्षी देणेस तसेच येत्या आर्थिक वर्षात (सन २०११ -१२ ) कार्यान्वित होणारे साईआश्रम, श्री साईबाबा हॉस्पिटल, साठवण तलाव व कनिष्ठ महाविद्यालय येथील नविन जनसेट्च्या सर्व्हिसींगमध्ये लागणारे बी चेक कीट ( फिल्टर्स, ऑईल वगैरे ) व इतर स्पेअर्सच्या खर्चाची प्रत्यक्ष होणारी रक्कम ( बीलानुसार होणारी रक्कम ) मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३** **५०० रुमकडील वाहन विभागाच्या विस्तारीत पार्कींग शेड व कार वॉशर प्लँटचे शेडकरिता विद्युतीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाची सद्याची जागा साईआश्रम प्रकल्पाच्या जागेत येत असल्याने ५०० रुम भक्तनिवासस्थान शेजारील सर्व्हे नं.१०९ या जागेत वाहन विभागाकरिता पार्कींग शेड बांधण्याचे काम चालू आहे.मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १०-१०-२०१० रोजी झालेल्या सभेत विषय क्र.०४ निर्णय क्र.७९० अन्वये वाहन पार्कींग शेडकरीता त्याचप्रमाणे कार वॉशर प्लँटकरीता (शेडचा समावेश नव्हता) विद्युतीकरण करणेचे काम करुन देणेकामी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / ९९७१ / २०१० दिनांक १६-१०-२०१० अन्वये रूपये ३,५२,९१६/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांनी काम चालू केलेले असून काम पुर्ण होत आलेले आहे.

परंतू उपरोक्त बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणारे पार्कींगचे शेड अपुरे पडत असल्याने बांधकाम विभागामार्फत नवीन पार्कींग शेडचे काम सुरु करण्यात आलेले आहे.तसेच कार वॉशर प्लॅटकरिता शेडचेही काम सुरु करण्यात येणार आहे.त्याचप्रमाणे वाहन विभागाच्या कार्यालयासाठी फॉल सिलींग करण्यात येणार असल्याने वाहन विभागाने कळविले आहे. परंतु सदर ठिकाणी करावयाच्या वायरींगचे कामाचा व फॉल सिलींगमधील लाईट फिटींगच्या कामाचा खर्च यापुर्वीच्या वायरींग कामामध्ये गृहीत धरण्यात आलेला नव्हता. त्यामुळे नवीन वायरींग कामाचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 5-4-10 | Supplying & erecting triple pole and neutral distribution (TPNBD) 4 ways. | 01 Nos. | 4,814.25 | 04,814.25 |
| 02) | 5-6-14 | Supplying, fixing and commissioning RCCB+MCB, electro magnetic type capacity of 63A | 01 Nos. | 3,381.00 | 03,381.00 |
| 03) | 5-3-2 | Suppling,erecting & marking SPMCB 6A to 32A, B-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 012 Nos. | 0,162.75 | 02,053.80 |
| 04) | NON CSR | Providing required size of cement concrete chamber. | 04 Nos. | 1,860.00 | 07,440.00 |
| 05) | 7-6-5 | Supplying & laying (including excavation) 15cm dia RCC Hume pipe | 80 Mtr. | 0,439.95 | 35,196.00 |
| 06) | 7-1-15 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 10 sq.mm. aluminium conductor | 110 Mtr. | 0,141.75 | 15,592.50 |
| 07) | 2-2-32 | Supplying and erecting approved make square parabolic recess / surface mirror optic square /rectangular PL fitting suitable for 2 x36 w compact fiuo lamp with electronic ballast fixed as per specification No. FG-IDF/MOF. | 10 Nos | 3,620.40 | 36,204.00 |
| 08) | 1-9-14 | Point wiring for plug on concealed type light-fan switchboard | 15 Nos. | 0,340.20 | 05,103.00 |
| 09) | 5-6-1 | Providing erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 20 kA breaking capacity of 16/25 A.2 pole complete as per specification No.SW-RCCB/RCCB | 01 Nos. | 1,982.40 | 01,982.40 |
| 10) | 5-4-23 | Suppling,erecting & CRCA Sheet metal one way enclosures suitable for D.P.M.C.B./T.P.M.C.B./F.P.M.C.B. complete erected on angle iron frame. | 01 Nos. | 0,309.75 | 00,309.75 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Total :- | 1,12,076.70 |
| | | | + Contigency 5% | 0,05,603.83 |
| | | | Total Amount :- | 1,17,680.53 |
| दिनांक १०-१०-२०१० रोजी झालेल्या मा.व्य.स.चे सभेतील मंजूर केलेला डिस्काऊंट | | | Discount :- 15% | 0,17,652.08 |
| | | | Total Amount :- | 1,00,028.45 |
| | | | **Round up Rs. :-** | **1,00,028.00** |

उपरोक्तप्रमाणे वाहन विभागाच्या नवीन पार्कींग शेड व कार वॉशर प्लॅटच्या शेडच्या वायरिंग व वाहन विभागाच्या कार्यालयमधील फॉल सिलींगमधील लाईट फिटींगकरिताअंदाजे रक्कम रुपये १,००,०२८/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०-१०-२०१० रोजी झालेल्या सभेत मान्य झालेल्या ठरावानुसार सद्या वाहन विभागाचे शेडमध्ये विद्युतीकरणाचे काम करणारे ठेकेदार, मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव यांचेकडून मंजूर दरात ( वजा १५% डिस्काऊंट) काम करुन घेणेस व खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४ सोलर प्रोजेक्ट इंन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे सोलर स्टिम कुकिंग प्रकल्पाकरीता अत्याधुनिक डाटा लॉगर पायरानोमिटर, सोलर रेडिएशन मिटर ई. इंन्स्ट्रयुमेंट टेरेसवर बसविण्यात आलेले असून ऑपरेटरला प्रत्येक तासाला इंन्स्ट्रयुमेंट रिडींग अथवा सेटींग करीता टेरेसवर जावे लागते. त्याकरीता सोलर कंट्रोल केबिनच्या मागील बाजूस भक्कम लोखंडी जिना सुरक्षा रेलींगसह तयार करावयाचा आहे. सदरचे हे काम बाहेरील बाहेरील वर्कशॉप / फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस. `सी` चॅनल,<br>साईज :-१०० x ५० x ५० x ५ एम.एम. | ३०० किलो. | रु. ४८.००<br>(प्रति किलो) | रु. १४,४००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल,<br>साईज :-३५ x ३५ x ५ एम.एम. | २०० किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | रु. १०,०००.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :-२५ x ५ एम.एम. | २०० किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | रु. १०,०००.०० |
| ०४) | एम.एस.राऊंड पाईप,<br>साईज :- १.१/२`` | ०६० फूट | रु. ३५.००<br>(प्रति फूट) | रु. ०२,१००.०० |
| ०५) | एम.एस.स्क्वेअर बार,<br>साईज :- १२ एम.एम. | २०० किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | रु. १०,०००.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | रु. ४६,५००.००<br>रु. ०५,८१३.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | रु. ५२,३१३.००<br>रु. २०,९२५.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ७३,२३८.००** |

उपरोक्तप्रमाणे सोलर प्रोजेक्ट इंन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करुन घेणेचे काम बाहेरील बाहेरील वर्कशॉप / फॅब्रिकेटर्स यांचेकडून तयार करुन घेणेकामी घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.७३,२३८/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सोलर प्रोजेक्ट इंन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करणेकामी स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५ श्री साईसतचरित्र तेलगू ओवी टू ओवी वाढीव पेजेसची रक्कम आदा करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१० चे सभेतील निर्णयानुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना श्री साई सतचरित्र - तेलगू ओवी टू ओवी १०,००० नग निम्नतम दर रु.७४.७२ पैसे प्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७५/२०१० दि.१०.०७.२०१० ने छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

संस्थान प्रकाशित सर्व श्री साईबाबांचे जीवनावरील श्री साई सत् चरित्रे मजकूर मोठ्या अक्षरात साईभक्तांना उपलब्ध करुन देणे आहे. बहुतेक साईभक्तांनी तोंडी मागणी आहे. मध्यंतरी मिटींगमध्ये संस्थान प्रकाशित सर्व साईचरित्रे अक्षर मोठे करणेस चर्चा झालेली आहे. जेणेकरुन वयोवृध्द व्यक्तींना त्याचे वाचन करणेस सुलभ व सोईस्कर होईल. तसेच चरित्रांचा दर्जा सुधारण्यात यावा. त्यानुसार यापूर्वी हिन्दी चरित्राचा फॉन्ट वाढविण्यात येऊन, त्यानुसार चरित्र साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्याने चरित्रांविषयी काऊंटरवर साईभक्तांनी संस्थानविषयी चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साई सतचरित्र - तेलगू ओवी टू ओवी चे मोठया अक्षरात सी.डी. तयार करुन देणेचे काम श्रीमती एम.मनी यांचेवर सोपविण्यात आले होते. काम देते वेळी सी.डी.केव्हा उपलब्ध होईल याची निश्चित नसल्याने पूर्वीप्रमाणे एकूण ८५६ पेजेस छपाई कामीचे दरपत्रकाची मागणी करणेत आली होती. श्रीमती एम.मनी यांचेकडून श्री साई सतचरित्र - तेलगू ओवी टू ओवी ची सी.डी. प्राप्त होवून मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना देणेत आली होती.

श्री साई सतचरित्र - तेलगू ओवी टू ओवी मोठया अक्षरात केल्याने ८५६ पेजेस ऐवजी ९१२ पेजेस तयार झाले आहे. त्यामुळे ५६ जादाचे पेजेस वाढ झाल्याने वाढीव ९१२ पेजेसची सी.डी. देऊन काम करुन झाले आहे. त्यांनी दि. १६.०३.२०११ चे पत्राने चरित्रात ५६ पेजेस प्रति पेज दर रु. ०.०८ पैसे याप्रमाणे ५६ पेजेस x ०.०८ याप्रमाणे प्रती प्रत रु. ४.४८ पैसेने वाढ झाली आहे. एकूण आदेशीत चरित्र १०,००० नग x ४.४८ पैसे प्रमाणे रु. ४८,८००/- मात्र आदा करावी लागणार आहे.

श्री साई सतचरित्र - तेलगू ओवी टू ओवी १०,००० प्रतींचे छपाई प्रती प्रत रु.४.४८ पैसे प्रमाणे वाढीव रक्कम रु.४८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडील श्री साई सतचरित्र-तेलगू ओवी टू ओवी १०,००० प्रतींचे छपाई प्रती प्रत रु.४.४८ पैसे प्रमाणे वाढीव रक्कम रु.४८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६ श्री साईसतचरित्र तेलगू ओवी टू ओवी जादा छपाई होऊन आलेल्या प्रतींचे बील आदा करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१० चे सभेतील निर्णयानुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७५/२०१० दि.१०.०७.२०१०अन्वये खालील श्री साई सच्चरित- तेलगू ओवी टु ओवी छपाई कामाचा आदेश देण्यात आला आहे. चरित्रे भांडार विभागात मुदतीत जमा आहेत.

| अ.नं | पुस्तकाचे नाव | आदेशीत छपाई संख्या | जादा छपाई संख्या | मंजूर दर सर्व करांसह रुपये पैसे | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित- तेलगू ओवी टु ओवी | १०००० | ३६८ प्रती | ७४.७२ | २७,४९७/- |

मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडून आदेशाव्यतिरिक्त ३६८ जादा प्रतींची रक्कम रु.२७,४९७/- मात्र आदा करणे आहे. आदेशाव्यतिरिक्त चरित्रांची जादा छपाई झालेली आहे. जादांच्या नगांची विक्री होऊन रक्कम वसुल होणार आहे. श्री साई सच्चरित ओवी टु ओवी - तेलगू चरित्रास तेलगू भाषिक भक्तांची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने चरित्रे स्वीकारण्यात आली आहे.

श्री साई सच्चरित ओवी टु ओवी - तेलगू जादा ३६८ प्रतीचे रक्कम रु. २७,४९७/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई सच्चरित ओवी टु ओवी - तेलगू जादा ३६८ प्रतीचे रक्कम रु. २७,४९७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७ ऑनलाईन चक्की यूनिटमध्ये अत्याधूनिक मशिनरीची वाढ करुन क्षमता वाढविणे व बसेन मिल पुरवठा करुन उभारणी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय सुरु झालेपासून आजपर्यंत भक्तांची गर्दी दिवसेदिवस वाढत आहे. आजमितीस प्रतिदिनी सरासरी ३० ते ३५ हजार भक्त प्रसाद भोजन घेत आहेत. उत्सव व गर्दीच्या कालावधीत प्रतिदिनी ६५ ते ७० हजार भक्त प्रसाद भोजन घेतात. तसेच दर्‍रोज सरासरी ६५०० नाष्टापाकीटे तयार करुन विक्री करणेत येते. प्रसादभोजनातील चपाती/पुरी व नाष्टापाकीटातील पुरीकरीता दररोज सरासरी ३० ते ३५ क्विंटल गव्हाच्या आटयाचा वापर होतो. गर्दीचे कालावधीमध्ये प्रतिदिन ४५-५० क्विंटल आटा लागतो. त्याचप्रमाणे मोतीचुर लाडु व बर्फी करीता दररोज सरासरी १५- १८ क्विटल बेसन व गर्दीच्या कालावधीत २२-२५ क्विंटल बेसनचा वापर करणेत येतो.

आटा व बेसन तयार करणेसाठी श्री साईप्रसादालयातील ऑन लाईन चक्की युनिट बसविलेले आहे. मात्र त्याची क्षमता दैनंदिन गरजेच्या तुलनेत कमी पडते. त्यामुळे जुन्या प्रसादालयातील पिठाच्या गिरण्या चालु ठेवाव्या लागतात. जुन्या प्रसादालयाची जागा दुसऱ्या कामासाठी वापरणार असल्याने जुन्या गिरण्या नवीन प्रसादालयाकडे शिफ्ट करणे गरजेचे आहे. सदर जुन्या पारंपारीक पध्दतीच्या पिठाच्या गिरण्या नवीन प्रसादालयामध्ये आहे. त्याच पध्दतीच्या आटा मिल नविन प्रसादालयमध्ये बसविल्यास मनुष्यबळ जागा व वेळ यात वाढ होईल. त्याऐवजी सध्याचे ऑनलाईन ऑटोमॅटीक चक्की युनिटमध्ये

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



काही मशिनरीमध्ये सुधारणा (बदल) करुन क्षमतेत वाढ करणे सोईस्कर व किफायतशीर ठरेल. त्यानूसार नविन प्रसादालयातील ऑन लाईन चक्की युनिट मध्ये आवश्यक त्या मशिनरी बसविणे गरजेचे आहे. त्याकामी सध्याचे ऑन लाईन चक्की युनिटमध्ये आवश्यक त्या ॲटोमॅटीक मशिनरी बसविणेकामी आटा मिल क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तीस तज्ञ सल्लागार म्हणुन नियुक्तीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/४/२०१० चे सभेतील निर्णय क्रं. ४०० नुसार मान्यता मिळालेली आहे. दिनांक ९/७/२०१० रोजी महाराष्ट्र व गुजरातमधील महाराष्ट्र टाईम्स व गुजरात समाचार या वृत्तपत्रात जाहीरात देणेत आलेली होती. टेंडर विक्री कालावधीमध्ये दोन टेंडरची विक्री झाली होती. परंतु सदर टेंडरधारकांनी टेंडर सादर केलेली नाहीत.

मात्र त्यानंतर श्री. धिरुभाई नसीदास पोरीया मु. पो. धारी जि. अमरेली (गुजरात) यांनी दि. १०/०७/२०१० रोजी पत्र पाठविले होते. त्यांनी पत्रात नमूद केलेले आहे की- स्वत:ला आटा मिल क्षेत्रात ३० वर्षाचा कामाचा अनुभव असल्याचे व संस्थानच्या आटा मिल सल्लागार कामी मोफत काम करणेस तयार आहे. त्यानूसार जा.नं. एसएसएस/वशि/प्रसाद/९७२३/१० दिनांक ४/१०/२०१० चे पत्राव्दारे श्री धिरुभाई पोरीया, यांना प्रसादालयामध्ये ऑनलाईन ॲटोमॅटीक चक्की युनिटमध्ये सुधारणा करणेकामी समक्ष पहाणी करुन अहवाल सादर करणेसाठी बोलविण्यात आले होते. परंतू श्री. पोरीया यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

त्यानंतर प्रसादालयाकडील दि.०६/०१/२०११ चे मंजूर टिपणीनूसार दि.०८/०१/२०११ रोजी श्री साईप्रसादालय अधिक्षक श्री डि. टी. उगले, पर्यवेक्षक श्री रामदास कोते, कं. क. अभियंता श्री. अमृत जगताप व श्री. शरद शिरोळे यांना अहमदाबाद येथील खाद्य खुराक ( किचन इक्वीपमेंटस्) प्रदर्शन पहाणेसाठी पाठविणेत आले होते. प्रदर्शनस्थळी श्री चेतन मेहता, ॲटोमॅटीक ग्राईडींग मिल अत्पादक कंपनीचे मार्केटींग मॅनेजर यांचेशी भेट झाली. चर्चेनंतर त्यांचेकडून सांगण्यात आले की - ॲटोमॅटीक ग्राईडींग मिलबाबत सविस्तर माहीती घेणेसाठी वडोदरा येथील आमचे कंपनीत जाऊन पहाणी करावी व माहीती घ्यावी. त्यानूसार श्री चेतन मेहता यांचे वडोदरा येथील चामुंडा इक्वीपमेंट, यांचे कंपनीत जाऊन पहाणी केलेली आहे. व्हीडीओ फिल्म पाहुन सविस्तर माहीती घेतलेली आहे.

चामुंडा इक्वीपमेंट, वडोदरा यांचेकडील ॲटोमॅटीक ग्राईडींग मिलची पहाणी केल्यानंतर त्यांना श्री साई प्रसादालयामधील ऑन लाईन चक्की युनिटचे क्षमतेत वाढ करणेकामी प्रत्यक्ष पहाणी करणेसाठी बोलविण्यात आलेले होते. त्यानूसार श्री चेतन मेहता व श्री हितेंद्र पांचाळ, चामुंडा इक्वीपमेंट वडोदरा हे दिनांक २५/०१/२०११ रोजी समक्ष श्री साई प्रसादालयात येऊन ऑनलाईन चक्की युनिटची पहाणी केलेली आहे. पहाणीनंतर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष ऑनलाईन चक्की युनिटची जागा व क्षमता वाढविणेबाबत चर्चा केलेली आहे.

त्यानुसार चामुंडा इक्वीपमेंट , वडोदरा यांनी दि.०५/०२/०११ चे इमेल व्दारे गहु आटा प्रति तासाला ५७५ ते ६०० किलो व बेसन तासाला २५० ते ३०० किलो क्षमतेच्या ग्राईडींग मिलकरीता अनुक्रमे रु. २५,१५,०००/- व रु.१२,२५,०००/- = रु.३७,४०,०००/- + टॅक्सेस + वहातूक भाडे+ सिव्हील वर्क असा खर्च कळविलेला आहे. सदरील प्रस्तावानूसार उपरोक्तकामी अंदाजे एकुण प्रोजेक्टसाठी एकूण रु.५०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

**<u>जुने प्रसादालय व नवीन श्री साई प्रसादालयात कार्यरत असलेल्या फ्लोअर मिलचा तांत्रिक तपशिल खालीलप्रमाणे.</u>**

| **जुने प्रसादालय :- गहु व बेसन आटा निर्मिती क्षमता ३०० किलो / तास** | | | |
|---|---|---|---|
| **अ. नं.** | **यंत्रणेचा तपशिल** | **विद्युत मोटार HP** | **युनिट संख्या** |
| १ | फ्लोअर मिल साईज- १६” | १० | ०१ |
| २ | फ्लोअर मिल साईज- १६” | १० | ०१ |
| ३ | फ्लोअर मिल साईज- १८” | २० | ०१ |
| ४ | प्रिक्लिनर | ०२ | ०१ |
| ५ | डिस्टोनर | ०३ | ०१ |
| ६ | आटा सिव्हर | ०१ | ०१ |
| | **एकूण HP** | **४६** | |
| दोन शिफ्टसाठी लागणारे गिरणी चालक - ०६ | | | |

| **श्री साई प्रसादालय :- गहु आटा निर्मिती क्षमता १६५ किलो / तास** | | | |
|---|---|---|---|
| **अ. नं.** | **यंत्रणेचा तपशिल** | **विद्युत मोटार HP** | **युनिट संख्या** |
| १ | १६ फुट उंच बकेट एलिव्हेटर सिंगल | ०१ | ०१ |
| २ | २० फुट उंच बकेट एलिव्हेटर डबल | ०१ | ०१ |
| ३ | ब्लोअर | ०५ | ०१ |
| ४ | सिडक्लीन डिस्टोनर | ०५ | ०१ |
| ५ | सिडक्लीन प्रीक्लीनर | ०५ | ०१ |
| ६ | फ्लोअर मिल साईज- १६” | १५ | ०३ |
| ७ | आटा सिव्हर | १.५ | ०३ |
| ८ | ३० फुट सायक्लॉन एअर पाईपसह | ० | ०१ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ९ | स्टॉक हॉपर | ० | ०१ |
| | | | **एकूण विद्युत HP** | **३३.५** | |
| | | | दोन शिफ्टसाठी लागणारे गिरणीचालक - ०४ | | |

सध्या दोन्ही ठिकाणच्या फ्लोअर मिल कार्यरत असुन दोन्ही शिफ्ट मिळून दोन्हीकडे एकूण १० कामगार तसेच ७९.५ एच.पी. विजेचा दैनंदिन वापर व ट्रान्सपोर्टेशन खर्च येत आहे. दोन्ही बाजुच्या आटा मिल चालु ठेऊन दर तासाला दोन्हीकडील आटा मिलमधुन फक्त ४६५ किलो आटा मिल तयार होत आहे. सध्या अल्प प्रमाणात ॲटोमॅटीक यंत्रणेद्वारे हे काम होत असुन जास्त प्रमाणात मनुष्यबळाकरवी आटा दळण्याचे काम चालु आहे. तसेच आटा दळण्याचे काम एका ठिकाणी व त्याचा वापर दुसऱ्या ठिकाणी होता. त्यामुळे वाहतुकीचे काम व कष्ट वाढतात. हे सर्व टाळण्यासाठी श्री साईप्रसादालयामध्ये अत्याधुनिक संपुर्ण स्वयंचलित व जादा क्षमता असलेल्या यंत्रणेद्वारे गहु आटा व बेसन तयार होणारी यंत्रणा असणे अत्यंत गरजेचे झालेले आहे.

सदर अत्याधुनिक संपुर्ण स्वयंचलित व सध्यापेक्षा जादा क्षमतेची यंत्रणा खरेदी व उभारणी खर्चाचा अंदाज येणेसाठी मे. चामुंडा इक्वीपमेंट्स, वडोदरा हया आटा/बेसन मिल उत्पादकाकडून प्रत्यक्ष साईट पाहणी करुन अंदाजे खर्चाची रक्कम कळविण्यास सांगण्यात आलेले होते. त्यानुसार मे. चांमुडा इक्वीपमेंटस, बडोदरा यांनी दिनांक २५.१.२०११ रोजी प्रसादालयात येऊन समक्ष पाहणी केली व खालीलप्रमाणे अंदाजे रुपये ५०,००,०००/- खर्चाचा अंदाज कळविलेला आहे. त्यामध्ये सध्याचे श्री साई प्रसादालयातील प्रिक्लीनींग व डिस्टोनींग साठी असलेली यंत्रणा आहे तशीच ठेऊन खालीलप्रमाणे वाढीव ॲटोमॅटीक यंत्रणा बसविणेत येईल असेही कळविलेले आहे.

**यंत्रणा तपशिल-**

| **आटा मिल**<br>गहुआटा प्लँन्ट क्षमता- ५७५-६०० kg/hr.<br>गहुआटा क्वालिटी -३० -६० Mesh Bss | | | | | **बेसन मिल**<br>बेसन आटा प्लँन्ट क्षमता - २५०-३०० kg/hr.<br>बेसन आटा क्वालिटी - १६-३६ Mesh Bss | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. नं.** | **यंत्रणेचा तपशिल** | **एकत्रीत किंमत** | **एकूण HP** | | **अ. नं.** | **यंत्रणेचा तपशिल** | **एकत्रीत किंमत** | **एकूण HP** |
| १ | कनव्हेयींग सिस्टीम | २५,१५,०००/- | ७५ | | १ | कनव्हेयींग सिस्टीम | १२,२५,०००/- | ३० |
| २ | स्टोअरेज सायलो | | | | २ | स्टोअरेज सायलो | | |
| ३ | ग्राईडींग मिल ०६ नग | | | | ३ | ग्राईडींग मिल ०६ नग | | |
| ४ | एअर सक्शन सिस्टीम | | | | ४ | एअर सक्शन सिस्टीम | | |
| ५ | एअर फिल्टर युनिट | | | | ५ | एअर फिल्टर युनिट | | |
| ६ | सक्शन युनिट | | | | ६ | सक्शन युनिट | | |
| ७ | सिव्हींग युनिट | | | | ७ | सिव्हींग युनिट | | |
| ८ | मेटल डिटेक्टर युनिट | | | | ८ | मेटल डिटेक्टर युनिट | | |
| दोनही मिल मिळून दोन शिफ्टसाठी लागणारे गिरणीचालक - ०६ | | | | | | | | |

वरील खर्चाव्यतिरीक्त पॅकींग, ट्रान्सपोर्ट, टॅक्सेस इत्यादी खर्च वेगळा लागतील असे सांगितलेले आहे. उभारणी कामात सिव्हील कामाचा समावेश नाही.

वृत्तपत्रात जाहिरात देऊन थेट उत्पादकांकडून निविदा मागविल्यास प्रत्येक उत्पादकाच्या मिल डिझाईन नूसार खर्चाची रक्कम कमी /जास्त होऊ शकते किंवा यंत्रणेसाठी लागणारे इक्वीपमेंटस् , साईज, स्पेसीफिकेशन, जागा , लागणारे मनुष्यबळ, लागणारी वीज वगैरे बाबतीत तफावत होवू शकते. त्यामुळे निविदा भरणेपूर्वी प्रत्यक्ष साईट पाहून निविदा भरणेची अट निविदेत नमूद करता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील ऑन लाईन चक्की युनिटचे क्षमतेत वाढ करण्यासाठी अत्याधुनिक स्वयंचलित मशिनरी बसविणेस मान्यता तसेच त्याकामी अंदाजे रक्कम रु ५०,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पन्नास लाख मात्र) खर्चास मान्यता असावी. त्याचप्रमाणे त्याकामी जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.२६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑनलाईन चक्की यूनिटमध्ये अत्याधूनिक मशिनरीची वाढ करुन क्षमता वाढविणे व बसेन मिल पुरवठा करुन उभारणी करणेकामी मा.स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८ मोफत भोजन योजना व ताटात अन्नपदार्थ शिल्लक ठेवू नये याबाबतचे आकर्षक व भक्कम माहितीफलक तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे इच्छेनूसार स्वत:चे अथवा नातेवाईकांचा वाढदिवस, स्मृती प्रित्यर्थ किंवा अन्य कारणास्तव एका दिवसाचा एकत्रित आकार अथवा इच्छेप्रमाणे रक्कम भरुन प्रसादालयात भोजन घेणाऱ्या भक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर मोफत प्रसादभोजन योजनेची साईभक्तांना

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



माहीती होणेसाठी वेळोवेळी फ्लेक्स बोर्ड लावणेत आलेले आहेत. तसेच योजनेची इंटरनेटवर माहीती देण्यात आलेली आहे.

गेल्या ३ वर्षापासून मोफत भोजन योजनेची साईभक्तांना माहीती व्हावी यासाठी साधारणत: २ ते ३ वेळा फ्लेक्स बोर्ड तयार करुन लावणेत आलेले होते. मात्र ऊन ,वारा, पाऊस यामुळे फ्लेक्स बोर्ड लवकर खराब होतात. सदर मोफत भोजन योजनेच्या फलकाचा मसुदा खालीलप्रमाणे आहे.

**साईभक्तांसाठी नम्र आवाहन**

**मोफत भोजन योजना**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, चे मार्फत सर्व साईभक्तांचे सहर्ष स्वागत.

साईभक्त स्वत:अथवा नातेवाईकांचा वाढदिवस किंवा पुर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव संस्थान विश्वस्तव्यवस्थेने ठरविलेली रक्कम जमा केल्यास श्री साईबाबांना नैवेद्य अर्पण करुन साईभक्तांना प्रसादालयात मोफत प्रसाद भोजन देण्याची व्यवस्था करणेत येत आहे. मोफत प्रसादभोजनची कुपन्स साईभक्तांना प्रसादालयात वाटप करणेत येतील.

मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत **प्रति दिवसासाठी** खालीलप्रमाणे देणगी स्विकारण्यात येईल.

श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सव कालावधी - रु. ३,००,०००/-

वर्षातील इतर कालावधीसाठी - रु. २,००,०००/-

सदर देणगी एकाच भक्ताकडून अथवा त्यापेक्षा अधिक साईभक्त मिळून एकत्रितपणे स्विकारली जाईल. दानशूर देणगीदार भक्तांची नांवे प्रसादभोजनाचे दिवशी प्रसादालयामध्ये प्रसिध्द करण्यात येतील. ज्या दानशूर साईभक्तांना मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा साईभक्तांनी संस्थानचे श्री साई प्रसादालय कार्यालयामध्ये संपर्क साधावा ही विनंती.

**APPEAL TO SAI DEVOTEES**

**Free Prasad Bhojan Scheme :-**

**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi warmly welcome's to all Sai Devotees.**

The Management committee has decided to give Prasad Bhojan free of cost to all Sai Devotees by accepting donations in the memory of their family Members / relatives or Birthday or any specific reason. On that day Naivedya will be offered to Lord Shri Sai and Free Prasad Bhojan coupons will be distributed to the devotees in the Prasadalaya.

Following are the details of donation for **One day** Prasad Bhojan scheme.

| Period | Amount Rs. |
|---|---|
| 1) For the Festival of Shri Ramnavmi,Shri Gurupornima, and Shri Punyatithi (Dassera) | - Rs.3,00,000/- |
| 2) For the other days, throughout the year. | - Rs.2,00,000/- |

Donor can donate individually or in the group.

On the Naivedya day, donor(s) name will be displayed at Prasadalaya's notice board.
Desirous Sai devotees for free Prasad Bhojan Yojana Scheme are requested to contact Shri Sai Prasadalaya Office.

**EXECUTIVE OFFICER**
Contact No.:- (02423) 259051, 259052, 259053 **SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHRIDI**

दिवसेंदिवस मोफत भोजन योजनेस साईभक्तांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. त्याबाबतची माहीती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कालावधी | देणगीदारांची संख्या | देणगीची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सन २००७ | १० | रु. १७,४९,६००/- |
| २) | सन २००८ | १३ | रु. १९,२३,५१५/- |
| ३) | सन २००९ | २८ | रु. ६४,७६,००४/- |
| ४) | सन २०१० | ७१ | रु. १,५९,८८,२८०/- |
| ५) | सन २०११ साठी फेब्रुवारी २०११ पर्यंत आरक्षित दिवस | ३५ | रु. ७२,००,५११/- |

मोफत भोजन योजनेची साईभक्तांना प्रभावीपणे माहीती मिळणेसाठी आकर्षक व भक्कम बोर्ड तयार करुन लावल्यास यापेक्षाही चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. व सर्वसामान्य भक्तांना मोफत प्रसादभोजनाचा लाभ मिळू शकेल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्तकामी खालील वर्णनाप्रमाणे आकर्षक व भक्कम बोर्ड तयार करुन लावणे योग्य होईल. त्यासाठी एकाचवेळी जादा रक्कम खर्च होईल. परंतू दर वर्षाला नवीन फ्लेक्स बोर्ड तयार करावे लागणार नाहीत.

**सुचना फलकाबाबत तपशील**

| SR. No. | Particular | Material Description | Dimensions |
|---|---|---|---|
| 1 | **Free Prasad Bhojan Scheme.** | Outdoor slim with 1" x 1"1/2 aluminium tube frame structure with 4mm ACP Sheet waterproff UV protected digital printor vinyl pasted on it. | **7 ft X 5 Ft** |

श्री साई प्रसादालयास ISO-९००१-२००८ चे मानांकन प्राप्त करण्यासाठी आवश्यक सुचना व माहीती फलक मागील वर्षी ॲडव्हयु ॲडर्व्हटायझींग प्रा.लि., नाशिक यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले आहेत. मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०७/११/२००९ चे सभेतील निर्णय क्रं.८७५ अन्वये उपरोक्त वर्णनाचे फलक बनविणेसाठी प्रती स्क्वे.फुटास रु.२२५/- दर मान्य करण्यात आलेला आहे. त्यानूसार सदर बोर्ड तयार करुन लावल्यास प्रती बोर्डला रु.७,८७५/- खर्च येईल. त्यानूसार ०६ बोर्डसाठी एकूण रु.४७,२५०/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

साईभक्तांना सदर योजनेची प्रभावीपणे माहीती होणेसाठी खालील ठिकाणी बोर्ड लावणे गरजेचे आहे.

१) श्री साई प्रसादालय परिसर - ०२ नग
२) जनसंपर्क कार्यालयाचे शेजारी - ०१ नग
३) दर्शनरांग प्रवेशव्दारवर - ०१ नग
४) व्दारावती भक्तनिवास - ०१ नग
५) साईबाबा भक्तनिवासस्थान - ०१ नग

**एकूण बोर्ड = ०६ नग x ७,८७५/- = ४७,२५०/-**

त्याचप्रमाणे प्रसादालय हॉलमध्ये भोजन पदार्थ वाढतांना साईभक्तांना ३ फेऱ्यांमध्ये भोजनपदार्थ वाढण्यात येतात. तरीही काही भक्त ताटामध्ये अन्न शिल्लक ठेवतात. अन्नपदार्थ उष्टे टाकतात. अन्नपदार्थ उष्टे टाकू नये म्हणून दोन्ही बाजूच्या भिंतीला सुचना फलक लावणेत आलेले आहेत. मात्र भक्तांचे बाजूच्या भिंतीचे सुचना फलकाकडे सहजासहजी लक्ष जात नाही. त्यामुळेही भक्त ताटात उष्टे टाकत असावे.

साईभक्तांनी ताटामध्ये अन्नपदार्थ उष्टे टाकू नये म्हणून भक्त भोजनासाठी रांगेत बसल्यानंतर समोर स्पष्ट दिसेल अशा पध्दतीने कॉलमला साखळी लावून आकर्षक बोर्ड टांगते लावल्यास बोर्डाचा जादा प्रभाव पडेल. त्यामुळे भक्त ताटामध्ये अन्नपदार्थ कमी प्रमाणात उष्टे टाकतील असे वाटते. त्यासाठी खालील वर्णनाचे बोर्ड ॲडव्हयु ॲडर्व्हटायझींग प्रा.लि., नाशिक यांचेकडून तयार करुन लावता येतील. त्याकामी मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०७/११/२००९ चे सभेतील निर्णय क्रं. ८७५ अन्वये प्रति स्क्वे. फुटास रु.१३००/- हा दर मान्य करण्यात आलेला आहेत. त्याच दराने खालीलप्रमाणे १० सुचना फलक तयार करुन घेता येतील.

**सुचना फलकाबाबत तपशील**

| SR. No. | Particular | Material Description | Dimensions |
|---|---|---|---|
| 1 | **Appeal to Sai Devotees** | **Ultra slim Sign (Both Sided):-** High liminux tube light with electronic choke acrylic base with 7000 series vinyl pasted on laze cutting with anodized aluminium open able structure for maintenance depth 4 inch.with backsite GI Sheet | **4 ft X 2 Ft** |

उपरोक्तप्रमाणे खालील मसुद्याचे १० फलकाची गरज आहे.

> श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी / Shree Saibaba Sansthan Trust,Shirdi
> साईभक्तांसाठी आवाहन / Appeal to Sai Devotees.
> १) आपण घेत असलेले भोजन हे श्रींचा प्रसाद असल्याने ताटात अन्नपदार्थ उष्टे ठेऊ नये.
> २) Meal is the Prasad of " Baba " So, Please don't Waste the Prasad.
> ३) भोजन "श्री " का प्रसाद होनेके हेतू थाली मे झुठा मत छोडीए.|

ॲडव्हयु ॲडर्व्हटाझींग प्रा.लि., नाशिक यांचे केलेल्या दरानूसार उपरोक्त सुचना फलकासाठी खालीलप्रमाणे खर्च येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| फलकाची साईज | संख्या | दर प्रती स्क्वे.फुट | रक्कम |
|---|---|---|---|
| ४' x २' | १० | १३००/- | १,०४,०००/- |

अक्षरी रक्कम रुपये एक लाख चार हजार मात्र.

वरीलप्रमाणे मोफत भोजन योजनचे ०६ फलक व ताटात अन्नपदार्थ शिल्लक ठेऊ नये या मसुद्याचे १० सुचना फलक तयार करणेकामी अॅडव्हयु अॅडर्व्हटायझींग प्रा.लि., नाशिक यांचे सन २००९ मध्ये मान्य झालेल्या दराने सुचनाफलक बनविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.नं. | फलकाचा तपशील | संख्या | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १) | मोफत भोजन योजनेचे फलक | ०६ | ४७,२५०/- |
| २) | ताटात अन्नपदार्थ उष्टे ठेऊ नये याबाबतचे फलक | १० | १,०४,०००/- |
| | एकूण रुपये = | | १,५१,२५०/- |

**अक्षरी रक्कम रुपये एक लाख एकावन्न हजार दोनशे पन्नास मात्र.**

उपरोक्तप्रमाणे मोफत भोजन योजना व ताटात अन्नपदार्थ शिल्लक ठेऊ नये या आशयाचे फलक अॅडव्हयु अॅडर्व्हटायझींग प्रा.लि. यांचेकडून तयार करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रुपये १,५१,२५०/- चे खर्चास मंजुरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६९ यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा,असे ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९ स्टिम बॉयलर करीता स्पेअरपार्ट खरेदीस मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी सुमारे ३०,००० ते ७०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेकरीता लागणा-या स्टीमची निर्मीती सोलर प्रकल्पाद्वारे तसेच थरमॅक्स कंपनीच्या बॉयलरद्वारे केली जाते. सन १९९८ पासून स्टिम निर्मीतीकरीता ४०० कि.ग्रॅ/तास क्षमतेचा थरमॅक्सचा एक बॉयलर तसेच जानेवारी २००९ पासून ८५० क्रि.ग्रॅ./तास क्षमतेचा दुसरा बॉयलर कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना गेल्या सहा वर्षापासून बॉयलर सर्व्हीसींगचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे.

दि.१७/०३/२०११ रोजी रात्रौ ९.३० वाजता RXD ४०० थर्मक्स बॉयलर बंद झाल्याने तातडीने बॉयलर खोलून क्वाईलची हायड्रोलीक टेस्टव्दारे तपासणी केली असता आतील बाजूने हेवी लिकेज आढळले. प्रस्तुत क्वाईल दुरुस्त करणे अवघड असल्याने तातडीची बाब म्हणून थर्मक्स कंपनीचे सर्व्हीस डिलर मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना दि.१८/०३/२०११ रोजी दुरध्वनी करुन RXD ४०० बॉयलर क्वाईलचे दरपत्रक इमेलव्दारे पाठविणेस सांगितले. त्यानूसार त्यांनी खालील नमूद केलेले दरपत्रक पाठविलेले आहे. क्वाईल अभावी RXD ४०० बॉयलर बंद असून सध्या एकच RXD ८५० बॉयलर कार्यरत आहे. त्यामुळे दैनंदिन प्रसादभोजन बनविणेच्या प्रक्रियेस अडचण निर्माण होऊ नये याकरीता स्टॅण्डबाय बॉयलर कार्यरत रहाणे अत्यावश्यक आहे.

RXD ८५० या बॉयलरचे दैनंदिन वापरामुळे काही स्पेअरपार्ट खराब झालेले आहे. इन्स्पेक्शन करणेकामी खराब झालेले स्पेअरपार्ट नविन टाकावे लागणार आहेत. दिनांक १९.०१.२०११ रोजी बॉयलर इन्स्पेक्टर, अहमदनगर यांनी बॉयलर इन्स्पेक्शन करुन घेणेबाबत पत्र दिलेले आहे. बॉयलर इन्स्पेक्टर यांनी तपासणी करताना बॉयलरचे खराब झालेले स्पेअरपार्ट बदलणेस सांगितल्यास वेळेवर स्पेअरपार्ट उपलब्ध राहणार नाहीत. त्यानंतर खरेदी प्रक्रिया सुरु केल्यास स्पेअरपार्ट येणेस साधारणपणे २ ते ३ महिन्याचा कालावधी जाईल. त्यामुळे बॉयलर तपासणीपुर्वी स्पेअरपार्ट खरेदी करणे आवश्यक आहे.

थर्मेक्स बॉयलरचे स्पेअरपार्ट सर्व्हीस डिलर शिवाय इतरत्र बाजारात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आवश्यक स्पेअरपार्ट संदर्भात मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना ईमेलद्वारे व दुरध्वनीव्दारे दरपत्रक पाठविणेस कळविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांचेकडुन दरपत्रक प्राप्त झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | स्पेरपार्ट तपशिल | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | इनर जॉकेट | १ | ७७,४८४.०० | ७७,४८४.०० |
| २. | इकोनोमायझर | १ | ३३,७३२.०० | ३३,७३२.०० |
| ३. | ऑप्टीमायझर | १ | ८,४९२.०० | ८,४९२.०० |
| ४. | मॅक्झीक्लीन ०५ | २५ लि. | १६६.०० | ४१५०.०० |
| ५. | व्हाल्व सेट ॲसेम्ब्ली | १ | ३,३३१.०० | ३,३३१.०० |
| ६. | पंप पिस्टन | ३ | २१४२.६६ | ६,४२७.९८ |
| ७. | पिस्टन बेअरींग | ३ | १८०.६६ | ५४१.९८ |
| ८. | पिस्टन ऑईल सिल | ३ | १४९.६६ | ४४८.९८ |
| ९. | डिफ्युजर प्लेट | १ | ४६०.०० | ४६०.०० |
| १०. | ग्लॅन्ड वॉशर | ९ | ८२.०० | ७३८.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | सिमेंट (WHYTHEAT K) | ३ बॅग | २,२५०.०० | ६,७५०.०० |
| १२. | RXD ४०० बॉयलर क्वाईल | ०१ | ४८,९१२.०० | ४८,९१२.०० |
| | | | एकुण | १,९१,४६७.९४ |
| | | | व्हॅट १२.५% | २३,९३३.४९ |
| | | | पॅकींग व फॉरवर्ड ३% | ५,७४४.०३ |
| | | | वाहतुक | ९५००.०० |
| | | | एकुण रक्कम | २,३०,६४५.४६ |
| | | | **एकुण पुर्णांकित रक्कम** | **२,३०,६४५.००** |

वरीलप्रमाणे आवश्यक स्पेअरपार्ट मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करता येतील.

तरी वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,३०,६४५/-(अक्षरी रुपये दोन लाख तीन हजार सहाशे पंचेचाळीस मात्र) चे खर्चास मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.२७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे स्टीम बॉयलर करिता स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,३०,६४५ चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **श्री साई प्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्यूड हिटरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत**

**प्रस्ताव-** सन १९९९ पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीच्या RXG-४स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालय सुरू करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD ८५० स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय श्री साईप्रसादालयातील मोतीचूर लाडु प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर (बॉयलर) ऑगस्ट्र २००९ पासुन कार्यन्वित करणेत आलेला आहे.

सन १९९९ पासुन RXG-४ स्टीम बॉयलर करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीसला देण्यात येत आहे. मागील वर्षापासून दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर चे वार्षिक कॉन्ट्रक्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे. सन २०१०- ११ या वर्षाचे RXG -४, RXD ८५० या स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे ३१/०३/२०११ रोजी संपणार आहे.

मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सर्व्हीसींगचे काम समाधानकारक व वेळेत पुर्ण करुन दिलेले आहे. त्याच प्रमाणे वेळोवेळी स्टीम बॉयलर दुरुस्तीबाबत संस्थानला तातडीने मदत केलेली आहे. मागील वर्षी पाच सर्व्हीसींग करुन दिलेल्या आहेत.

मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१०-२०११ या वर्षाकर RXG -४ व RXD ८५० स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टकामी रु ४००००/- + सर्व्हीस टॅक्स व थार्मिक फ्ल्युड हिटर करीता रु.१८०००/- + सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे चार्जेस देणेचे मान्य केलेले होते. सन २०११-२०१२ करीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स औरंगाबाद यांना खर्चाचा अंदाज कळविणेसाठी सांगणेत आलेले होते. त्यानुसार दिनांक ८.३.२०११ रोजीचे कोटेशनद्वारे सन २०११-२०१२ या वर्षासाठी RXG -४, RXD ८५० व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसींगचे दर कळविलेले असून सर्व्हिसींग व्यतीरिक्त बॉयलरला स्पेअरपार्ट बसविल्यास त्याचा वेगळा आकार दयावा लागणार आहे.

| अ.नं. | बॉयलरचे नाव | वार्षिक सर्व्हिसींगचे दर |
|---|---|---|
| १. | RXG-४ | २२,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| २. | RXD ८५० | २२,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| ३. | थर्मिक फ्ल्युड हिटर | २०,०००/- + सर्व्हिस टॅक्स |
| | **एकुण** | **६५,०००/- + सर्व्हिस टॅक्स** |

वार्षिक सर्व्हिसींग चार्जेस वाढीबाबत मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे प्रतिनिधीशी फोनवर चर्चा केली असता त्यांनी महागाई, एस.टी. भाडे, टेक्निशियनचे पगार वाढलेले असल्यामुळे दरवाढ करावी लागलेली असल्याचे सांगणेत आले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०११-२०१२ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु६५,०००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०११-१२ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु६५,०००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१** **मौजे निमगांव कोऱ्हाळे (शिर्डी) येथील नियोजित साई पोलीस विश्रामगृहाचे बांधकामास आर्थिक मदत देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.श्री.कृष्ण प्रकाश, पोलीस अधिक्षक अहमदनगर यांनी दि.१४/०२/२०११ चे पत्राने, शिर्डी हे भारतातील एक महत्वाचे धार्मिक स्थळ असल्याने या ठिकाणी भारताच्या प्रत्येक प्रांतातून मोठया प्रमाणावर अतिमहत्वाचे व्यक्ती दर्शनासाठी येत असतात. त्यांचे बंदोबस्तासाठी बाहेरील जिल्हयातील पोलीस अधिकारी/ कर्मचारी बंदोबस्तासाठी येत असतात. त्यांचेसाठी वास्तव्याची पुरेशी सुविधा उपलब्ध नाही. तसेच भारतातील इतर राज्यातुन पोलीस दलातील अधिकारी कुटुंबासह दर्शनासाठी येत असतात त्यांना देखील निवासस्थानासाठी शिर्डी येथे कोणतीही सोय नाही.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. पोमसं/५८-अे/४९३७/शिर्डी विश्रांतीगृह/९०/०६, दि.३०/०९/२००६ अन्वये, सदरचे विश्रांतीगृह बांधण्यास मान्यता देवून बांधकामास रु.६६,७९,३२०/- इतका खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. या कार्यालयाचे आदेश क्र.लेखा/ निवीदा/ १८७/ २००७ दि.१७/०१/२००७ अन्वये, विश्रामगृहाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत ६ महीणे दिलेली होती. सदर कामासाठी मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं.श्रीरामपुर यांना रु. ३८,९५,६९१/- ची बीले अदा केलेली आहे.

शिर्डी नगरपंचायतीकडून "साई पोलीस विश्रांतीगृहाचा " नविन प्लॅन मंजुर करुन घेतला आहे. सदरच्या प्लॅनमधील बांधकामाचे साहित्य हे उच्च प्रतीचे असल्याने अदांजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे रु.१,००,६८,१५७/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| नविन प्लॅन नुसार एकुण खर्च | आजपर्यंत झालेला खर्च | उर्वरीत कामासाठी लागणारा निधी |
|---|---|---|
| रु.१,००,६८,१५७/- | रु. ३८,९५,६९१/- | रु.६१,७२,४५६/- |

तरी "साई पोलीस विश्रांतगृहाचे"मंजुर प्लॅननुसार सदरच्या बांधकामासाठी रु. ६१,७२,४५६/- (रु.एकसष्ट लाख, बाहत्तर हजार, चारशे छपन्न मात्र) इतका निधी आवश्यक आहे. सदरचे काम श्री साईबाबा संस्थान मार्फतीने पुर्ण करुन देणेस विनंती केलेली आहे.

तसेच विश्रांतीगृहाचे १६ पैकी २ रुम श्री साईबाबा संस्थानास आवश्यकतेनुसार वेळोवेळी पोलीस कल्याण उपक्रमामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील. असे नमुद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) मधील तरतुदीन्वये नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांना छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे.

मात्र सदरचा प्रस्ताव शासनाचा असल्याने प्रस्ताव प्रथम मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करता येईल व मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर राज्य शासनाचे मान्यतेसाठी पाठविता येईल.

**निर्णय क्र.२७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे (शिर्डी) येथील नियोजित साई पोलीस विश्रामगृहाचे बांधकामास आर्थिक मदत देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **श्री रामनवमी उत्सव-२०११ करीता निश्चित करण्यात आलेल्या कलाकार कार्यक्रमाबाबत**

**प्रस्ताव-** व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०३/२०११ रोजीचे सभेत श्री रामनवमी उत्सव २०११ चे कलाकार निश्चीती स्थानीक समितीने करावी असे ठरले आहे.

त्यानूसार श्री रामनवमी उत्सव-२०११ करीता आलेल्या २७ अर्ज व त्यांची तपशिलवार यादी स्थानीक विश्वस्तांसमोर अवलोकनार्थ ठेवण्यात आली होती.

श्री रामनवमी उत्सवात कलाकार मागणी करीता आलेल्या अर्ज व त्याबाबतचा सविस्तर तक्ता माहिती करीता सादर केला असता मा. विश्वस्त श्री अशोकराव खांबेकर यांनी मा. विश्वस्त श्री पाडुरंग

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अंभग साो , मा. श्री. सुरेशराव वाबळे साो व मा श्री डॉ एकनाथराव गोंदकर साो यांचेशी तसेच मा.अध्यक्ष श्रीयुत ससाणे साो यांचेशी चर्चा करुन खालील तपशिला प्रमाणे कार्यक्रम व त्यांचे मानधन निश्चीत केले असून संबधित कलाकारांनां फोनवरुन कळविलेले आहे. याबाबत सविस्तर शेरा सदरचे तक्त्यावर त्यांनी दिलेला आहे.

श्री रामनवमी उत्सवा करीता दरवर्षी श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण गोरटे यांचे मार्फत पाठविलेले किर्तनकार किर्तन करीत असतात. या वर्षीही त्यांना पत्र दिलेले असून दुरध्वनीवरुन त्यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी या उत्सवात ह.भ.प. श्री विक्रम महाराज नांदेडकर यांना किर्तनसाठी पाठविणेत येणार असून त्याबाबतचे पत्र लवकरच देत असलेचे सांगीतले.

श्री रामनवमी उत्सवा करीता खालील प्रमाणे कलाकार कार्यक्रम,मानधनासह निश्चीत करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कलाकाराचे नाव व पत्ता फोन नंबर | कार्यक्रमाचे नांव | वार तारीख व वेळ | कलाकार संख्या | प्रवास भाडे व मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण ,गोरटे यांचेकडील किर्तनकार<br>ह.भ.प. विक्रम महाराज ,नांदेडकर | किर्तन कार्यक्रम | सोमवार- ११/०४/११<br>मंगळवार- १२/०४/११<br>बुधवार- १३/०४/११ | ०२ | ९००१/- |
| ०२ | कु सुरभी केतन कुलकर्णी<br>यशोधन, श्रीराम मंदीर रोड, अजमेरे हॉस्पिटल जवळ, कोपरगांव | विविध गीत गायन | सोमवार<br>११/०४/२०११ रात्रौ<br>७.३० ते ९.३० | २० | ११,०००/- |
| ०३ | श्रीमती शकुंतला भरणे<br>डी-१४-डी- गर्व्हमेंट क्वार्टस, १ ला मजला, पणजी- गोवा | साई भजन संध्या | सोमवार<br>११/०४/२०११ रात्रौ<br>९.३० चे पुढे | १० | ११,०००/- |
| ०४ | श्रीमती आसावरी तिडके,<br>संस्कार मल्टी सर्व्हिसेस, रामाजीची वाडी, नवी शुक्रवारी,<br>नागपूर | शिर्डी के साईबाबा महानाटय | मंगळवार<br>१२/०४/२०११<br>रात्रौ ८-०० ते १०-३० | २५० | ५,००,०००/- |
| ०५ | श्री सुधांशु लोकेगांवकर<br>शिरडी, ता- राहाता<br>जि.अहमदनगर | साई भजन संध्या | बुधवार<br>१३/०४/२०११<br>रात्रौ ७-३० ते ९-०० | १० | ११,०००/- |
| ०६ | श्रीमती मिता पंडीत,<br>बी-४१, दुसरा मजला, पंचशिल इन्क्लेव, न्यु दिल्ली | साई भजन संध्या | बुधवार<br>१३/०४/२०११<br>रात्रौ ९-३० चे पुढे | ०५ | ५०,०००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यक्रम निश्चीतीस कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०११ करीता खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आले.**

| अ.नं. | कलाकाराचे नाव व पत्ता फोन नंबर | कार्यक्रमाचे नांव | वार तारीख व वेळ | कलाकार संख्या | प्रवास भाडे व मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री गोरटे महाराज प्रतिष्ठाण ,गोरटे यांचेकडील किर्तनकार ह.भ.प. विक्रम महाराज ,नांदेडकर | किर्तन कार्यक्रम | सोमवार- ११/०४/११<br>मंगळवार- १२/०४/११<br>बुधवार- १३/०४/११ | ०२ | ९००१/- |
| ०२ | श्री निनाद शुक्ल<br>अनिल ७/ बी बंगला , एस.टी.कॉलनी<br>गंगापूर रोड,नाशिक -१३ | विविध गीत गायन | सोमवार दिनांक<br>११/०४/२०११ रात्रौ<br>७.०० ते ९.०० | १० | ११,०००/- |
| ०३ | श्रीमती शकुंतला भरणे<br>डी-१४-डी- गर्व्हमेंट क्वार्टस, १ ला मजला, पणजी- गोवा | साई भजन संध्या | सोमवार<br>११/०४/२०११ रात्रौ<br>९.३० चे पुढे | १० | ११,०००/- |
| ०४ | श्रीमती आसावरी तिडके,<br>संस्कार मल्टी सर्व्हिसेस, रामाजीची वाडी, नवी शुक्रवारी,नागपूर | शिर्डी के साईबाबा महानाटय | मंगळवार<br>१२/०४/२०११<br>रात्रौ ८-०० ते १०-३० | २५० | ५,००,०००/- |
| ०५ | श्रीमती मिता पंडीत<br>बी-४१ दुसरा मजला पंचशिल इन्क्लेव,<br>न्यु दिल्ली | साई भजन संध्या | बुधवार<br>१३/०४/२०११<br>रात्रौ ७.०० ते ९.०० | १० | ५०,०००/- |
| ०६ | श्री. नितीन मुकेश, मुंबई | विविध गित गायन | बुधवार<br>१३/०४/२०११<br>रात्रौ ९-३० चे पुढे | १२ | १,७५,०००/- |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३ श्री शांताराम मिराणे माजी विश्वस्त यांना महिलांसाठी नाटक सादर करणेकामी शैक्षणिक संकूलाचे स्टेज व ग्राऊंड देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री शांताराम मिराणे माजी विश्वस्त यांनी दि.०४/०३/२०११ चे अर्जान्वये, "दिनांक १०/०२/२०११ रोजी रथ सप्तमीच्या दिवशी शिरडी शहरातील महिलांसाठी सामुदायीक हळदी-कुंकवाचा कार्यक्रम सपन्न झाला.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



शहरातील १००० महिलांनी त्यात सहभाग घेतला त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून महिलांसाठी मुंबई येथील कलाकारांचा बिन बायकांचा तमाशा हा मनोरंजनाचा कार्यक्रम गुढी पाडव्याच्या दिवशी सोमवार दिनांक ०४/०४/२०११ रोजी सायंकाळी ७.०० वाजता आयोजित केलेला असून या कार्यक्रमासाठी महिलांच्या दृष्टीने सोयीची व सुरक्षीत जागा शिरडी शहरात अन्यत्र उपलब्ध नसल्याने आपल्या शैक्षणिक संकुलाच्या स्टेजवर हा कार्यक्रम सादर करण्यास परवानगी द्यावी व कार्यक्रमासाठी लागणारे विजेचे कनेक्शन उपलब्ध करुन मिळावे," अशी विनंती केलेली आहे.

सदरचे अर्जावर मा. विश्वस्त डॉ.एकनाथराव गोंदकर यांनी, "श्री मिराणे सर यांनी शिर्डीतील स्त्रीयांकरीता कार्यक्रम आयोजित केलेला आहे. दरवर्षी हळदीकुंकवाचा कार्यक्रम करुन एक दिवस ते सांस्कृतीक कार्यक्रम करत असतात. तरी त्यांना सदर मागणी केलेले ग्राउंड देण्यास हरकत नाही." असा अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यक्रमास शैक्षणिक संकुलाचे स्टेज व ग्रांउड दयावे किंवा कसे यावर निर्णय होणे गरजेचे आहे. तसेच सदरचे कार्यक्रमास परवानगी देणे झालेस सदरचे जागे बाबत सेवा आकार घ्यावा किंवा कसे यावरही निर्णय होणे आवश्यक आहे.

सदरचे कार्यक्रमास परवानगी देणे झालेस खालील अटी शर्तीवर परवानगी देता येईल.

०१. या कार्यक्रमाकरीता वापरण्यात येणारे विजेचा मिटर प्रमाणे विद्यूत आकार भरावा लागेल.

०२. कार्यक्रमाकरीता लागणा-या आवश्यक परवानग्या आयोजकांनी घ्याव्यात.

०३. कार्यक्रमाचे वेळ व ध्वनीक्षेपकांचा आवाज याबाबत मा.न्यायालायाचे आदेशाचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी.

तरी उपरोक्त विषयावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शांताराम मिराणे माजी विश्वस्त यांना दिनांक ०४/०४/२०११ रोजी सायंकाळी ७.०० वाजता महिलांसाठी नाटक सादर करणेकामी शैक्षणिक संकूलाचे स्टेज व ग्राऊंड देणेत यावे, मात्र याकार्यक्रमासाठी वापरण्यात येणारे विजेचा मिटर प्रमाणे विद्यूत आकार भरावा लागेल असे त्यांना कळविण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन,वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४ दिनांक २९ मे २०११ रोजी सिडनी, ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या नियोजीत श्री साई भजन संध्या कार्यक्रमाचे नियोजना बाबत.**

**प्रस्ताव-** श्री जॅक तोलानी, सिडनी, ऑस्ट्रेलिया यांनी दि.१७/०३/२०११ चे इ मेलचे पत्राने श्री साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार होणेसाठी श्री साई भजन संध्या कार्यक्रमाचे सिडनी,ऑस्ट्रेलिया येथील हॉल दिनांक २९/०५/२०११ करीता बुक केला असून या करीता संस्थानकडून परवानगी मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनीयम २००४ मधील कलम नं.१७ ड नुसार "समिती श्री साईबाबांच्या जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील" अशी तरतूद आहे.

यानूसार सदरचा कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

या कामी खालील बाबींचे नियोजन करावे लागेल.

०१. मा. विश्वस्त, मा.का.अ. व कर्मचारी यांचा व्हिसा व तिकीट काढणेसाठी एजन्सी नेमणे.

०२. सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील राहण्याची व्यवस्था.

०३. सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील स्थानिक प्रवास व्यवस्था.

०४. सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील कार्यक्रमा बाबतच्या तांत्रिक बाबींची पूर्तता करणे.

०५. सदर हॉल मध्ये नेहमीच्या पध्दतीने दर्शन,आरती,उपस्थीत साई भक्तांना उदि प्रसाद (सुंठसाखर) वाटप, सत्कार करणे.

०६. लंडन येथील भजन संध्या कार्यक्रमाचे वेळी साईभक्तांना दिले प्रमाणे ०१ साई चरीत्र व ०१ साई मंदिरातील आरतीची व्हीडीओ सीडी विनामुल्य देणे.

तरी उपरोक्त कार्यक्रमाचे नियोजन तसेच या कामी येणारे खर्चाचे संदर्भात बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक २९ मे २०११ रोजी सिडनी, ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या नियोजीत श्री साई भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. याकामी उपरोक्तप्रमाणे नियोजन करणेस व येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन,वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५ संस्थान निर्मित ऑडीओ सीडी व डीव्हीडी निर्मिती कामाचे कार्योत्तर खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

संस्थान निर्मित खालील साहित्यांचा स्टॉक शिल्लक नसल्याने सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून खालील ऑडीओ सीडी व डीव्हीडी निर्मिती करणेसाठी दरपत्रक मागविण्यात येऊन त्यांनी खालील प्रमाणे दर दि.२१.०२.२०११ चे फॅक्स पत्राद्वारे कळविला आहे.

| अ.नं | तपशिल | निर्मिती संख्या | दर | व्हॅट | एकूण दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सत् चरित्र हिंदी दोहावली सी.डी. (३ सी.डी.चा संच ) | ५,००० नग | ६१.५ | ३.०८ | ६४.५८ | ३,२२,९००.०० | ९०.०० |
| ०२ | ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी - १ नग | ५,००० नग | ४३.०० | २.१५ | ४५.१५ | २,२५,७५०.०० | १००.०० |
| | | | | | **एकूण रु.** | **५,४८,६५०.००** | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे श्री साई सत् चरित्र हिंदी दोहावली ऑडीओ सी.डी. व ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी निर्मिती करणेकामी एकूण रु.५,४८,६५०/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्ठेचाळीस हजार,सहाशे पन्नास) मात्रचा मे सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना आदेश देण्यात आला आहे.

सदर सीडी व डीव्हीडी निर्मितीकामी येणा-या रु.५,४८,६५०/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्ठेचाळीस हजार,सहाशे पन्नास) मात्रचे कार्योत्तर खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे संस्थान निर्मित ऑडिओ सीडी व डीव्हीडी निर्मिती करणेकामी मे.सोनी डीएडीएस मॅन्यूफॅक्चरिंग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना देण्यात आलेल्या आदेशास व याकामी येणारे रक्कम रुपये ५,४८,६५०/-चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **संस्थान निर्मित श्री साई सत्चरित्र तामिळ ऑडिओ सीडी निर्मिती कामाचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीस मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

श्री साई सत्चरित्र तामिळ ऑडिओ सीडी निर्मिती प्रथमच होत असल्याने मे. सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून खालील ऑडिओ सीडी निर्मिती करणेसाठी दरपत्रक मागविण्यात येऊन त्यांनी खालील प्रमाणे दर दि.११.०१.२०११ चे फॅक्स पत्राद्वारे कळविला आहे.

| अ.नं | तपशिल | निर्मिती संख्या | दर | व्हॅट | एकूण दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सत्चरित्र तामिळ ऑडिओ सीडी एम.पी.३ | ५,००० नग | ३५.५० | १.७८ | ३७.२८ | १,८६,४००/- | ५०/- |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे श्री साई सत्चरित्र तामिळ ऑडिओ सीडी निर्मिती करणेकामी एकूण रु.१,८६,४००/- मात्रचा मे. सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना आदेश देण्यात आला आहे.

सदर सी.डी. निर्मितीकामी रुपये १,८६,४००/- (अक्षरी रुपये एक लाख, शहाऐंशी हजार,चारशे) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साई सत्चरित्र तामिळ ऑडिओ सीडी निर्मिती करणेकामी मे.सोनी डीएडीएस मॅन्यूफॅक्चरिंग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना देण्यात आलेल्या आदेशास व याकामी येणारे रक्कम रुपये १,८६,४००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **लिव्हर ट्रान्सप्लॉंट शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत मिळणेबाबत श्री. भास्करराव दामोधर सदाफळ, राहाता यांचे अर्जाबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** श्री. भास्करराव दामोधर सदाफळ, राहाता यांनी त्यांचे दि.२५.०३.२०११ चे अर्जान्वये त्यांचे लिव्हर ट्रान्सप्लॉंट डॉ.ए.एस. सोनी, मेदान्ता दि. मेडीसीटी हॉस्पिटल, गुंरगाव हे दि.२८.०३.२०११ रोजी शस्त्रक्रिया करणार असून याकामी रु.२५,००,०००/- मात्र इतका खर्च कळविला आहे. सदरचा खर्च माझे कुवतीबाहेर असून माझी आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे. मी दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील असून घरातील मी एकटाच कमवता असल्याने आर्थिक उत्पन्न नाही. या सर्व परिस्थीतीचा विचार करुन संस्थानमार्फत मला जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

**निर्णय क्र.२७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. भास्करराव दामोधर सदाफळ, राहाता यांना मानवतावादी दृष्टीकोनातून लिव्हर ट्रान्सप्लॉंट शस्त्रक्रियेसाठी संस्थान नियमाप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन एक विशेष बाब म्हणून रु.२,००,०००/- मात्र आर्थिक मदत देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **संजय मेंटनन्स प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छता कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत दि. ०७.०८.२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सर्व निविदा धारकांशी चर्चा वाटाघाटीकरुन संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, यांना सर्व करांसह दर महा रक्कम रु. ६,००,०००/- मध्ये काम देणे बाबत निर्णय संमत झाला. त्यानुसार त्यांना जा.क्र. २८७५ दि. ०१.०९.२०१० रोजी त्यांना वर्क ऑर्डर देणेत आली होती. सदर वर्क ऑर्डरमध्ये प्री - बीड मिटींगमध्ये झालेली चर्चा व निविदेतील पा.नं. ०१ ते १८ मध्ये नमुद केलेल्या अटी - शर्ती व करावयाचे कामाचे ठिकाण, क्षेत्रफळ, पध्दती तसेच टेक्नीकल बीड मध्ये नमुद केलेल्या मशिनरी, उपकरणे, साहीत्य, केमीकल्स वापरुन व पदनिहाय दररोज एकुण १०३ कर्मचारी कामावर नेमुन कामाचा दर्जा उत्तम ठेवुन स्वच्छतेचे काम वर्क ऑर्डर दिले पासुन एक महिन्याचे आत सुरु करणेबाबत कळविणेत आले होते. परंतु संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, यांचे आवक नं.२४३७९ दि. १३.१०.२०१० रोजीचे पत्र व दि. २८.०९.२०१० रोजीच्या ईमेलद्वारे त्यांनी निविदेत नमुद १०३ कर्मचाऱ्यां ऐवजी ८९ कर्मचाऱ्यांमध्ये काम करणेबाबत नविन वर्क ऑर्डर मिळवी अशी विनंती केली होती.

संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, यांनी वेळेत काम सुरु न केल्याने व निविदेत नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्याने दि. ०४.११.२०१० रोजीच्या टिपणी अन्वये त्यांचा EMD जप्त करणेबाबत मंजुरी घेऊन जा. नं. ४९७२ दि. २०.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांना, कळविणेत आले होते. तद्नंतर त्यांचे पुन्हा आवक नं. ३१४२४ दि. ०७.१२.२०१० चे EMD मिळणेबाबतचे पत्र प्राप्त झाले, यावर त्यांना जा.नं. ५७६४ दि. २८.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांना सविस्तर कळविणेत आले होते.

परंतु संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, या कंपनीकडून आवक नं. ३९५३६ दि. ०९.०३.२०११_च्या पत्रान्वये पुन्हा EMD मिळणेबाबत मागणी केली आहे. दरम्यानच्या काळात सदर कंपनीने वेळेत काम सुरु न केल्याने सदरचे काम दि. १०.१०.२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कल्पतरु हॉस्पिटॅलीटी ॲन्ड फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई, यांना कार्यादेश देण्यात आला होता, परंतु कार्यरत कंत्राटी कर्मचारी व स्थानिकांकडून झालेल्या विरोधामुळे त्यांनी देखील काम सुरु केले नाही व EMD देखील जमा केला नाही. सदर कंपनीने वेळेत काम सुरु न केल्याने दि.२७.०२.२०११ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये समक्ष चर्चा होऊन विषय नं. ४३ निर्णय क्र.१६६ नुसार सदर काम बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे, यांना देणेबाबत निर्णय झालेला आहे.

संजय मेन्टेनन्स सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, यांनी जप्त केलेला EMD त्यांना परत मिळणेबाबत वेळोवेळी मागणी केली आहे. तरी सदर कंपनीचा EMD परत करावा किंवा कसे ? याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.संजय मेंटनन्स प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९** **भक्तनिवासस्थान इमारतीत व्यवसायाठी गाळा मिळणेबाबत श्री.भरत अमनलाल कुकरेजा यांच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.भरत अमरलाल कुकरेजा यांनी त्यांचे दि.२६.०३.२०११ चे अर्जान्वये संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीत असलेल्या गाळयांपैकी एक गाळा ज्युस बार व आईस्क्रिम या व्यवसायासाठी मिळावा, अशी विनंती केली आहे. सदर गाळयासाठी संस्थानने ठरविलेले भाडे, डिपॉझीट, वीजबील व इतर आकार भरण्यास तयार असलेबाबत कळविले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.२८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने जाहिर लिलावाद्वारे भक्तनिवासस्थान इमारतीतील गाळे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी देण्यात आले होते. या गाळयांपैकी काही गाळे व्यवसायिकांनी घेऊन संस्थानला परत केले आहेत. या गाळयांपैकी बाहेरील बाजूचा रिकामा करणेत आलेला एक गाळा श्री.भरत अमरलाल कुकरेजा यांना लिलावात बोली झालेल्या दराने लिलावातील अटी/ शर्तीनुसार चालविण्यास देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४०** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. २८१** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१) साईभक्तांना प्रसादालयाकडे जातांना अडचण होते याकरीता नगर मनमाड रस्त्यावरील नाल्यावरील पुलाचे दुरुस्तीकामी एस्टिमेट तयार करण्यात यावे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०२) मुंबई-नाशिक येथून शिर्डीसाठी पालख्या येतात. सदरचे पालखी रोड खराब झालेले आहे. रामनवमी उत्सवापूर्वी या पालखी रोडवर मुरुम टाकून रोलींग करुन घेण्यात यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०३) साईउद्यान इमारतीसमोर साईभक्तांचे सोयीसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी यांचेमार्फत चप्पल स्टॅण्ड व मोबाईल स्टॅण्ड उभारण्यात आलेले आहे. सदरचे स्टॅण्ड पिंपळवाडी रोड लगत असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. याकरीता सदरहू चप्पल स्टॅण्ड व मोबाईल स्टॅण्ड मागे घेण्याबाबत सोसायटीस कळविण्यात यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०४) नगर-मनमाड रस्त्यावर वाहतूक नियंत्रणासाठी रामनवमी उत्सवापूर्वी झेब्रा क्रॉसिंग, रिफ्लेक्टर, लेफ्ट टर्न करण्यात यावा. यासाठी आवश्यक तेथे डांबरीकरण करणे, शिर्डी शहरातील रस्त्यावरील खड्डे डांबरीकरण करुन भरणे इत्यादी कामे, तसेच, पालखी घेऊन येणारे पदयात्रींचे वापरातील सावळविहिर, सोनेवाडी, पोहेगाव रस्ता व शिर्डी-डोऱ्हाळे या रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. सदरचे खड्डे शिर्डी शहरातील संस्थान मार्फत रस्त्याचे काम करीत असलेले ठेकेदार रोमन टरमॅट यांचेकडून करुन घेणेत यावीत. याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास व तातडीने काम करुन घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०५) समाधी मंदिराचे उत्तर बाजूस शेड उभारणेबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०६) शिर्डी येथे जुन्या साईप्रसादालय परिसराचे उत्तरेस व शिर्डी निमगांव शीव नाल्याचे लगत लक्ष्मीनगर वसाहत आहे. सदरची वसाहत स्थलांतरीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत यापुर्वी वेळोवेळी निर्णय घेणेत आलेला आहे. त्यास अनुसरुन, आजचे सभेपुढे आर्किटेक्ट भुतडा, श्रीरामपूर हे उपस्थित होते. त्यांनी मा.अध्यक्ष साो. यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सभेपुढे, लक्ष्मीनगर वसाहत स्थलांतरीत करणेसाठी, लक्ष्मीनगर वसाहतीतून जाणाऱ्या १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे व नाल्याचे मध्ये असलेल्या जागेत, तथील रहिवाशांना उपलब्ध करुन द्यावयाचे दुकानगाळयांसाठी उभारावयाचे शॉपिंग सेंटरचा प्राथमिक बांधकाम नकाशा सादर केला. सदरील दुकानगाळे लक्ष्मीनगर वसाहतीतील रहिवाशांना उदरनिर्वाहासाठी देता येतील तसेच त्यांना निवासासाठी घरकुल योजना राबविता येईल. त्यामुळे संस्थानला जुने प्रसादालयाचे उत्तरेस सुमारे एक एकर जागा उपलब्ध होईल. करीता लक्ष्मीनगर वसाहतीत राहणाऱ्या सुमारे ३१३ जागाधारकांना लहान दुकानगाळे व निवासस्थाने उपलब्ध करुन देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०७) नगर-मनमाड रस्त्यावर बसविण्यात आलेले ट्रॅफिक सिग्नल सुरु करणेबाबत पोलिस निरिक्षक,शिर्डी पोलिस स्टेशन यांना कळविण्यात यावे. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

०८) प्रसादलाडूची विक्रीची व्यवस्था भक्तनिवासस्थान व नवीन प्रसादालय परिसरात करण्यात यावी . (कार्यवाही-कँटीन विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र २०१ ते २८१ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)